# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. महासभा दि.** २६/०८/२०२२

बुधवार दि. ०३/०८/२०२२ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा तहकुब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबित विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा सोमवार, दि. २६/०८/२०२२ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | हसनाळे ज्योत्सना जालींदर | महापौर |
| २) | गेहलोत हसमुख मोहनलाल | उपमहापौर |
| ३) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सभागृह नेता |
| ४) | पाटील धनेश परशुराम | विरोधी पक्षनेता |
| ५) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ६) | शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ७) | तिवारी अशोक सूर्यदेव | सदस्य |
| ८) | पांडेय पंकज सूर्यमणि | सदस्य |
| ९) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| १०) | गोहिल शानू जोरावर सिंह | सदस्या |
| ११) | कांगणे मीना यशवंत | सदस्या |
| १२) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १३) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १४) | कदम अर्चना अरुण | सदस्या |
| १५) | नलावडे दिनेश दगडु | सदस्य |
| १६) | भोईर गणेश गजानन | सदस्य |
| १७) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १८) | गुप्ता कुसुम संतोष | सदस्या |
| १९) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| २०) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| २१) | धृवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| २२) | जैन गीता भरत | सदस्या. |
| २३) | जैन सुनिता रमेश | सदस्या |
| २४) | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | सदस्या |
| २५) | रकवी वैशाली गजेंद्र | सदस्य |
| २६) | अग्रवाल सुशील गोपीकिशन | सदस्य |
| २७) | खंडेलवाल सुरेश जगदीश | सदस्य |
| २८) | परदेशी गिता हरीश | सदस्या |
| २९) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ३०) | शेख अमजद गफार | सदस्य |
| ३१) | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३२) | घरत तारा विनायक | सदस्या |
| ३३) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ३४) | शिर्के अनंत गेणू | सदस्य |
| ३५) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| ३६) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| ३७) | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | सदस्या |
| ३८) | मेहता डिम्पल विनोद | सदस्या |
| ३९) | शेट्टी अरविंद आनंद | सदस्य |
| ४०) | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | सदस्या |
| ४१) | थेराडे संजय अनंत | सदस्य |
| ४२) | मुखर्जी अनिता बबलू | सदस्या |
| ४३) | चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ४४) | पारधी सुजाता यशवंत | सदस्या |
| ४५) | म्हात्रे सचिन केसरीनाथ | सदस्य |
| ४६) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ४७) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ४८) | सोनार सुरेखा प्रकाश | सदस्या |
| ४९) | भोईर विणा सुर्यकांत | सदस्या |
| ५०) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ५१) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ५२) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ५३) | मांजरेकर आनंद दत्ताराम | सदस्य |
| ५४) | अरोरा दीपिका पंकज | सदस्या |
| ५५) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ५६) | गजरे दौलत तुकाराम | सदस्य |
| ५७) | नाईक विविता विवेक | सदस्या |
| ५८) | सोंस नीला बर्नाड | सदस्या |
| ५९) | राय विजयकुमार सिस्थन नारायण | सदस्य |
| ६०) | शेख रुबीना फिरोझ | सदस्या |
| ६१) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६२) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६३) | मेहरा राजीव ओमप्रकाश | सदस्य |
| ६४) | परमार हेतल रतिलाल | सदस्या |
| ६५) | भट दीप्ती शेखर | सदस्या |
| ६६) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ६७) | भावसार वंदना संजय | सदस्या |
| ६८) | शाह सीमाबेन कमलेश | सदस्या |
| ६९) | दुबे मनोज रामनारायण | सदस्य |
| ७०) | विराणी अनिल रावजीभाई | सदस्य |
| ७१) | अहमद साराह अकरम | सदस्या |
| ७२) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ७३) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| ७४) | भोईर जयेश भानुदास | सदस्य |
| ७५) | म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| ७६) | भानुशाली वर्षा गिरधर | सदस्या |
| ७७) | बगाजी शर्मिला विन्सन्ट | सदस्या |
| ७८) | बांड्या एलायस दुमिंग | सदस्य |
| ७९) | शर्मा भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |
| ८०) | ॲड शफीक अहमद सादत खान | नामनिर्देशित सदस्य |
| ८१) | भोसले अनिल बाबुराव | नामनिर्देशित सदस्य |
| ८२) | अजित भगवान पाटील | नामनिर्देशित सदस्य |
| ८३) | सिंह विक्रमप्रताप रमाप्रती | नामनिर्देशित सदस्य |

<u>गैरहजर सदस्य -</u>

| | | |
|---|---|---|
| १) | शाह राकेश रतिशचंद्र | सभापती, स्थायी समिती |
| २) | ढवण निलम हरीश्चंद्र | सदस्या |
| ३) | रावल मेघना दिपक | सदस्या |
| ४) | जैन राजेंद्र भवरलाल | सदस्य |
| ५) | रॉड्रीकस मोरस जोसेफ | सदस्य |
| ६) | मोकाशी दिपाली आनंदराव | सदस्या |
| ७) | व्यास रवि वासुदेव | सदस्य |
| ८) | परेरा कॅटलीन एन्थोनी | सदस्या |
| ९) | सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन | सदस्या |
| १०) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ११) | भोईर कमलेश यशवंत | सदस्य |
| १२) | म्हात्रे परशुराम पदमाकर | सदस्य |
| १३) | कासोदारिया अश्विन शामजीभाई | सदस्य |
| १४) | म्हात्रे विनोद काशिनाथ | सदस्य |
| १५) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |

रजेचा अर्ज - निरंक

नगरसचिव :-

महानगरपालिकेची मा. महासभा बुधवार दि. ०३/०८/२०२२ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा तहकुब केल्याने विषयपत्रिकेवरील विषय क्र. ३६ ते ३८ व पुरक घोषणा क्र. ३९ ते ४३ या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा शुक्रवार, दिनांक २६/०८/२०२२ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित केलेली आहे. प्रकरण क्र. 36, “महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांचा विकास” या योजनेअंतर्गत 06 प्रभागात “बॅटरी ऑपरेटेड लिटर सक्शन मशिन “गोब्बलर” (सफाई यंत्र)” एकूण 12 मशिन खरेदी करणेबाबत. ह्या प्रकरणाचे वाचन ह्यापूर्वीच झालेले आहे.

सुरेश खंडेलवाल :-

महापौर मॅडम, सभेला आता सुरुवात होण्यापूर्वी महापौर मॅडम मी थोडीशी मनामध्ये शंका आहे. ही तहकुब महासभा आहे आणि गेल्या महासभेमध्ये ज्या विषयावर चर्चा चालू होती आणि त्या विषयावर चर्चा चालू होती आणि त्या विषयावर चर्चा करताना आपण रुलिंग देऊन महासभा तहकुब केली. तर सचिव महोदय मला आपल्याला विचारायचे आहे की 35 नंबरचा जो विषय होता आणि त्या विषयावर चर्चा बरीच वेळ झाली पदोन्नतीचा जो विषय होता त्यावर बरेचशे सदस्यांनी आपली भुमिका मांडली आणि त्यानंतर महापौर मॅडम आपण एक रुलिंग सुध्दा दिली त्याच्यामध्ये मला विचारायचे की मी आता विचारले की तो ठराव 35 नंबरचा जो झाला किंवा आपण जे 36 नंबरचा आता तुम्ही गोषवारा आम्हाला पाठविलेला आहे तो जो 35 नंबरचा विषय काय झाला? आम्ही त्याच्यामध्ये सुचना मांडल्या किंवा चर्चा केली चर्चा केल्यानंतर आपण बरेचशे सदस्यांनी त्याच्यामध्ये आपली भुमिका सुध्दा मांडली. महापौर मॅडम आपण रुलिंग सुध्दा दिली त्याच्यामध्ये तर तो 35 नंबरचा विषय त्याच्यामध्ये झाले काय? तो ठराव झाला आहे की ठरावामध्ये काय झाले आहे कुठला ठराव झाला आहे. महापौर मॅडमचा रुलिंगचा ठराव झाला आहे की सदस्यांची सुचना घेऊन झाली आहे तो ठराव आम्हाला मिळाला नाही. कारण की मी दोन तीन वेळा सचिव महोदय तुमच्याकडे पण बोललो की 35 नंबर विषय काय झाला आहे. त्याचा ठराव कुठे आहे तर तुम्ही बोलले की माझ्याकडे ठराव नाही पण ठराव झाला काय? नेमका तो 35 नंबरच्या विषयामध्ये ज्या विषयानंतर महासभा तहकुब झाली सर्व सदस्यांना जरा थोडासा खुलासा त्याची माहिती द्या.

मा. महापौर :-

सचिव साहेब माहिती द्या.

नगरसचिव :-

महापौरांच्या मान्यतेने प्रकरण क्र. 35 मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील अतिरिक्त शहर अभियंता गट अ माता व बालकल्याण अधिकारी गट अ व सिस्टिम ॲनलिस्ट गट ब या पदावर दिलेल्या पदोन्नतीस मान्यता मिळणेबाबत. हे प्रकरण 35 चे त्या दिवशी वाचन केलं त्याच्यानंतर बरीच चर्चा त्याच्यावरती झालेली होती. चर्चा झाल्यानंतर मा. महापौरांनी हा ठराव तत्पुर्वी सदस्य रिटा शहा व हेमा बेलानी सुचक अनुमोदक यांनी हा ठराव मांडलेला होता. हा ठराव मंजूर केल्याचा मा. महापौरांनी घोषित केलं आणि त्याचे पुढचे प्रकरण वाचन करण्यासाठी मला आदेशित केलं त्याप्रमाणे 35 नंबरचा ठराव मंजूर झालेला आहे. त्यानंतर प्रकरण क्र. 36 चे वाचन केलेलं होतं प्रकरण क्र. 36 चे वाचन केल्यानंतर सन्मा. सदस्या हेतल परमार यांनी ठराव वाचायला सुरुवात केली होती. त्या ठरावापैकी 6 ते 7 वाक्यापेक्षा जास्त त्यांनी ठराव वाचन करत असताना आपण ह्या 35 नंबरच्या ठरावावरती विषयासाठी चर्चा करण्यासाठी मागणी केली त्यानुसार आपणास मा. महापौरांनी चर्चा करण्यासाठी मुभा दिली आणि ह्या विषयावरती चार्च चालू असताना पद्‌नंतर सभा तहकुब झालेली आहे ही वस्तुस्थिती आहे.

सुरेश खंडेलवाल :-

महापौर मॅडम आता सचिव महोदयांनी सविस्तर माहिती महासभेला दिली 35 नंबरचा जो विषय होता त्या विषयावर चर्चा अशी झाली होती की रिटा शहा मॅडमने ठराव वाचला होता हेमा बेलानी मॅडमने अनुमोदन दिलं लगेच आपण सर्वानुमते मंजूर केलं आणि नंतर 36 नंबरचा विषय चालू झाला सदसस्यांना काय समजा त्याच्या अगोदरच ते ठराव मंजूर करून महापौर मॅडम आपण चर्चेला सुरुवात केली आणि चर्चेला सुरुवात केल्यानंतर आपण अशी मागणी केली होती की आणि त्याच्यामध्ये सभागृहनेते त्यांनी हे स्पष्ट सभागृहामध्ये सांगितले होते की तो जो एक वाक्य आहे की हा ठराव रद्द करुन म्हणजे ती पदोन्नती रद्द करुन पुढच्या महासभेपूढे तो पदोन्नतीचा ठराव परत द्यावा. महापौर मॅडम माझा असा एक प्रश्न आहे की आपण एवढी चर्चा झाल्यानंतर एवढी चर्चा

आपण केली पदोन्नतीच्या विषयानंतर आणि आपण अशी रुलिंग सुध्दा दिली तर तो विषय कधी कधी असा असतो महापौर मॅडम की आपण थोडा वाचतात आणि लगेच सर्वानुमते मंजूर सुध्दा बोलतात तरी पण सदस्यांचा हक्क आहे ते चर्चा करतात आणि त्यांना असे वाटते की हा ठराव चुकीचा किंवा आपण थोड्या घाईमध्ये सर्वानुमते मंजूर केला आहे आणि माझी त्याच्यामध्ये वेगळी भुमिका आहे. महापौर मॅडम त्या दिवशी पण मी असं बोललो होतो की ह्या पदोन्नतीच्या विषयामध्ये माझा सुध्दा एक ठराव आहे पण आपण ते घाईघाईमध्ये सर्वानुमते मंजूर आणि पुढचा विषय घ्या हा घाईगडबडीने केलेला तो ठराव तो आम्हाला त्या दिवशी मंजूर नव्हता आणि आम्ही त्या दिवशी ह्या विषयावर भरपूर चर्चा सुध्दा केली होती. चर्चा केल्यानंतर आपण असं नमुद केलं होतं की तो रद्दचा विषय त्याच्यामध्ये काढून टाकूया आणि नंतर आपण अशी रुलिंग दिली की जेवढी पदोन्नती प्रशासनाने केलेली आहे ते सर्व सथावत राहून राखून आपण पुढचे विषय जे पेंडींग आहेत ते घ्यावेत. महापौर मॅडम मला एवढेच विचारायचे आहे की जर तुम्ही एकदा सर्वानुमते मंजूर पटपट बोलले म्हणजे बाकी सदस्यांचा हक्क पण गेला की आम्हाला दुसरं काही बोलायची संधी मिळाली नाही पाहिजे किंवा आमचा दुसरा हक्क नाही. आम्हाला काय ठराव करायचा असेल तर आम्ही करु शकत नाही म्हणजे तुम्हीच रुलिंग देतात आम्हाला तरी विचारा. आम्ही इथे एवढी चर्चा केली महापौर मॅडम माझा एवढाच विषय आहे की त्या दिवशी ह्या विषयावर एवढी चर्चा केली ह्या पदोन्नतीच्या विषयावर एवढा अर्धा तास पाऊण तास सर्व सदस्यांनी त्यांची भुमिका सुध्दा मांडली आणि आपण पण त्या मताशी सहमत होते आणि आपण अशी रुलिंग सुध्दा दिली होती. तर त्या रुलिंगचे काय झाले? ती रुलिंग कायम आहे का? तो ठराव असा होणार आहे का? थोड आम्हाला माहिती द्या महापौर मॅडम.

मा. महापौर :-

माझी रुलिंग प्रोसिडींगमध्ये येईलच आणि ठराव झालेला आहे.

रिटा शाह :-

मॅडम ठराव मी केला होता आणि जेव्हा मी ठराव केला अनुमोदन झाल्यानंतर आपण पुढचा विषय घ्या असे आपण रुलिंग दिलं, रुलिंग दिल्यानंतर 36 नंबरचा विषय सुरु झाला त्याच्यावर चर्चा ही सुरु झाली.

सुरेश खंडेलवाल :-

चर्चा नाही झाली फक्त चार वाक्य बोलले होते. लगेच मी बोलायला उठलो.

रिटा शाह :-

आपके बीच में में नही बोली में चुप बैठी तो आप ही थोडासा शांती रखो, लास्ट मिटींग है अपनी मुझे मेरा बोलने दो, आप अपना बोलो जेव्हा महापौर मॅडमनी रुलिंग दिली दुसरा विषय सुरु झाला. त्याच्यावर चर्चा ही सुरु झाली त्यानंतर खंडेलवाल साहेब माझ्या हिशोबानी मला जेवढा नॉलेज आहे सभागृहात नव्हते ते नंतर एंटर झाले त्यानंतर त्यांनी हा विषय उचलला आणि त्याच्यावर सर्वांची सुचना आणि हे सर्व चालू झालं आता टेक्नीकल विषय असा आहे की जो मी ठराव केलेला आहे त्या ठरावामध्ये मॅडमने असा रुलिंग द्यायचा प्रयत्न केला होता की हा शब्द वगळा आणि हे टाका. हे टेक्नीकली कायदेशीर योग्य आहे का तो ठराव माझा आहे आणि त्या ठरावामध्ये बदल करायचा अधिकार मला सुध्दा नाही. कारण सभागृहाचा पावित्र्य असते म्हणजे सभागृह कायदेशीर चालते आणि मी ठराव केल्यानंतर मला ही अधिकार नाही. त्याच्यामध्ये फेरबदल करायचा तर हा फेरबदल करणे सचिव साहेब योग्य आहे का कायदेशीर आहे का त्यांनी फक्त फेरबदल करायची मागणी केली होती सुचनेअंतर्गत परंतु ते फेरबदल करणे कायेदशीररित्या योग्य आहे का ते कायद्यात बसणार आहे का?

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो विषय सिम्पल होता की एखाद्या सदस्यांनी मागणी ही केली की हा 36 क्रमांकाचा विषय आलेला आहे. 35 नंबरचा ठराव झालेला आहे की नाही.

सदस्य महोदयांनी स्पष्ट केल की 35 नंबरचा ठराव झालेला आहे. तर आता 36 नंबरचा विषय चालू आहे तो हा विषय घेण्यात यावा. दुसरा काही कोणाचा हक्क आहे, कोणाचा हक्क नाही. याच्यावर चर्चा झाली आम्हाला ठराव करायचा हा विषय आता फेटाळलेला आहे आणि सचिव महोदयांनी आपली विषयपत्रिका आपल्या हातात दिलेली आहे त्यामध्ये नमूद केले आहे की 36 नंबरचा विषय चालू आहे माझे म्हणणे एवढेच आहे महापौर मॅडम एवढीच फक्त विनंती आहे की जो ठराव मांडलेला आहे आणि आता आपण 36 नंबरच्या विषयावर आलेला आहोत. तर ह्या विषयावर चर्चा करावी. सचिव महोदयने क्लियर कट दिया है बारबार आप बोलके आगे पिछे कन्फ्युज करा रहे हो सचिव महोदयने क्लियर किया है की विषय क्रमांक 36 चालू है| तो इस में चर्चा क्यों कर रहे है|

सुरेश खंडेलवाल :-

100 परसेंट आपकी बात सही है, ठराव हो गया मेरा बोलने का मतलब सिर्फ इतना है दो वाक्य का में उत्तर दुंगा महापौर मॅडमने आता मॅडमने सांगितलं की, मी महासभेमध्ये होतो, महासभेमध्ये मी इथे चेअरवर होतो.

मा. उपमहापौर :-

उनका विषय ऐसा था की आप महासभा में थे सब समाप्त होने के बाद आप वापीस आए और आप को याद दिलाता हूँ की प्रोसेडिंग में महापौर मॅडमने यह भी कहाँ था की उस समय ठराव किया तब आप कहाँ पे थे आपने यह वर्ड वापरा था खंडेलवालजी की मुझे ध्यान में नही था अभी मुझे पता चला इसके बाद बोल रहा हूँ आपका उल्लेख है, प्रोसिडींग के अंदर देख सकते है| जब भी प्रोसिडींग आयेगी उसमें आपका वर्ड है|

सुरेश खंडेलवाल :-

मैं बाताता हूँग की मेरा वर्ड क्या है मैंने जो बोला मेरा वर्ड यह है की पदोन्नती का जो विषय उसके पहिले ठराव|

मा. उपमहापौर :-

सदस्य महोदय महापौर ने आपको पुछा की ठराव आ चुका है, आप कहाँ थे, आपने कब की मेरा ध्यान नही है, प्रोसिडींग में आपका वर्ड है| मेरा ध्यान नही है महापौर मॅडम में आज्ञा चाहता की इस विषय में मैं कुछ कहना चाहता हूँ उसके काम में अपने पुरे डिटेल में उल्लेख किया आप चाहे तो प्रोसिडींग में देख सकते है|

सुरेश खंडेलवाल :-

मैं वही बोल रहा हूँ जब इतनी उस दिन चर्चा हुई चर्चा होने के लिए महापौर मॅडम अपने सबको संधी दी यहाँ तो आप ऐसा बोलते है की ऑलरेडी ठराव हो गया है कोई चर्चा नही होगी कुछ नही होगाख् हमको जो ठराव करना था वो कर दिया सदस्यों को पता चला नही चला, अधिकारीयो की पदोन्नती हमने रद्द कर दिया, क्या करना है हमको जो करना था हमने कर दिया बस कुल मिला के बात यह है की आपने सर्वानुमते जो ठराव मंजूर किया उसने हमारी सहमती नही थी, इसलिए हमने खडा होके उस विषय को उचल लिया था और अपने भी इस विषय को पूरी तरह से सुना पुरे सभागृहने सुना उसके उपर चर्चा हुई| चर्चा होने के बाद में अपने रुलींग भी दिया की उसके बाद में मैंने तो यह कहाँ की यदी आपने रुलिंग दिया है तो मैंने सचिव साहब से बोला की ठराव किधर है, ठराव अभी तक आया नही मेरा बोलने का मतलब सिर्फ इतना है की जो उस दिन चर्चा की थी जो हमारा अधिकार था ठीक है आपने सर्वानुमते ठराव मंजूर कर दिया बोल दिया फटाफट और हेतल परमार मॅडमने 36 नंबर का विषय पढना शुरु किया था तुरंत मैं खडा होकर बोला 35 नंबर विषय का क्या हूआ और हमने उस समय चर्चा की थी मेरा बोलने का मतलब ठीक है कानूनी रुप से ठराव हो गया, नही हो गया उससे मुझसे कोई लेना देना नही है| लेकिन मेरा मतलब सिर्फ इतना है की हमने जो पदोन्नती का जो इतना गंभीर विषय पे इतना चर्चा करके जो हमने पॉझिटिव्हली मात की थी

उसको आप लोग मंजूर नही कर रहे है| बस कुलमिला कर बात यह है उसने हमारी संमती नही थी मैं तो उस दिन ही ठराव कर रहा था महापौर मॅडम मैं बोला की 35 नंबर का अपने जल्दबाजी में अपने ठराव सर्वानुमते मंजूर बोला उसमें हमारी संमती है या नही है वो हम प्रत्येक सदस्य का अधिकार है और अपने जल्दी में बोल दिया और 36 नंबर का विषय पढना शुरु कर दिया और हमने तुरंत खडे होकर विरोध किया और ऐसा कई बार हूआ है अपने सभागृह में सर्वानुमते मंजूर बोला उसके बाद में विरोधी पक्षने उसके बाद में भी अपनी भुमिका रखी है, सुचना भी उन्होंने रखी है, सुचना को समाविष्ट किया अपने तो ऐसा कभी नही हुआ की आपने बोला उसके बाद में वापस सभागृह के अंदर चर्चा होके कुछ भी निर्णय दुसरा नही हो सकता है महापौर मॅडम मेरा बोलने का मतलब सिर्फ इतना है की जो उस दिन विषय हुआ था उसके बाद में आपकी भुमिका ठाम है क्या की जो ठराव हुआ अपनी जो रुलिंग दिया था उसके उपर आप कायम है और यदी रुलिंग देने के बाद में ठराव के अंदर इनक्लूड हो के आए कोई दिक्कत नही चर्चा के बाद में|

मा. महापौर :-

माझी रुलिंग प्रोसिडींगमध्ये नमूद होऊन येणारच आहे. पुढचा विषय घ्या. मला वाटते 35 नंबरचा विषय झालेला आहे. 36 नंबरचा विषय चालू आहे तहकुब सभा आहे.

जुबेर इनामदार :-

आपण चर्चा त्या झालेल्या विषयाच्या भावना समजून घेण्यासाठी किंवा माझी बाजू मांडण्यासाठी.

गिता जैन :-

जरी विषय जास्त असतील, कितीही विषय असू द्या आम्हाला हे तर अधिकार आहेत की तुम्ही आम्हाला सांगा की आता तो ठराव पास झालेला आहे की जस तुम्ही सांगितलं जे झालं त्यांना जाऊ द्या, बाकीच्यांना सादर करुन करा तर एक्झॅक्ट पोझिशन काय आहे. तुम्ही जे ठराव पास केला मग तुम्ही कॅन्सल केलं का प्रमोशन ते पोझिशन एक्झॅक्ट क्लियरीटी करा मला दुसरं काहीच नको आहे महापौर मॅडम आम्हाला तुमच्याकडून अपेक्षा आहे क्लियरीटीची.

मा. महापौर :-

ठराव मंजूर झालेला आहे. ठरावाचे वाचन झालेले आहे.

गिता जैन :-

म्हणजे आपण प्रमोशन कॅन्सल करत आहेत?

मा. महापौर :-

मी नाही कॅन्सल करत ठराव केलेला आहे.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, तुम्हाला विनंती करतो. ह्या ठिकाणी आज शेवटची बैठक आहे ह्या संदर्भामध्ये ह्या ठिकाणी सर्व सन्मा. सदस्यांनी आपआपल्या भुमिका इथे मांडल्या आपण ही त्या संदर्भात भुमिका मांडलेली क्लियर केलेली आहे सचिवांनी पण आपली भुमिका स्पष्टपणे सांगितलेली आहे. आजच्या मूळात विषयपत्रिकेवरती विषय क्र. 36 पासून विषयाला सुरुवात झालेली आहे. महापौर मॅडम आपण विषयाला सुरुवात करु तत्पूर्वी महापौर मॅडम मला आपल्याला विनंती करायची आहे की आपल्याकडे ह्या सभागृहामध्ये अतिरिक्त आयुक्त नविन आलेले आहेत त्यांनी ह्या सभागृहाला आपली ओळख करुन द्यावी.

मा. अतिरिक्त आयुक्त :-

नमस्कार, मी अनिकेत मानोरकर, अतिरिक्त आयुक्त म्हणून इथे दि. 17/8/2022 रोजी रुजू झालेलो आहे. माझे मूळ गाव अकोला आहे आणि शिक्षण बी.ई इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग फ्रॉम व्ही.जी.टी.आय मुंबई आणि याच्या आधी मी जिल्हा प्रशासन अधिकारी जळगाव, मुख्याधिकारी

चाळीसगाव, मुख्याधिकारी पंढरपूर आणि उपआयुक्त तथा सहा. आयुक्त नगरपरिषद प्रशासन संचलनालय इथे कार्यरत होतो आणि इथे मी अतिरिक्त आयुक्त म्हणून 17/8/2022 रोजी रुजू झालेलो आहे. धन्यवाद.

गिता जैन :-

स्वागत आहे तुमचं. महापौर मॅडम मला फक्त हे प्रुफ करायचं आहे ज्या प्रमोशनचे जे काही प्रमाणपत्र असेल, पदोन्नतीचे जे सर्टिफिकेट असेल ते तुम्ही दिले आणि आम्ही ते बघितले का ते तुम्ही दिले मग तुम्ही असे सांगता का तुम्ही केलेल्या कामावर स्थगिती किंवा कॅन्सल करत आहेत का? म्हणजे तुम्हीच दिलेल्या कामावर.

मा. महापौर :-

मी कोणालाही स्थगिती दिलेली नाही ह्या सभागृहाने जेव्हा ठरवलं आणि तो ठराव मंजूर करुन दिलेला आहे. तोच विषय आहे. आयुक्तांनी त्यांना पदोन्नती दिली त्यांना प्रमाणपत्र दिलं. ते प्रमाणपत्र दाखवायला माझ्या केबीनमध्ये आले आणि त्यांची फोटो काढायची इच्छा होती मी त्यांच्या बरोबर फोटो काढले आता हा विषय महासभेला यायला पाहिजे म्हणून या विषयावरती आपण सगळ्यांनी चर्चा केली आणि हा विषय पुन्हा महासभेला आला. महासभेला आल्यानंतर सर्व सन्मा. लोकप्रतिनिधी आपल्या सर्वांचा अधिकार आहे ह्या विषयावरती चर्चा करायचा आणि त्याप्रमाणे आपण चर्चा केली. चर्चा केल्यानंतर ठराव झाला आणि ठराव झाल्यानंतर तो बहुमताने मंजूर झाला असा विषय आहे.

जुबेर इनामदार :-

चर्चा करायला नाही दिली.

मा. महापौर :-

अखा दिवस आपण चर्चा करत होतो मग नंतर शेवटी मी सभा तहकुब केली.

जुबेर इनामदार :-

पदोन्नतीचा विषय भावनात्मक आहे.

मा. महापौर :-

माझी ही इच्छा आहे ठराव तसा झाला.

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम आता आपण आदेश दिलेला आहे आणि सचिव महोदयांना विनंती केलेली आहे की पुढचा विषय घेण्यात यावा. ह्या विषयावर न चर्चा करता.

जुबेर इनामदार :-

हा विषय विषयपटलावरचा नाही ह्याच्यात दुमत नाही त्या दिवशी ठराव झाला तेव्हा गोंधळ झाला आणि सभा तहकुब झाली अन्यथा विरोधात ठराव झाला असता त्यावरती मतदान झालं असतं.

मा. उपमहापौर :-

सदस्य महोदय तुम्ही चुकीच बोलत आहेत. ठराव प्रत्यक्षात कंटीन्यू झाला सचिवकडून वाचून झालं.

जुबेर इनामदार :-

सभा तहकुब करायची. विषय नंतर करु असे तुम्ही बोललात.

मा. उपमहापौर :-

ठरावाच वाचन झालं. 36 क्रमांकाचा ठराव वाचन झालं त्यानंतर परत त्याची चर्चा ही चालू झाली त्यानंतर ॲक्सेप्ट घेतलं.

जुबेर इनामदार :-

आता तहकूब सभा आहे बऱ्याच वेळी सभागृहामध्ये काही विषयावर मागे येतो. क्रमांक त्याचा बदलतो विषयाची महत्वत: किंवा त्याची बारकाई किंवा व्हेटेज बघून हा विषय तसाच आहे ज्या अधिकाऱ्यांसोबत कर्मचाऱ्यांसोबत एवढे वर्ष आपण काम आलो ह्या महापालिकेचा तुम्ही सन्मा. सदस्य राहिलात मला वाटते चौथा पाचवा टर्म तुमचा असेल. माझा तिसरा टर्म आहे आमच्या काही भावना जुळलेल्या आहेत. काहींच्या सोबत आमची प्रामाणिक इच्छा आहे की त्यांना पदोन्नती मिळाली पाहिजे आणि आयुक्तांनी तो पुढाकार घेतला. आता तो परत यायचा कोणाच्या तरी भावना सोबत त्यांना चारित्र्यासोबत चुकीचे करत आहे असे तुम्हाला वाटत नाही का?

मा. महापौर :-

पदोन्नती द्यायचा हा विषय जर आता आपण 35 नंबरच्या ठरावावरती चर्चा केली. पुन्हा काय होणार ठराव वाचला जाणार त्याच्यात त्यांनी एक ठराव मांडला तुम्ही एक ठराव मांडला काय होणार, बहुमताने परत तो ठराव मंजूर होणार आहे.

जुबेर इनामदार :-

आम्हाला ठराव नाही मांडायचा आहे. सत्ताधारी यांनी मांडलेला ठराव त्यांनी तो मागे घ्यावा.

सुरेश खंडेलवाल :-

ठराव बहुमताने मंजूर होणार पण आम्ही त्या गोष्टीमध्ये आमची सहमती नसणार. कारण जर आपण कुठल्या चांगल्या कामासाठी जर आपण ठेका देणार नसणार तर वाईट कामासाठी पण पुढाकार घेणार नाही. म्हणून त्या दिवशी काय बोललो की जसा तो 36 नंबरचा ठराव वाचन सुरु केलं चर्चा चालू नाही झाली होती.

मा. उपमहापौर :-

36 नंबर ठरावावर चर्चा चालू झाली होती. वाचन झाल्यानंतर दोन मिनिटे चर्चा झाल्यानंतर तुम्ही आक्षेप घेतला.

सुरेश खंडेलवाल :-

चर्चा चालू नाही झालेली फक्त वाचन चालू होतं. आम्हाला त्या विषयामध्ये जर आपण सर्वानुमते ठराव केला आहे आमचा त्याच्यामध्ये आक्षेप असा आहे की त्या सभेमध्ये माझे योगदान नाही. ते प्रमोशन रद्द करण्यामध्ये माझे योगदान मी नाही ठेवणार म्हणून मी विनंती करतो महापौर मॅडम मेजोरीटीने कितीही ठराव करा काहीही फरक पडत नाही पण माझा विषय एकच आहे की हा प्रमोशन करण्यामध्ये मी सहभागी होणार नाही. ज्यांना सहभागी व्हायचं असेल त्यांनी व्हा.

गिता जैन :-

महापौर मॅडम विथ डू रिस्पेक्ट आपली आज शेवटची महासभा आहे आणि उद्यापासून मला वाटते आपण सगळे टर्म संपवतो आहे. टर्म संपवताना काही तरी चांगली गोड अशी त्यांना बातमी सांगा किंवा आपल्याकडून त्यांना गोड आठवण त्यांना आपण द्यायची असते आपण हे ठराव करुन आपण सिध्द काय करायला बघतोय जे दिलेले प्रमोशन आहेत ते इरेग्युलर आहेत का किंवा द्यायला नाही पाहिजे का तर आपण काय सिध्द करायला बघतो आपण आपले 5 वर्षाच्या ह्या काळात काहीतरी एखाद्यावेळी मॅडम वर्षानुवर्षे थांबलेले प्रमोशन जेव्हा आपण कर्मचाऱ्यांना देतो त्यांचे घरते ते स्वत: त्यांचा कुटुंब ते किती खुश होऊन ते प्रमोशन स्विकारतात आणि तुम्ही तुमच्या हस्ते दिले म्हणजे त्यांचा मान वाढला आणि तुमच्या हस्ते केलेली प्रमोशनवर स्थगिती देवून त्यांचा आणि तुमचा दोघांचा मला वाटते कुठेतरी मान कमी होणार तर ते करु नये. आता आपला लास्ट दिवस आहे आणि आपण चांगली आणि गोड आठवणी देवून जायचं ते ही आपल्याला आठवण करुन सांगणार की ह्या महापौर मॅडमच्या काळात आम्हाला प्रमोशन मिळाल ह्या कमिशनरच्या काळात आम्हाला प्रमोशन मिळाल आणि इथले तुम्ही दोघ पालक आहात. मग ते मुलांच काय चांगल होत ते बघणं हे तुमचे

कर्तव्य आहे आणि तुम्हीच जर त्या कर्तव्याला कुठेतरी कोणाचं एक दोन व्यक्तीचं ऐकून जर हे करत असाल तर मला वाटते कुठेतरी हे अन्याय त्यांच्यावर ही आहे तर मला असे वाटते की परत एकदा महासभेत त्यांची भावना कळून मला असे वाटते की जे झाले आहे त्याला ॲटलिस्ट स्थगिती देऊ नये, काय म्हणून त्यांची भावनाशी, त्यांची कुटुंबाची भावनांशी, त्यांनी आजूबाजू सगळीकडे किंवा तुमच्याकडे मिठाई घेऊन आले असेल, कमिशनर साहेबांना मिठाई भरवली असेल. एवढी त्यांची भावना तुम्हाला मला वाटते तुमच्याकडून पोचणारच मॅडम कारण तुम्ही ही सर्व्हिस करत करत ह्या पदापर्यंत पोहोचले आहात. मग त्यांची भावना तुमच्याकडे पोहचतच असेल मला असे वाटते की पाच वर्षात त्यांना त्यानंतर ह्या काळातील आठवण चांगली होऊ दे. अशी माझी विनंती आहे.

धृवकिशोर पाटील :-

महापौर मॅडम, मागच्या ह्याच तहकुब महासभेत विषय क्रमांक 24 मध्ये सुध्दा पदोन्नतीचा विषय होता आणि विषय क्र. 35 हा पण पदोन्नतीचा विषय आहे. आता विषय क्र. 24 मध्ये सुध्दा आपण ठराव केला आणि 35 पण ठराव केला पण 24 च्या ठरावामध्ये कोणीच बोलले नाही आणि 35 च्या ठरावामध्ये आपण स्पष्ट म्हटलेल आहे की आपण पदोन्नती कॅन्सल केलेली नाही. फॉलो ड्यू प्रोसेस ऑफ लॉ आपण हे म्हटलेलं आहे मला वाटते सर्व सदस्यांना हे कळायला पाहिजे की सभागृहामध्ये सर्व सदस्य अधिकाऱ्यांच्या बाजूने आहेत आणि सर्व सदस्यांना पदोन्नती देणेबाबत काही आक्षेप नाही परंतु पदोन्नती करताना जी काही सिस्टम वापरली आहे जी काही रित वापरली आहे ती चुकीची आहे आणि म्हणून आपण असे म्हटलेले आहे.

गिता जैन :-

मी तुमची हरकत ह्या स्टेटमेंटवर घेते की तुम्ही सांगितले ड्यु प्रोसेस ऑफ लॉ फॉलो केले नाही तर मला कमिशनर साहेबांना विचारायचे आहे साहेब तुम्ही कुठे ड्यु प्रोसेस ऑफ लॉ चुकले आहेत?

धृवकिशोर पाटील :-

मॅडम आपण आमदार आहात आम्ही एक छोटेसे नगरसेवक आहोत की तुम्हाला असे बोलणे मला वाटते संयुक्तीक वाटत नाही. कारण की गेल्या मिटींगमध्ये मी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे जे कलम 53 (1) काढून वाचले होते आणि एक्स्प्लेशनची त्यांना तुम्हाला म्हणजे गरज नाही असे मला वाटते. तरी सुध्दा मॅडम दोन विषय होते. 24 नंबरचा एक विषय होता तो पण आपण बहुमताने मंजूर केला आणि हा विषय बहुमताने नाही सर्वानुमते मंजूर केलेला आहे. मग जर ह्यांना ऑब्जेक्शन घ्यायचे होते मग ह्यांनी 24 नंबरवरती का नाही घेतलं? फक्त 35 नंबरवरती का घेतले. ते का 24 वर बोलले नाही 35 वर का बोलत आहेत. 24 मध्ये पण अधिकारी होते ना का त्यांना पदोन्नती तुम्हाला द्यायची नव्हती का? मग आता फक्त तुम्ही 35 नंबरच्या याच्यावर फक्त बोलतात 24 नंबरच्या विषयावरती तुम्ही का बोलले नाही. 24 नंबरला पण पदोन्नती होती ना. फक्त जाणून बुजून आपल्यावरती आक्षेप करायचे जाणूनबुजून आपण चांगले काम केले आहे हे खोट दाखवायचं की हे काम बरोबर करत नाही. ही जी भावना आहे ही भावना मेहरबानी करुन ही कृपया होऊ नये कारण की दोन विषय असताना तुम्ही फक्त 35 नंबरच्या विषयावरती बोलत आहेत. का 35 नंबरचे अधिकारी तुमचे चांगले आहेत आणि 24 नंबरचे अधिकारी तुमच्यासमोर चांगले नाहीत का असा जर आम्ही तुमच्यावर आरोप केल्यानंतर हे तुम्हाला चालेल का? नाही ना मग तुम्ही त्यावेळी ऑब्जेक्शन घ्यायला पाहिजे होतं तुम्ही दोन्ही विषयावरती ऑब्जेक्शन घ्यायला पाहिजे होते. फक्त तुम्ही 35 नंबरवरती ऑब्जेक्शन घेतात. याचाच अर्थ असा आम्ही काढू का की 35 नंबरचे जो विषय होता त्याच्यामध्ये तुमचे ते अधिकारी आहेत. ते तुमच्या जवळचे आहेत आणि 24 नंबरचे अधिकारी ते तुमच्या जवळचे नाहीत. असा तुमच्यावर आम्ही आरोप करायचे का? पण आम्ही तसा आरोप करत नाही. आम्हाला हे वातावरण क्लिबीश करायचे नाही आणि पदोन्नती ही अनेक वर्षापासून प्रलंबित

आहे मी तर ढोले साहेबांचे अभिनंदन करतो आणि महापौर यांच्या कारकिर्दीमध्ये पदोन्नतीचा मार्ग मोकळा झालेला आहे. परंतु मार्ग हा मोकळा होत असताना जी सिस्टम फॉलो केली पाहिजे होती ती सिस्टम फॉलो नाही केली. म्हणून आम्ही ठरावामध्ये काय म्हटलं की प्रशासनाने सविस्तर माहितीसह सदरचा प्रस्ताव पुढील महासभेत सादर करावा आम्ही कुठे नाही बोललो आम्ही फेटाळलाच नाही मॅडम हे आम्ही फक्त म्हटले की जे काय आमचे कमेंट होते ते आम्ही टाकलेले आहेत आणि तुम्ही सविस्तर अहवाल सादर करा आणि नेक्स्ट महासभेत आम्ही पास करु. आम्ही कुठे नाही म्हणतो धन्यवाद मॅडम.

रोहिदास पाटील :-

महापौर मॅडम आपण त्या दिवशी सर्वांनी अत्यंत प्रामाणिकपणे त्याच्यावर चर्चा केली. हा खेळ खोडायचे काही कारण नाही. एक मिनिटाची चर्चा नव्हती झाली. त्या चर्चेत तुम्ही स्पष्ट सांग घेतला होता आयुक्तांनी घेतला होता दोघांनी घेतला होता. सभागृह नेत्यांनी त्याच्यावर निट बाजू मांडली होती. जी व्यक्ती कामगारांच्या कर्मचाऱ्यांचा हिताचा जो निर्णय होता तो दुरुस्त करा आपण रुलिंग दिली आणि जर आपण ती भुमिका घेत असाल तर ते तेवढ शेवटचे गोषवारा आहे हे शेवटचे नाही. स्पष्ट वाटते कशासाठी हे द्यायचं आहे ना मग द्या ना. आजपर्यंत ह्या महापालिकेत अधिकाऱ्यांनी म्हणा किंवा कार्यकर्त्यांनी म्हणा सभागृहातील पदाधिकाऱ्यांनी म्हणा, कळत नकळत अनेक चुका केलेल्या आहेत आणि त्या पोटात ठेवलेल्या आहेत ना. याचा अर्थ दिला तर त्यांना काय फरक पडणार आहे. याचा गांभीर्याने काही अंदाज आहे का तुमच्याकडे कोणतेही विसर्जन करु शकतो का हे जर आपण केलं हे त्यांना दिलं तर हे महापालिकेचं आणि जनतेचं हे आहेत होणार आहे नुकसान होणार आहे. आर्थिक नुकसान होणार आहे असे नसेल धृवने सांगितले की पुढच्या महासभेत पुढची महासभा आहे का? आपण बोलते वेळी पण थोड व्यवस्थित बोलले पाहिजे. पुढची महासभा नाही म्हणूनच तो विषय चालला होता. कोणाच्या एका व्यक्तीच्या हितासाठी नव्हताच तो पूढची महासभा नाही म्हणून ह्या सभेत जे काही चांगले आहे ते चांगले ह्या महापौरांना विनंती आहे ते चांगले ह्या महापौरांना विनंती आहे आयुक्त साहेब ह्या गोष्टींवर कायम रहा ज्या कामगारांना आपण देणे योग्य आहे ते असे नाही ते तसं कस पण ते नियमात बसून द्या ही त्यावेळी पण भुमिका मांडली होती आजही मांडतो. पण हे नको ते जर तर करीत बसलो. तर काही होणार नाही आणि नको ते ठपका आपल्याला लागेल.

सुरेश खंडेलवाल :-

महापौर मॅडम आता विषय जरा मी घेतला होता आणि आता आपे पाटील साहेबांनी स्पष्ट सभागृहामध्ये सांगितले आहे की, कोणाचेही रद्द केलेले नाही फक्त आपण काय पुढच्या महासभेमध्ये सादर करा असं ठराव केला आहे आणि जर कोणाचे रद्द नाही केलं प्रमोशन आणि पुढच्या महासभेमध्ये जर असा ठराव झाला आहे तर आमची काही हरकत नाही. फक्त रद्द नाही झाला पाहिजे होता अशीच आमची एक मागणी होती आणि त्यांनी हे स्पष्ट केले आहे तर आपण विषय पुढच्या विषयाला घेऊ.

नगरसचिव :-

प्रकरण 36, “महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांचा विकास” या योजनेअंतर्गत 06 प्रभागात “बॅटरी ऑपरेटेड लिटर सक्शन मशिन “गोब्बलर” (सफाई यंत्र)” एकूण 12 मशिन खरेदी करणेबाबत.

हेतल परमार :-

उपरोक्त गोषवाऱ्यात नमुद शासन निर्णयानुसार “महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयीसुविधांचा विकास” या योजने अंतर्गत 06 प्रभागात “बॅटरी ऑपरेटेड लिटर सक्शन मधील “गोब्बलर” (सफाई यंत्र) एकुण 12 मशिन खरेदी कामाची ई-टेंडरींद्वारे निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या रु.2.40 कोटी इतक्या खर्चास ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सिमा शहा :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

ठराव सर्वानुमते मंजूर.

प्रकरण क्र. 36 :-

"महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांचा विकास" या योजनेअंतर्गत 06 प्रभागात "बॅटरी ऑपरेटेड लिटर सक्शन मशिन "गोब्बलर" (सफाई यंत्र)" एकूण 12 मशिन खरेदी करणेबाबत.

ठराव क्र. 39 :-

उपरोक्त गोषवाऱ्यात नमुद शासन निर्णयानुसार "महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयीसुविधांचा विकास" या योजने अंतर्गत 06 प्रभागात "बॅटरी ऑपरेटेड लिटर सक्शन मधील "गोब्बलर" (सफाई यंत्र) एकुण 12 मशिन खरेदी कामाची ई-टेंडरींद्वारे निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या रु.2.40 कोटी इतक्या खर्चास ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

सुचक :- श्रीम. हेतल परमार                 अनुमोदक :- श्रीम. सिमा शाह

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 37, मनपा क्षेत्रातील स्मशानभुमिमध्ये दैनंदिन साफसफाई व प्रेत दहन करणेकामी कंत्राटी सफाई कामगारांचा पुरवठा कामाची निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

वर्षा भानुशाली :-

मिरा भाईंदर महापालिकेतर्फे स्मशान भूमीमध्ये आरोग्य विभागामार्फत शहरातील प्रभाग निहाय दैनंदिन साफसफाई करीता कर्मचारी उपलब्ध करुन देणाऱ्या ठेकेदारामार्फत सफाई कर्मचारी व प्रेत दहन करणेकामी कर्मचारी उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

त्याअनुषंगाने वेगळी निविदा मागविण्याची आवश्यकता भासत असल्याने सदरचा विषय मंजुर करण्यात येत आहे.

सिमा शाह :-

माझे अनुमोदन आहे.

धृवकिशोर पाटील :-

महापौर मॅडम, महापालिका क्षेत्रामधील ज्या स्मशानभुमी आहेत.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम, तुम्ही ठराव करणार तुम्ही त्याचे एक्सप्लेशन देणार असे नाही ना. प्रशासनाने जरा सांगावे. प्रशासनाने गोषवारा दिलेला आहे तिथे कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे की नाही तुम्ही ठराव करणार तुम्ही त्याच्या विरोधात बोलणार असे नाही चालत ना. प्रशासनाला खुलासा देऊ देत ना.

मा. महापौर :-

पानपट्टे साहेब खुलासा द्या.

अनिल सावंत :-

तुम्ही ठराव मांडला विरोधात ठराव केलेला आहे त्याची स्पष्टीकरण द्यायची काय गरज आहे? प्रशासन सांगेल.

संभाजी पानपट्टे (मा. अतिरिक्त् आयुक्त) :-

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रामध्ये एकूण 16 स्मशानभुमी आहेत. एस.आयचा आम्ही रिपोर्ट घेतला. एस.आय रिपोर्टमध्ये माझ्या पध्दतीनुसार आम्हाला 44 कंत्राटी कामगार लागणार आहेत. आता मागणी केलेली आहे आणि बऱ्याच तक्रारी येतात की संध्याकाळी कर्मचारी उपलब्ध होत नाहीत. बऱ्याच सदस्यांचे तक्रारी येतात म्हणून आम्ही आर्थिक तरतूद करुन ठेवलेली आहे 2 कोटीची तरतूद उपलब्ध करुन ठेवलेली आहे. त्याच्यामध्ये त्याला आर्थिक प्रशासकीय मंजूरी द्या आम्हाला टेंडर काढायचे आहे नाहीतर उद्या कर्मचारी मिळणार नाही मग तक्रारी येतील त्यावेळी आम्ही त्याला काय उत्तर देणार? प्रशासनाकडून विनंती आहे की ह्याला आर्थिक प्रशासकीय मंजूरी द्या तर रितसर त्याला आम्ही बजेटमध्ये तरतूद उपलब्ध करुन ठेवलेली आहे आणि आर्थिक प्रशासकीय मंजूरीसाठी हा विषय महासभेसमोर ठेवलेला आहे. वारंवार ह्या संदर्भात तक्रारी येतात की मजूर उपलब्ध नाही आम्ही दहनच्या वेळेस कुठलाही कर्मचारी लाकडे टाकायला नाही. साफसफाईला नाही असे तक्रारी प्राप्त होतात म्हणून हा विषय घेतलेला आहे.

धृवकिशोर पाटील :-

महापौर मॅडम, मिरा भाईंदर परिसरामध्ये पानपट्टे साहेब 16 स्मशानभुमी आहेत आणि ह्या मिरा भाईंदरमध्ये जे संपूर्ण नगरसेवक आहेत ते स्थानिक आहेत आणि प्रत्येक नगरसेवक मला वाटते हप्त्यातून एकदा किंवा दोनदा तरी त्यांच्या परिसरातील जे कोणी मयत झाली असेल त्यांच्या त्या अंत्यविधीमध्ये सहभाग घेतो सक्रीय होतो. साहेब दुनिया इधर की उधर हो जाने दो कुठलाही ठेकेदार कुठलाही येऊ द्या पण तो सफाई कर्मचारी तोच आहे. आपण स्मशानमध्ये जातो तो एक आदमी आहे तो किती अनेक वर्षापासून तोच माणूस आहे. तो आला त्याचा मुलगा आला त्याची नेक्स्ट पिढी आली थर्ड पिढी पण त्याची आता येईल साहेब माणसं परमनन्ट आहेत माणस चेंज होत नाहीत आणि ऑलरेडी ह्याच स्मशानभुमी मध्ये गेल्या अनेक वर्षापासून आरोग्य विभागामार्फत साफसफाईचा ठेकेदारामार्फत माणस दिली जातात आणि आजही माणसं आहेत आणि तुमच्याकडे जर माणसं नसतील तर तुम्ही त्यांच्याकडून अतिरिक्त माणसं घ्या आणि त्याला पुरवा आम्ही काय म्हटले आहे तुम्ही हे वेगळ टेंडर काढायचे म्हणत आहेत आम्ही सांगतो वेगळ टेंडर काढू नका जे तुमच्याकडे ऑलरेडी साफसफाई जे तुम्ही आता ठेका देणार आहेत तुम्ही त्या ठेकेदारामार्फत तुम्ही ती माणस घ्या. तुम्ही त्याच्यासाठी वेगळ स्पेशल टेंडर काढू नका आणि जी सिस्टीम आपल्या मनपाची आहे ती सिस्टीम कंटीन्यू करा. तुम्हाला ॲडीशन माणसं पाहिजे असतील तुम्ही ॲडीशनल माणसं घ्या. तुम्ही जो फॉरमॅट ठेवलेला आहे साफसफाईचा मिरा भाईंदर साफसफाईचा तर त्याच्यामध्ये तुम्हाला माणसं लागतील आणि तुम्ही जवळ जवळ 1500 ते 2000 माणस तुम्ही घेतलेली आहेत आणि त्याच्यामध्ये तुम्ही माणसं घ्या. तुम्हाला अजूनही कमी वाटत असेल तर तुम्ही ते टेंडर फ्लोट केलेले आहे त्यात तुम्ही त्याच्यावर टाका आम्हाला अतिरिक्त माणस आणखीन लागतील देतो ना आम्ही तुम्हाला मंजूरी आम्ही कुठे नाही म्हणतो. पण तुम्ही एक्स्ट्रा टेंडर कशाला काढता. तुम्ही कोणाला पोसायला घेतले आहे का मला सांगा. असेल तर मला सांगा की हे एक्स्ट्रा टेंडर आपल्याला काढायचे आहे.

संभाजी पानपट्टे (मा. अतिरिक्त् आयुक्त) :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो साफसफाई वेगळी आहे ही स्मशानभुमीची साफसफाई आणि लाकडं रचणे त्यांची नोंदणी ठेवणे ही ॲक्टीव्हीटी वेगळी आहे. आतापर्यंत टेंडर 2012 चे टेंडर होते साफसफाईचे.

धृवकिशोर पाटील :-

आपले जे शहर होते हे ग्रामपंचायत पासून नगरपालिका झाले, नगरपालिकेपासून महानगरपालिका झाले आणि ह्या स्मशानभुमी अनेक वर्षापासूनचे आहेत आणि आपली महापालिका पण अनेक वर्षापासूनची आहे आणि कंटीन्युएशनमध्ये आहे.

संभाजी पानपट्टे (मा. अतिरिक्त् आयुक्त) :-

साहेब बरेच कर्मचारी रिटायर्ड झालेले आहेत. आता वस्तुस्थिती अशी आहे म्हणजे रितसर ही ॲक्टीव्हीटी वेगळी असल्यामुळे आपण ही निविदा काढत आहोत. खास त्या बजेटमध्ये हेड खाली तरतुद ठेवलेली आहे.

जयेश भोईर :-

धृवकिशोर साहेब आमच्या गावात अशा माणसांची गरज आहे. राई, मुर्धा, मोर्वा सफाई कर्मचारी ते काम करत नाही. उपायुक्त साहेबांनी जी नेमणूक आमच्याकडे केलेली आहे त्यानुसार ते चांगले चालले आहे. आमच्या गावात अशा एक्स्ट्रा माणसांची गरज आहे. आमच्या तिन्ही गावात आमच्याकडे सफाई कर्मचारी काम करत नाही.

संभाजी पानपट्टे (मा. अतिरिक्त् आयुक्त) :-

उद्यापासून कोणी कोण करु नका इथे रितसर विषय दिलेला आहे उद्या तक्रारी प्राप्त झाले तर आम्ही काही देणार नाहीत.

नयना म्हात्रे :-

महापौर मॅडम आपण भाईंदर स्मशानमध्ये इलेक्ट्रीक जी मशीन ठेवलेली आहे बॉडी जाळण्यासाठी ती मशीन आपण एका ठेकेदाराला चालवायला दिलेली आहे. त्याच्यामध्ये त्या बॉडी जाळण्याची जबाबदारी त्या ठेकेदाराचीच आहे. पण त्या ठेकेदाराने आतापर्यंत त्याची माणस तिकडे ठेवलेली नाहीत. त्या बॉडी कोण जळवते इलेक्ट्रीक मशिनमध्ये आपले सफाई कामगार. मग तो ठेकेदार तिकडे फक्त कामगारांच्या नावावर पैसे खाणार मग तिकडे बॉडी कोण जळवणार? मला याचे उत्तर पाहिजे.

संभाजी पानपट्टे (मा. अतिरिक्त् आयुक्त) :-

ते सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत टेंडर करण्यात आले ते मी तपासून घेतो. पण आरोग्याचे कर्मचारी तिथे लागतात.

नयना म्हात्रे :-

कर्मचारी लागतात पण साहेब जी मशीन आपण चालवायला दिलेली आहे आता एक पण तिकडे माणूस नाही.

संभाजी पानपट्टे (मा. अतिरिक्त् आयुक्त) :-

ते मी तपासून घेतो.

नयना म्हात्रे :-

24 तास ते दोनच माणस तिकडे काम करतात.

संभाजी पानपट्टे (मा. अतिरिक्त् आयुक्त) :-

म्हणूनच तीन शिफ्टमध्ये माणस लागतात म्हणून आम्ही हा विषय घेतलेला आहे. आवश्यकता आहे रात्री बेरात्री कर्मचारी उपलब्ध नसतो हा विषय सेन्सीटीव्ह होऊन जातो. म्हणून आम्ही हा विषय घेतलेला आहे.

नयना म्हात्रे :-

पानपट्टे साहेब विषय कुठचा आहे. फक्त ते लाकडे लावण्यावर मी काय बोलतो इलेक्ट्रीक मशीनचा विषय आहे.

संभाजी पानपट्टे (मा. अतिरिक्त् आयुक्त) :-

माणसं आवश्यक आहेत. हा विषय झालाच पाहिजे. उद्यापासून कोणाची तक्रार आली तर आम्ही...............

नयना म्हात्रे :-

ह्या इलेक्ट्रीक मशीनचा विषय आहे. 24 तास दोनच माणस काम करतात. ती आपली माणसं आहेत.

संभाजी पानपट्टे (मा. अतिरिक्त् आयुक्त) :-

मॅडम ती सार्वजनिक आरोग्याकडून निविदा निघालेली नाही तो विषय वेगळा आहे. ते मी तपासून घेतो.

नयना म्हात्रे :-

ठेकेदाराची माणस आहेत की आरोग्याची ते मी तुम्हाला विचारत आहे.

संभाजी पानपट्टे (मा. अतिरिक्त् आयुक्त) :-

मी ते तपासतो.

अनिल सावंत :-

सार्वजनिक सफाई, रोजची साफसफाई आणि स्मशानभुमी हा वेगळा विषय आहे. दोन्ही विषय वेगळे आहेत. साफसफाई कर्मचारी तुम्ही त्या ठिकाणी स्मशानभुमीमध्ये वापरु शकत नाहीत. आता आपल्या अध्यक्षतेखाली एक शिष्ठमंडळ दिल्लीला जाऊन आले शाळा बघुन आले आपण शाळा नंतर करुच पण ह्या स्मशानभुमी तरी अद्यावत करु. तिथे 24 तास तरी कर्मचारी असु देत. ते साफसफाई कर्मचारी तिकडचे वापरण्यापेक्षा स्मशानभुमीचे जे कर्मचारी असतात ते वगळे असतात. साफसफाईचे ठेऊ नका. साफसफाईचा ठेका वेगळा असु दे. ह्याच्यासाठी स्पेशल कर्मचारी तुम्ही ठेवा.

गिता जैन :-

महापौर मॅडम आपल्याकडून एक्सप्लेनेशन भेटले की, सफाई कर्मचारी जे आतापर्यंत करत आले होते त्यांनाच ठेवा वगैरे होत असेल करा. आम्हाला साफसफाईशी मतलब आहे तो प्रॉब्लेम नाही. पण दोन तीन वर्षापूर्वी मी ऑब्जेक्शन घेतलेलं की आपली ही जी मेन बिल्डींग आहे ते आपले कायम सफाई कर्मचारी सफाई करत आहेत. तेव्हा ही कॉन्ट्रॅक्ट दिलेलं तेव्हा का ऑब्जेक्शन नव्हते की वर्षानुवर्ष चालत आलेली ते आपले सफाई कर्मचारी आपली मेन बिल्डींग साफ करते तेव्हा तुम्ही कॉन्ट्रॅक्टरला हो सांगितले आता ते कॉन्ट्रॅक्टरने ह्याच काय वेगळ आपण करतो की ह्या कॉन्ट्रॅक्टरला द्यायच नाही त्या कॉन्ट्रॅक्टरला दिलं संशय आम्हाला येतो.

मर्लिन डिसा :-

मॅडम कॉन्ट्रॅक्टरने गेल्या जुलै 2021 पासून त्यांना पगार दिलेला नाही. हाऊसकिपींग स्टाफला काल मी निदर्शनास आणले होते तुम्हाला पण सांगु इच्छिते तिथे जे ठेवलेले आहेत आर्क इन्फोसेस हा कुठला कोण माणूस आहे आणि ते सफाळा वरुन येतात त्यांना पगार मिळालेला नाही.

मा. महापौर :-

आयुक्त महोदय जर ठेकेदार आपण नेमले असतील तर त्या ठेकेदाराचे काम नाही का. आता त्या सन्मा. सदस्या नयना ताईंनी पण तो विषय काढला डिसा मॅडमने पण तो विषय काढलेला आहे. त्या ठेकेदाराने माणसे द्यावी ना. मग आपण ठेकेदार का नेमले.

मर्लिन डिसा :-

माणसे ठेवली तर त्यांना पगार पण द्यावा.

मा. महापौर :-

हो त्यांचा पगार पण द्यावा.

रोहिदास पाटील :-

महापौर मॅडम, आज स्मशानातल्या काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा विषय पुन्हा पुन्हा आपल्या सभागृहामध्ये येतो. गेल्यावेळी पण त्यांनी विषय आणला उपमहापौरांनी सांगितले की तुम्ही त्यांना सर्टीफिकेट दिले त्यांना पगार मिळत आहे की नाही काका मी चौकशी करतो. पगार त्यांना मिळत

नाही आणि 5 हजार 10 हजारामध्ये आणि त्यांना 12 तास ड्युटी केल्यानंतर त्यांना 35 हजार रुपये पगार मिळायला पाहिजे. 35 नाही तर 20 तरी द्या तो ही तुम्ही देत नाही. 8 हजार 9 हजार तुम्ही त्यांना पगार देता. हे सभागृहात आम्ही किती वेळा बोलायचे. सभागृहात काहीतरी अपेक्षा करते ना. महापौरांपर्यंत अपेक्षा करते. प्रशासनाकडून पण अपेक्षा करते. आम्ही बोलायचे आणि खाली बसायचं पुढे काय पुढं काही होत नाही ना आयुक्त साहेब आम्ही एवढेच सांगतो की जे सफाई कर्मचारी जे स्मशानुभुमीत आहेत. त्यांची तुम्ही वेगळी दखल घेण्यात यावी. कॉन्ट्रॅक्टर कोण त्याची आम्हाला परवा नाही. आजपर्यंत मी कधी विचारले पण नाही. कॉन्ट्रॅक्टर कोण आहे म्हणून पण ते काम करणार कर्मचाऱ्यांना रितसर नियमानुसार पगार मिळायला पाहिजे फस्ट शिफ, सेकेंड शिफ, थर्ड शिफ एका माणसाकडून तुम्ही 12 तास काम करुन घेता पगार देत नाही हे बरोबर नाही साहेब.

स्नेहा पांडे :-

महापौर मॅडम कॉन्ट्रॅक्ट हम लोग देते है हमेशा महासभा में आर्थिक प्रशासकीय मंजूरी देके बैठ जाते है लेकिन जितने भी आजतक कॉन्ट्रॅक्ट है साफसफाई कर्मचारी है किसी भी बराबर पगार नही मिलती है| जबकी यहाँ पर अपना पर व्हेजेस के हिसाब से अपने यहाँ से पर डेज जो भी रेट रहता है हम देते रहते है हमारे यहाँ से बील कॉन्ट्रॅक्टर का हर महिने बरोबर पास होता है लेकिन 3-4 महिने लेबर को पगार नही मिलता है| इसीलिए में आपको बोलना चाहूँगी की, शौचालय का विषय जो आपने लिया था इतना कम्पलेंट आया इतना महासभा में गुंजने के बाद उसका कॉन्ट्रॅक्ट तो रद्द कर दिया है लेकिन दो ढाई महिने से इसी कॉन्ट्रॅक्टर से..........................

मा. महापौर :-

सर्व सन्मा. नगरसेवकांना विनंती आहे की विषय हा स्मशानभुमीचा चाललेला आहे त्याच्यामुळे स्मशानभुमीमध्ये सफाई कामगार नेमणे बाबतचा विषय सुरु आहे. त्याच्यावरती बोला बाकीच्या विषयावरती तुम्ही आयुक्तांच्या दालनात जाऊन आपली काय तक्रार असेल ती नोंदवा.

स्नेहा पांडे :-

महापौर मॅडम, आपकी मंजूरी थी उसका कॉन्ट्रॅक्ट रद्द किया जाए कॉन्ट्रॅक्ट रद्द कर दिया शाईन वाले का लेकिन ढाई महिने से उसी कॉन्ट्रॅक्टर से काम कराया जा रहा है..............

प्रविण पाटील :-

महापौर मॅडम आपली धर्माची लोक त्याचा वापर करत आहेत. आपण ही त्या स्मशानभुमीचा विकास केलेला आहे. परंतु स्मशानभुमीमध्ये आता साफसफाई कर्मचारी आणि तिथे स्मशानभुमीमध्ये प्रेत दहन करण्यासाठी जो त्यांचा विषय आलेला आहे मुळ माझा विषय असा आहे की जे कर्मचारी आहेत प्रेत दहन करणारे साहेब कस आहे प्रत्येक जातीचा वेगवेगळा विधी असतो आणि तो विधी त्या स्मशानात आजच्या तारखेला ज्या पध्दतीने जी व्यक्ती करत असते त्याला ते माहित असते. आता जर नविन तुम्ही कॉन्ट्रॅक्ट केल्यानंतर जो व्यक्ती तुम्ही नेमणार आहात तर ते परंपरागत करत असताना विधीत तो व्यक्ती कुठे जाणार? दुसरा प्रश्न असा की जर तुम्ही नविन कर्मचारी साफसफाई कर्मचारीचा ठेका देत असाल तर तुम्ही नविन ठेकेदाराला त्या स्मशानभुमीच्या हिशोबाने कर्मचारी नेमाल ठेकेदाराने सांगितल्यावर आकडा द्याल मग पहिला जे कर्मचारी जे करत होते स्मशानभुमी साफसफाईमध्ये ते कुठे जाणार आहेत? मनपाने जे साफसफाई कर्मचारी नेमलेले आहेत आजच्या तारखेला एकंदर जो आकडा आहे जो बजेटमध्ये असेल किंवा तुमची जी तरतुद असेल मग ती तरतूद तुम्ही कमी कराल का त्या ठेकेदारातून हे दोन्ही प्रश्नांचे उत्तर साहेब तुम्ही द्या.

दिपक खांबित :-

भाईंदर पश्चिम स्मशानभुमीच्या बाबत तक्रार केली नयनाताई म्हात्रे यांनी तिकडे साहेब कर्मचारी आहेत बबनराव कर्मचारी 24 तास असतो. आमच्या ही कॉन्टॅक्टमध्ये असतो. तिकडे काय झाले ते मशीन जुनी झाली आहे. आता आपण पर्यावरण विभागाकडून जे स्क्रबर बांधायचे आहेत त्या

सर्व मशीनचे ते प्लास्टीक आहेत ते प्लास्टीक विरघळून ते मशीन बंद पडायची त्याचा इश्यू होता तर त्यामुळे ती मशीन बंद पडायची पण तो बबन तिकडे असतो. आता आपण पर्यावरण विभागामधून सगळ्याच स्मशानभुमीचे इलेक्ट्रीकचे आहेत. त्यांचे स्क्रबर बांधायचे आपण काम काढले आहे. स्टँन्डिंगने मागच्या मिटींगमध्ये मंजूर पण केला आणि आम्ही त्या ठेकेदाराकडून खुलासा मागवतो. तुमची काही तक्रार असेल तर नंतर दुसरा विषय होता. काकांनी जे सांगितले बंदरवाडी स्मशानभुमी तर आम्ही त्याची शहानिशा केली ठेकेदाराला आम्ही नोटिस दिली होती आणि त्याचाकडून खुलासा घेतला होता. तर त्यांनी सांगितले होते की आम्ही त्याला त्याची तक्रार नाही मी त्याला पैसे वाढवून काहीतरी 15 हजार रुपये देतो असे बोलले होते तर तुमची मागणी होती की ते किमान वेतन द्या. पण त्यांची मागणी कशी असते आम्ही जो कॉन्ट्रॅक्ट देतो तो माणूस आम्ही कुठे पण वापरु शकतो. तर त्याबाबत सुध्दा काका आपण एकदा त्याला बोलवतो तुमच्यासमोर त्याची काही अडचण तो एक विषय आपण सॉल्व्ह करुया आणि बाकी जे कर्मचारी तुम्ही बोलतात नविन ठेका दिला कर्मचारी आपण असे कोणालाच काढत नाही. आपण त्या नविन ठेकेदाराला सांगतो की ह्याला एक्सपिरियन्स आहे तो व्यवस्थित काम करतो त्याच्याबद्दल कुठलीच तक्रार नाही त्याच लोकांना ठेवा असे आपण त्याला प्रत्येक वेळी इंस्ट्रक्शन देतो आणि त्याप्रमाणे तेच लोक काम करत असतात जर तो स्वत:हून सोडून गेला तर ते आपण बदलतो. आपल्या मिरारोडला पण तेच लोक आहेत, बंदरवाडीला पण तिच लोक आहेत. भाईंदर रोडला पण तिच लोक आहेत. आपण कुठलेही कर्मचारी बदलले नाहीत.

प्रविण पाटील :-

साहेब कस आहे माहित आहे आता जो सिक्युरीटीचा ठेका दिला त्यावेळेला जी परिस्थिती निर्माण झाली गावातले बरेच लोक सिक्युरीटीमध्ये काम करत होती. स्थानिक लोक होते आता त्याच्यामध्ये तुम्ही नियमावली बदल केलेली आहे शासनाने नियमावली ते आम्ही मान्य करतो आणि त्या वेळेला जे 200-300 लोक जी बेकार झाली तीच परिस्थिती आता तीही नको व्हायला साहेब. मग तुम्ही परत ठेका देणार वेगळ कॉन्ट्रॅक्ट करणार परत तिकडचे स्थानिक लोक आहेत परत तीच परिस्थिती होणार आहे.

मा. आयुक्त :-

आपण जे सफाई कर्मचारी हे दुपारी 3 वाजता निघुन जातात त्यानंतर ज्या बॉडीज येतात त्या दुसऱ्या तिसऱ्या शिफ्टमध्ये कुठल्याही क्षणी स्मशानभुमी बॉडी येत असतात. जाळण्यासाठी तर त्या ठिकाणी कर्मचाऱ्यांची अडचण होते आणि साफसफाई कर्मचारी सकाळचा 7.30 वाजेपासून 3 पर्यंत येतात आणि काही वेळा मग त्याठिकाणी कर्मचारी नसेल कुठले काही झाले तर लॉयेन ऑर्डरपर्यंत प्रश्न येत असतात हा करण्याचा उद्देश असा आहे की त्याच्यात पण सुसुत्रता यावी. सफाई कर्मचारी तो सांगतो इकडे सांगतो मी सफाई कर्मचारी आहे सफाई कर्मचारी सांगतो मी स्मशानभुमीत आहे जे कर्मचारी वर्षानुवर्ष त्या ठिकाणी काम करतात त्यांना वेगवेगळ्या जाती धर्माचे रिती रिवाज माहित आहेत आणि विधवत कशी त्यांचे बॉडीचे दहन केलं जातं त्यासाठी ते ते कर्मचारी त्या ठिकाणी कार्यरत आहेत तेच कर्मचारी पूढे कार्यरत राहतील परंतु वेगळ टेंडर काढल्यानंतर त्यात सुसुत्रता येते आणि फक्त स्मशानभुमीचा अनुषंगाने त्याच्यावर वेगवेगळ्या शिफ्टमध्ये कर्मचारी तेच कर्मचारी वेगवेगळ्या शिफ्टमध्ये करुन त्याच्यात आणखीन सुसुत्रता आणता येईल. जेणेकरून कूठल्याही सन्मा. सदस्यांची नागरिकांची अथवा इतर कोणाचीच तक्रार येणार नाही. ह्यासाठी प्रशासनाने कार्यवाही केलेली आहे. म्हणून अपेक्षा अशी आहे की ह्याला मान्यता द्यावी.

मा. महापौर :-

ठरावाचे वाचन झालेले आहे. सन्मा. नगरसेविका वर्षा भानुशाली मॅडमने वाचन केलेले आहे आपला ठराव आहे का?

जुबेर इनामदार :-

तुम्ही ह्याला मंजूरी देत आहेत की नाही देत आहेत आम्ही मंजूरी देत आहोत.

मा. महापौर :-

तुम्ही द्या.

जयेश भोईर :-

आयुक्त साहेब त्या जुन्या टेंडरची मुदत संपली का?

संभाजी पानपट्टे (मा. अतिरिक्त् आयुक्त) :-

टेंडरच कधी काढलेले नाही. आरोग्याची माणसं देत आहोत. वॉर्डात कमी पडत आहेत. म्हणून हे नविन काढत आहेत.

जयेश भोईर :-

आता 16 स्मशान भुमीमध्ये किती माणस आहेत?

संभाजी पानपट्टे (मा. अतिरिक्त् आयुक्त) :-

60 आहेत.

नयना म्हात्रे :-

पानपट्टे साहेब आता जी बॉडी जळवायला आपण माणस ठेवली आहेत त्यांना सगळ्यांना घरी बसवायचं आहे का?

मा. आयुक्त :-

मॅडम जे कर्मचारी त्या ठिकाणी आता काम करत आहेत तेच कर्मचारी पुढे काम करतील. परंतु सध्या ते साफसफाईमधले कर्मचारी आहेत वॉर्डमध्ये काम करत असताना त्याठिकाणी कर्मचारी कमी पडतात. म्हणजे वॉर्ड मधली सफाई निटनेटकी होत नाही. त्याचबरोबर वॉर्डमधले ते कर्मचारी आणले तर स्मशानभुमीतील साफसफाई नीट होत नाही. म्हणून आपण ह्याच्यात सुसुत्रता येण्यासाठी आणि तिन्ही शिफ्टमध्ये त्या ठिकाणी कर्मचारी उपलब्ध व्हावा म्हणून आपण हे सेपरेट करत आहोत. ज्या ठिकाणी स्मशानभुमीला आता जे काम करत आहेत कर्मचारी तेच कर्मचारी स्मशानभुमीसाठी सेपरेट काम करतील आणि साफसफाईसाठी जे कर्मचारी आहेत ते साफसफाईचे काम करतील. आता दुहेरी लोड येत असल्यामुळे कामाचा दर्जावर कॉलीटीवर त्याचा विपरीत परिणाम होत आहे म्हणून ह्याच्यात सुसुत्रता आणण्यासाठी आणि आणखीन साफसफाई निटनिटकी होण्यासाठी ह्याच्यात आपण वर्गीकरण करुन वेगवेगळे टेंडर करत आहोत.

नयना म्हात्रे :-

आयुक्त साहेब माझ्या वॉर्डात 4 स्मशानभूमी आहेत. पण आमच्याकडे आरोग्याचे कर्मचारी स्मशानात जात नाही. आणि आता जे आपण बॉडी जळवण्यासाठी ठेवले आहेत ते बाहेर येत नाही.

मा. आयुक्त :-

म्हणूनच हे टेंडर काढत आहे. तुम्हाला जर योग्य वाटत असेल तर त्याला मान्यता द्या. नसेल तर पहिले सारखे सुरु राहणार.

जयेश भोईर :-

आमची मान्यता आहे. माझी वैयक्तिक मान्यता आहे.

धृवकिशोर पाटील :-

आता सनमा. सदस्य प्रविण पाटील साहेब काय बोलले मी जर ठेकेदार बदलला.......

जुबेर इनामदार :-

आता मला वाटते महापौर मॅडम ठराव वाचला चर्चा झाली प्रशासनाने आपली भुमिका मांडली आणि आयुक्त महोदयांनी स्पष्टीकरण दिले त्याच्यावर आरोग्याचे कर्मचारी आपण वापरू शकत नाही कारण 3 वाजता त्यांची सुट्टी होते. पालिकेकडे त्यांना थांबवून धरण्यासाठी तसा कुठला नियोजन नाही

म्हणून आपल्याला 24 तासासाठी म्हणजे तीन खेपांमध्ये आपल्याला कर्मचारी तिथे उपलब्ध पाहिजे. जेणेकरून दहनासाठी येणाऱ्या लोकांना कुठल्याही प्रकारचा त्रास होऊ नये. कर्मचारी आहेत जे काम करत आहेत त्यांना अनुभव आहे. त्याच कर्मचाऱ्याला परत तिथे समाविष्ठ करण्यात येईल. त्यांनाच कामावर ठेवण्यात यावे. ठेकेदराला तस सांगण्यात येईल तशी सुचना करण्यात येईल जेणेकरून तो ठेकेदार त्याच कर्मचाऱ्याला ज्यांना ती प्रथा माहित आहे दहन करण्याची पध्दत माहित आहे अशाच कर्मचाऱ्यांना परत तिथे कामवर सांभाळून घेता येईल आणि प्रशासनाची स्पष्ट भुमिका आहे.

प्रविण पाटील :-

महापौर मॅडम, ठरावाच्या अगोदर एक विनंती होती प्रशासनाला साहेब कस आहे, स्मशानभूमी तिथे आरोग्याचे कर्मचारी असतात, दहन करणारे वेगळे कर्मचारी असतात, सुरक्षा रक्षक असतात आणि वृक्ष प्राधिकरणाचे असतात असे चार विभागाचे कर्मचारी प्रत्येक स्मशानभूमीमध्ये अतसात. मॅडम त्याच्यामध्ये कूठल्याही प्रकारची सुसुत्रता नाही तूम्ही जाऊन बघा किती सुरक्षा रक्षक आहेत. कुठल्या शिफ्टमध्ये आहेत, वृक्ष प्राधिकरणचे किती कर्मचारी तिथे काम करतात आता तुम्ही परत साफसफाईसाठी वेगळे देतात साहेब हे तुम्ही धोरण ठरवा स्मशानभुमीचं की किती कर्मचारी तिथे असायला पाहिजे. केवढी मोठी स्मशानभूमी आहे तिचा कसा वापर होतो किती प्रकारे त्याप्रमाणे आता तुम्ही फक्त दोनच विषय घेतले सुरक्षा रक्षक आणि वृक्षप्राधिकरण. साहेब हे विषय पण तुम्ही त्याच्यात ठरवा आणि स्मशानभुमीचे वेगळे धोरण ठरवा आणि तेवढे आस्थापना विभागाकडून कर्मचारी मंजूर करून घ्या ही प्रशासनाला माझी विनंती आहे.

जुबेर इनामदार :-

प्रकरण क्र. 37 च्या ठरावाचे वाचन करतो. दिलेल्या गोषवाऱ्याप्रमाणे मंजूरी देण्यात येत आहे. तसे ह्याच्यामध्ये अशी सुचना आहे की, कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना परत या नविन ठेकेदाराने त्याच कर्मचाऱ्यांना सामावून घ्यावे, त्यांनाचा कामावर घेण्यात यावे. असलेल्या स्मशानभूमीमध्ये सुरक्षारक्षक, वृक्षप्राधिकरण तसेच कंत्राटदाराचे कर्मचारी चोवीस तास तेथे कामासाठी उपलब्ध असावे. जेणेकरुन येणाऱ्या लोकांना, रहिवाश्यांना कुठलाही त्या विषयीचा त्रास होवू नये आणि अंतविधी व्यवस्थितरित्या करता येईल असा मी ठराव मांडत आहे.

धनेश पाटील :-

माझे अनुमोदन आहे.

रोहिदास पाटील :-

आयुक्त साहेब हा ठराव ह्याला मतदानाचा विषय वगैरे नाही.........

मा. महापौर :-

दोन ठराव आलेले आहेत.

रोहिदास पाटील :-

ह्या ठरावावर मतदान करायचे काही कारण नाही तो ठेकेदार नेमायला आम्ही परवानगी देऊ किंवा आपल्याला द्यावी लागेल. स्मशानातील जी गैरव्यवस्था आहे त्यात जातीने लक्ष घाला. ठेकेदार कोण त्याच्याबद्दल आम्हाला रुची नाह. काम करणारी माणसं पाहिजेत. त्यांना वेळेत पगार मिळाला पाहिजे. तुम्ही ठराव मंजूर करा.

मा. महापौर :-

सर्वानुमते ठराव मंजूर. मी मान्यता दिली तुमचा ठराव मंजूर.

नयना म्हात्रे :-

आयुक्त साहेब जो ठेकेदार आहे त्या कर्मचाऱ्यांना फक्त 12 हजारच पगार देतो.

मा. आयुक्त :-

मी लिहून घेतो आणि योग्य ती कारवाई करतो.

सुरेश खंडेलवाल :-

सचिव साहेब पुढचा विषय घ्या.

जुबेर इनामदार :-

आमचा ठराव महापौर मॅडम यांनी मंजूर केला.

धृवकिशोर पाटील :-

महापौर मॅडम विषय असा आहे की सदस्यांची तक्रार वेगळी होती पानपट्टे साहेबांनी संपूर्ण सभागृह मिसगाईड केलं तक्रार काकांची ही होती की त्या कर्मचाऱ्याला पगार मिळत नाही फक्त 8 हजार महापौर मॅडम काकांच्या बंदरवाडी स्मशानभुमीमध्ये त्या कर्मचाऱ्याला पगार 8 ते 9 हजार मिळतो आणि सन्मा. सदस्य जयेश भोईर, नयना म्हात्रे यांचा जो प्रभाग आहे त्या मुर्धा गावातील कर्मचाऱ्यांना पगार मिळतो फक्त 12 हजार आणि महापालिकेत 26 हजार विचार करा तक्रार कुठली आहे की पगार व्यवस्थित मिळत नाही आणि आपल्याला साहेबांनी काय सांगितले की अशा तक्रारी येतात. तक्रारी रास्त आहेत परंतु तक्रार आहे वेगळी आणि आपण करतो वेगळ तरी सन्मा. सदस्य काकांनी सांगितले जयेशने सांगितले की आता आपल्याला याची मंजूरी द्यायला पाहिजे म्हणून मी सांगतो वर्षा भानुशाली मॅडम तुम्ही जो ठराव मांडलेला आहे आता हयांना मंजूरी देऊन टाका.

जुबेर इनामदार :-

आमच्या ठरावाच काय झालं महापौर मॅडम आम्ही ठराव वाचला आहे म्हणून आम्हाला याचे स्पष्टीकरण स्पष्ट भाषेत पाहिजे. पालिकेने दिलेला गोषवारा त्याप्रमाणेच ठराव करण्यात आलेला आहे.

सुरेश खंडेलवाल :-

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार ठराव मंजूर करण्यांत येत आहे. असा ठराव ते आता मांडणार आहेत.

वर्षा भानुशाली :-

सर ठराव पढने से पहले आप लोगो को एक विनंती करती हूँ ठेकेदार असून आपण त्याला किती पगार देतो आणि ते खाली किती पगार देतो. ठिक आहे एक दोन हजार आपण समजू शकतो पण आपण 36 हजार त्याला देत आहोत आणि तो कर्मचाऱ्याला खाली फक्त 12 हाजर देतो तर त्याच्यावरती तुम्ही जरूर कारवाई करा.

अनिल सावंत :-

महापौर मॅडम हा विषय अतिशय गंभीर आहे धृवकिशोरने पण आरोप केले तर मला वाटते ई.डी. ची चौकशी याच्यामध्ये लावा.

वर्षा भानुशाली :-

मिरा भाईंदर महापालिकेतर्फे स्मशान भूमीमध्ये आरोग्य विभागामार्फत शहरातील प्रभाग निहाय दैनंदिन साफसफाई करीता कर्मचारी उपलब्ध करुन देणाऱ्या ठेकेदारामार्फत सफाई कर्मचारी व प्रेत दहन करणेकामी कर्मचारी उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

त्याअनुषंगाने वेगळी निविदा मागविण्याची आवश्यकता भासत असल्याने सदरचा विषय मंजुर करण्यात येत आहे.

जयेश भोईर :-

माझी याच्यात सुचना आहे की कुठल्याही जुन्या कर्मचाऱ्याला कमी करु नये.

मा. महापौर :-

ठराव सुचनेसह मंजूर.

प्रकरण क्र. 37 :-

मनपा क्षेत्रातील स्मशानभुमिमध्ये दैनंदिन साफसफाई व प्रेत दहन करणेकामी कंत्राटी सफाई कामगारांचा पुरवठा कामाची निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

ठराव क्र. 40 :-

मिरा भाईंदर महापालिकेतर्फे स्मशान भूमीमध्ये आरोग्य विभागामार्फत शहरातील प्रभाग निहाय दैनंदिन साफसफाई करीता कर्मचारी उपलब्ध करुन देणाऱ्या ठेकेदारामार्फत सफाई कर्मचारी व प्रेत दहन करणेकामी कर्मचारी उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

त्याअनुषंगाने वेगळी निविदा मागविण्याची आवश्यकता भासत असल्याने सदरचा विषय मंजुर करण्यात येत आहे.

सुचक :- श्रीम. वर्षा भानुशाली अनुमोदक :- श्रीम. सिमा शाह

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 38, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे खारी स.क्र.१५४, १५१, व १५३ या क्षेत्रावरील आ.क्र.१०२ (बगीचा) आरक्षणातून विद्यमान इमारतींना वगळण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेबाबत.

शानु गोहिल :-

मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील भाईंदर (पु.) मौजे खारी स.क्र.१५४, १५१, व १५३ या क्षेत्रावरील आ.क्र.१०२ (बगीचा) आरक्षणामध्ये काही जागेत ओस्तवाल पार्क बिल्डींग क्र.5,6 व 7 व निशांत को.ऑ.हौ.सो. या इमारती ग्रामपंचायत काळापासून अस्तित्वात आहेत व पूर्णपणे रहिवास व्याप्त असल्यामुळे सदर जागेत बगीचा विकसीत करणे शक्य होणार नाही. त्यामुळे सदरची रहिवास व्याप्त जागा आरक्षण क्र.102 (बगीचा) आरक्षणांनी बाधित झालेल्या विद्यमान इमारतींचे क्षेत्र वगळणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये कार्यवाही करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

तसेच संपूर्ण मिरा भाईंदर शहरात विकास योजना अंमलात आणण्यापूर्वी ग्रामपंचायत व नगरपरिषद काळापासून बनलेल्या अनेक इमारती महापालिकेच्या विविध आरक्षणामध्ये बाधित झालेल्या आहेत. मा. महासभा दि.23/06/2021 रोजी ठराव क्र.24 प्रमाणे प्रशासनाने आरक्षणामध्ये बाधित झालेल्या इमारती आरक्षणामधुन वगळण्याचा प्रस्ताव मा. महासभेत सादर करावा.

गणेश भोईर :-

माझे अनुमोदन आहे.

गिता जैन :-

महापौर मॅडम आपल्या माहितीसाठी आपल्याकडे जेव्हा नविन डी.पी.आर करायची मिटींग होती तेव्हा हा जो विषय होता त्यात ओत्सवाल असु द्या अशा पूर्ण मिरा भाईंदर शहरात ठिकठिकाणी खुपसारी अशी जागा आहे जे आतापर्यंत पहिले बिल्डींग झाल्यानंतर काही रिझर्व्हेशन पडले आहेत किंवा नंतर रोडचे डायरेक्शन बदलले गेले आहेत असे बरेचशे आपल्या बिल्डींग आपली वास्तु आहेत. तेव्हा नविन जेव्हा डी.पी.आर बनत होता तेव्हा त्या मिटींगमध्ये आम्ही सर्व होतो आणि तेव्हा हे नक्की झाले की ते ड्रोनमार्फत आता नविन डी.पी.आर बनवतो आणि ड्रोनमार्फत जे जे रस्त्यावर बिल्डींग दिसत आहेत सपोज डी.पी रोड प्रपोज आहे किंवा गार्डन प्रपोज आहे आणि तिथे बिल्डींग दिसते तर त्यांना ते वगळून नविन डी.पी.आर बनवणार आणि ते ते आरक्षण तिथे दाखवणार आहेत तिथुन काढून टाकणार आहेत असे त्यांनी ग्वाही दिलेली आहे. म्हणून ह्या ठरावात तशी त्याची काही जरुरत नाहीच आहे. कारण परत ते 37 वगैरेला पाठवा ही प्रोसिजर लांब होणार त्यापेक्षा नविन

डी.पीआर मध्ये ते लोक करतच आहेत पण मला असे वाटते की ह्या ठरावाची अशी काय आता बिल्कुल इथे गरज नाही आहे.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, प्रथमत: प्रशासनाचा ह्याला गोषवारा नाही 37 वगैरे हा विषय प्रशासनाकडूनच आला पाहिजे. महासभोच्या सभागृहाला निर्णय घ्यायचा असला तर त्याच्यासाठी त्याची परिपूर्ण माहिती पाहिजे. हा विषय पहिल्यांदा आलेला नाही याच्या आधी बऱ्याच वेळा हा विषय ह्या सभागृहामध्ये गाजला आहे. फक्त आला नाही आणि त्याच्या विरोधात ठराव झालेला आहे. सत्ताधाऱ्यांच केलेले आहेत आणि आज परत हा विषय येतो आणि 37 खाली त्या जागेला वगळण्याचा विषय येतो ज्या जागेवरती आरक्षण आहे त्याच्या जागेवरती आरक्षण आहे त्याच्या जागेवरती इमारती बांधल्या गेल्या जेव्हा विकासकाने त्याच्या आपला प्लान पुटअप केला होता तेव्हा तेव्हा ती जागा त्याला खाली करुन देणे किंवा असलेले आरक्षण त्याने रिकामे करणे ते गृहित धरले गेले नाही त्याला मंजूरी देण्यात आली. त्याने पालिकेची दिशाभूल केली आणि आपली मंजूरी प्राप्त केलेली आहे. आहे त्या विषयाला पालिकेचा इतरत्र विषय म्हणून तो विषय 37 खाली त्याच्यामध्ये आपल्याला फेरबदलाची कारवाई करण्याचा विषय घेतला जातो आणि हा परस्पर घेतला जातो प्रशासनाची याच्यामध्ये भुमिकाच नाही. आमचा याच्यावरती ठाम विरोध आहे. 34 अंतर्गत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम 34 अंतर्गत नविन डी.पी. तयार करण्याचा इरादा जाहिर झालेला आहे त्याचे काम अंतिम टप्प्यात असताना अशाप्रकारे खरोखरच असेल तर लँड इस युजमध्ये त्यांना ती संधी प्राप्त होणारच आहे. अशाप्रकारे हे विषय आणणे याच्या पलीकडे काही नाही असा आमचा स्पष्ट आरोप आहे आणि याच्यावरती आमचा विरोध आहे आमचा विरोधाची नोंद यामध्ये घेण्यात यावा.

रिटा शहा :-

महापौर मॅडम माझा विषय आहे की मिरा भाईंदर महापालिकेमध्ये प्रथम आराखडा जेव्हा पास झाला त्याच्यामध्ये काही रिझर्व्हेशन आपण दिलेले होते किंवा आरक्षणाअंतर्गत पोस्ट ऑफिस नयानगर त्या आरक्षणाअंतर्गत कोर्टात झाले 127 ची नोटिस दिली पोस्ट ऑफिस बांधून द्यायला तयार होते. तरी सुध्दा 20 वर्षापासून तो माणूस रखडतो. पोस्ट ऑफिसने एन.ओ.सी. दिली त्या अंतर्गत मी सी.बी.आय ला तक्रार दिली होती त्याने 2 करोड रुपयांची मांग केली होती आणि त्याला रेड हँड पकडले. परंतु मिरा भाईंदर महापालिका प्रशासन केलेले आरक्षणावर काही विचार करत नाही. समोरचा व्यक्ती पोस्ट ऑफिससारखी वस्तु फुकटमध्ये बांधून द्यायला तयार आहे. आजपर्यंत 20 वर्षापासून ते आरक्षण येऊन बसलेले आहे मग हे आरक्षण टाकुन फायदा काय. मला हे तरी सांगा मॅडम कारण ज्या विकासकाचे आरक्षण आहे ते आरक्षण येऊन 20 वर्षापासून तुमच्याकडे पाठपुरावा करत आहोत. आम्ही बांधून द्यायला तयार आहेत परंतु प्रशासन जागे होत नाही. पाहिजे तर हा असे आरक्षण रद्द करा कारण ते 15 वर्षापासून तिकडे जागेवर बिल्डींग पडलेली आहे. पैसे भेटले नाही म्हणून एन.ओ.सी. त्याने रद्द केली. त्याला सी.बी.आय. ने रेड हँड पकडलेले आहे. माझी आज सभागृहाला विनंती आहे की ती बिल्डींग पास करुन त्या विकासकाला न्याय द्यावं मी कुठल्याही विकासकाच्या बाजूने बोलत नाही कारण त्याचा मी पाठपूरावा केला होता. सी.बी.आय इनव्हॉल्व्ह झाली होती त्याच्यामध्ये 2 करोड लाचलुचपत मागताना मी त्यांना रेड हँड पकडायला लावले होते. मग अस काय तरी विकासकाने असले जे काय भुखंड आहेत अशा लोकांचा पण विचार करावा मॅडम कारण नुसत ते आरक्षण घेऊन घरी बसुन राहतात त्यांची जागा नुसती बंजर करुन ठेवली आहे मिरा भाईंदर महापालिकेने.

मा. आयुक्त् :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, आता जे सन्मा. सदस्या रिटा शहा मॅडमने जो मुद्दा काढलेला आहे. सदर जागा ही पोस्टासाठी आरक्षित आहे. पोस्ट आणि टेलीग्राम हे केंद्र सरकारच्या अधिनस्त आहे. केंद्र सरकारच्या कंट्रोल हा विभाग येतो. आपण सांगितल्यानुसार सदर ठिकाणी

संबंधित विकासक हा सुप्रिम कोर्टात गेला होता. सुप्रिम कोर्टाने त्यांना डायरेक्शन दिलेले आहेत आणि त्यामध्ये नमुद केलेले आहे. पोस्टासाठी किंवा शाळेसाठी जर संबंधित माणूस बिल्डींग बांधून देत असेल तर तसा विचार करावा. परंतु पोस्ट हा विषय महापालिकेच्या अधिपत्याखाली नाही. हा विषय केंद्र सकरारच्या अधिपत्याखाली येत असल्यामुळे त्या विषयावर पोस्टाची घेणे त्याच्यावर बंधनकारक आहे आणि याच्याही पुढे जाऊन गेली 20-20 वर्ष पोस्ट त्याचा उपयोग करत नसेल तर आम्ही आपले टाऊन प्लानिंगचे जिथे डी.पी. म्हणतो त्याठिकाणी लिहिले आहे की सदर ठिकाणचे पोस्ट रिझर्व्हेशन रद्द करण्यात यावे. प्रशासनाकडून करायची कार्यवाही ह्यापूर्वीच करण्यात आलेली आहे.

रिटा शहा :-

प्रशासन कारवाई करणार मग केंद्र सरकारला ही सर्व बाब जे काही घडल ते कळवणार कोण साहेब? याच्यामध्ये सी.बी.आय त्यांच्या पोस्टाचा एवढा अधिकारी जो पूर्ण देशामध्ये तीन वेळा प्रमोशनला होता त्या माणसाला रेड हँड पकडलं त्यानंतर ह्या सर्व गोष्टी केंद्र सरकारलाही माहित आहेत. म्हणजे विकासक काय नुसती जागा घेऊन बसुन राहणार का? केंद्र सरकार सांगते स्टेट गर्व्हमेंटचे काम आहे स्टेट गर्व्हमेंट सांगते लोकल गर्व्हमेंटचे काम आहे. मग शेवटी विकासकाने जायचं कुठे? सुप्रिम कोर्टापर्यंत माणूस जाऊन आला 15 वर्षापासून जागेवर बसलेला आहे तो स्वत: ॲडव्होकेट आहे. मग त्याच्या बद्दल न्याय कोण करणार?

मा. आयुक्त् :-

कदाचित आपण मॅडम सुप्रिम कोर्टमध्ये गेला आहे सुप्रिम कोर्टाचे डायरेक्शन कदाचित आपल्या परिपूर्ण माहित नाही असे दिसत आहे आणि आपण म्हणत आहात की केंद्र सरकारला कळवणार कोण. केंद्र सरकारचा अधिकारी जर सी.बी.आय च्या लाचलुचपत प्रतिबंध विभागाने पकडला असेल तर त्याअर्थात त्यांचा अधिकारी त्यांना ते माहित असते. महापालिकेने किंवा महाराष्ट्रातले राज्य सरकारने कळवण्याचा प्रश्न उद्भवतो कुठे? त्यांचे अधिकारी कर्मचारीवर जर सी.बी.आय ने कारवाई केली असेल तर महापालिकेने इनव्हॉल्व होण्याचा प्रश्न येतो कुठे? एवढे वर्ष आपल्यास निगडीत नाही आणि सुप्रिम कोर्टचे जे डिसीजन आहेत ते आपण परिपूर्ण वाचलेले नसावेत असे मला वाटते. आपल्याला कॉपी उपलब्ध करुन द्यायची मी व्यवस्था करतो.

रिटा शहा :-

साहेब मी प्रशासनावर आरोप करत नाही.

मदन सिंग :-

महापौर मॅडम मी आपल्या परवानगीने बोलतो हा जो आता इथे विषय आला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे खारी क्र. सर्व्हे क्र. 154,51,53 ह्या क्षेत्रामधील आरक्षण क्र. 102 बगीचा आरक्षण विद्यमान इमारतींना वगळण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदलाची कारवाई करणेबाबत. महापौर मॅडम आणि आयुक्त साहेब हा विषय गेल्या 5 वर्षात महासभेत ह्या सभागृहात 4 वेळा आला. कोण आणि कोण काहीतरी विषयाचा घोळ करतो. सभागृहाची दिशाभूल करतो. ह्या विषयात अजून काही मिस्टेक करतात. इथे फक्त हा विषय आहे ओत्स्वाल पार्क बिल्डींग नं. 5,6,7 आणि निशाण त्यांना न्याय देण्यासाठी आणि आता काही सदस्यांनी सांगितले की आरक्षणामध्ये बिल्डींग बांधलेली साहेब ही बिल्डींग आरक्षणामध्ये बांधलेली नाही. बिल्डींग असल्या बांधल्यानंतर त्याच्यावर आक्षरण टाकण्यात आलेले आहे मेन हा मुद्दा आहे आपले आरक्षण डी.पी. 1970 मध्ये झालेला आहे आणि ह्या इमारती उभ्या झालेल्या आहेत 1992-93 मध्ये दुसरं एकतर फक्त ह्या 4 बिल्डींगचा विषय आहे. हा चार वेळा विषय आलेला आहे. तर त्या चार बिल्डींगला न्याय देण्यात यावा मिरा भाईंदरच्या बाकीच्या बिल्डींग आहेत. त्यांना पण न्याय देण्यात यावा. पण ह्या विषयामध्ये त्यांना घुसविण्यात येऊ नये आता जसा विषय आहे 4

बिल्डींगसाठी त्यांना फक्त न्याय देण्यात यावा बाकीचे विषय वेगळे आणण्यात यावे वेगळा त्यांना न्याय देण्यात यावा ही माझी सुचना आहे.

रोहिदास पाटील :-

महापौर मॅडम, हा जो विषय आला हा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. आपण कोणासाठी काय व्यवहार करतो असा विषय नाही. कोणावर अन्याय करतो असा नाही पण हेच सभागृहाने केलेले पाप आहे ते पाप आपण सुधारायचे काम करत आहोत. हे एवढ्यासाठीच मी सांगतो. मगाशी खुलासा झाला आधी बिल्डींग बनल्या आणि त्याच्यावर नंतर आरक्षण टाकले गेले साहेब. त्यावेळी टेबल सर्व्हे होते दिशाभुल झाली असेल इथपर्यंत आपण मान्य केलं नंतर जेव्हा विषय लक्षात आला त्याला 10 वर्ष झाली. ज्यावेळी आरक्षण क्र. 102 ची पुन्हा नविन रिव्हाईज केलं. रिव्हाईज करते वेळी ते असल्यारोजी नकली वगळायला पाहिजे होते आपले आयुक्त साहेब आपण त्यावेळी नव्हते. पण कोणीतरी अधिकारी होते ज्यांनी साईट व्हिजीट केली होती जेव्हा बिल्डरने विकासकाने हा प्लान इथे सबमिट केला तर जागेवर परिस्थिती काय आहे त्याची जागा जेव्हा आपण सोडतो त्यावेळी हे नक्की निश्चित व्हायला पाहिजे होते की जी जागा तुम्ही आरक्षित दाखवता 4100 ही 4100 जागेवर 4 इमारती ज्या आहेत आणि त्याच विकासकाने त्या बांधलेल्या आहेत. ह्या विकासकाला आपण सभागृहामध्ये त्याला फार का करतो हे तथ्य आहे सगळ ओके ओके असे नाही साहेब त्यात तथ्य आहे. जस विधान संकेत चालले आहे तसे ओके तशातला हा विषय आला. हा ओकेचा विषय नाही. हा विषय साहेब स्पष्ट 4 बिल्डींग वगळायचा तर दुसऱ्या इमारतीला मिरा भाईंदरचा प्लान हा याच्यात मिक्स करु शकत नाही आणि मिक्स घ्यायचा असेल तर पुन्हा त्या 4 बिल्डींग मधल्या लोकांना आपण पुन्हा वाऱ्यावर सोडत आहोत किंवा दिशाभूल करत आहोत त्यांना नाराज करतो असेच आहे. त्यातली 9 माणसं साहेब ही मागणी करता करता मेली मयत झाली. सुदैव एवढेच आहे की त्यातली एकही बिल्डींग कोसळत नाही. अपघात होत नाही म्हणून त्यांना मोठे गांभिर्य येत नाही. पण ही जर गर्व्हमेंट करत असेल तर ती रिडेव्हलपमेंट होऊ शकत नाही. सभागृहाला आमची विनंती आहे त्याचबरोबर त्या विकासकाचेही मी सांगतो साहेब आता गेल्या वेळी अख्या सभागृह त्या विकासकाबद्दल बोलत होतं आता का बोलत नाही मला समजत नाही. पण हे खर आहे की त्या विकासकाने..........

मा. महापौर :-

ह्याच्यानंतर आपली दुसरी मिटींग आहे विशेष महासभा आहे मला वाटते हा विषय चर्चा बहुतेक झालेली आहे.

दिनेश नलावडे :-

महापौर मॅडम हा विषय आलेला आहे. त्याचपध्दतीने माझ्या प्रभागामध्ये यशवंतराव चव्हाण उद्यान आहे ते गार्डनचे आरक्षण होतं त्या वेळेला हे आरक्षण पडायच्या अगोदर त्याही ठिकाणी काही बिल्डींग आमच्याकडे तयार झालेल्या आहेत त्याही आरक्षणामध्ये अडकलेल्या आहेत त्यांना देखील ह्याच पध्दतीने न्याय द्यावा ही माझी सुचना आहे.

मा. महापौर :-

जरुर.

दिनेश नलावडे :-

फक्त 4 बिल्डींगसाठीचा हा विषय नसून इतर ठिकाणी त्या लोकांना देखील त्याचा लाभ मिळावा मी आपल्याला विनंती करतो महापौर मॅडम.

रोहिदास पाटील :-

आयुक्त साहेब त्या ठिकाणी जी ओत्स्वाल दर्शन म्हणून जी बिल्डींग बांधली आम्ही तुम्हाला पुन्हा पुन्हा पत्र दिलं की त्या ठिकाणच्या ओत्सवालचं आऊटलेट कुठे आहे सांडपाण्याची व्यवस्था काय

आहे आरक्षण क्र. 102, सर्व्हे नं. 153 हिस्सा नं. 2 ही त्यांची जागा नसताना सुध्दा त्या जागेमध्ये बांधकाम झालं त्याच्या आम्ही तक्रारी केल्या त्याच्यावरही कोणता निर्णय होत नाही साहेब. आज सुंदर चालणारे जेसलपार्क हे सिवरेज प्लांटमुळे बदनाम होत चालले आहे. आम्हाला एवढेच सांगायचे आहे की ज्याठिकाणी वन प्लस टू ची बिल्डींग होती. ज्या ठिकाणी तुम्ही 14 माळ्याची परवानगी देता तर त्या विकासकाला हे बंधन आहे किंवा नाही की त्यातून निघणारे मलमुत्र त्यातून नेणारी पाईप लाईनची कॅपेसिटी आहे की नाही ती महापालिका बनवणार आहे, विकासक बनवणार आहे की कोण बनवणार आहे. अदरव्हाईज जी लोक वर्षानुवर्ष शांत राहत होती निवांत राहत होती त्यांचे सगळ्या ठिकाणी आता तर गणपतीचा मंडप चालू झाला सुर्देवाने गणपतीची कृपा ती पाईप लाईन परत जाम झाली नाही पाहिजे. दरवर्षाचा असा अनुभव आहे की त्या ठिकाणी गणपतीचा कार्यक्रम मध्येच ती पाईप लाईन चॉकअप होते पण ती साफसफाई होत नाही. माझी विनंती आहे की त्यांना आयुक्त साहेब ह्या विषयात तुम्ही लक्ष घाला असे अनेक ठिकाणचे आपले एस.टी.पी. प्लांट ह्या विकासकांच्यामुळे फेल होत चालले आहेत.

मा. महापौर :-

मला वाटते ठराव वाचलेला आहे ठराव झालेला आहे. ठराव सर्वानुमते मंजूर. पुढचा विषय घ्या.

दिनेश नलावडे :-

महापौर मॅडम हा विषय फक्त 4 बिल्डींगचा आलेला आहे ह्या शहरामध्ये बाकीचे बिल्डींग.....

मा. महापौर :-

आयुक्त महोदय उत्तर द्या.

मा. आयुक्त :-

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, शहरात नविन डी.पी. जे रिव्हाईज करण्याचे काम सुरु आहे त्या रिव्हाईज डी.पी. मध्ये आता जो उल्लेख केलेला विषय क्र. 37 जो विषय आहे. त्या विषयासकट सन्मा. नगरसेवक नलावडे साहेब आणि इतर सर्व सदस्यांनी ज्या ज्या सुचना मांडल्या आहेत त्या सर्वांवर डी.पी. मध्ये काम सुरु आहे. यशवंतराव चव्हाण गार्डन असेल, ओत्सवालचे असेल, शहरातील रस्ते असतील किंवा इतर कुठल्या गार्डन असतील, स्मशानभुमी असेल हे सगळे बदल ह्यापूर्वी झोल्या चुका ज्या त्रुटी आहेत त्या त्रुटी सुधारण्यासह नविन जे डी.पी. चे काम चालले त्यात ज्या ज्या सुचना केलेल्या आहेत ते ऑलरेडी प्रशासनाने अभ्यास करुन ह्यापूर्वी घेतलेल्या आहेत. जेव्हा नविन डी.पी. पब्लीश होईल त्यामध्ये हे सर्व बदल बदलासह व्यवस्थित पब्लिश झालेला असेल.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम ह्या ठरावाला आमचा विरोध आहे.

मा. महापौर :-

विरोध नोंदवून घ्या.

गिता जैन :-

साहेब माझा विरोध एवढाच आहे की ह्या ठरावाची गरजच नाही. मुळात ह्या ठरावाचीच गरज नाही जे काम झालेले आहे ते तुम्ही कशाला ठराव आणून दाखवायचे की आम्ही करतो. हे ऑलरेडी झालेली आहे ते इथे आणायचे काय.

मा. महापौर :-

चांगली गोष्ट आहे डी.पी. त घेतले आहे. पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. 38 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे खारी स.क्र.१५४, १५१, व १५३ या क्षेत्रावरील आ.क्र.१०२ (बगीचा) आरक्षणातून विद्यमान इमारतींना वगळण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेबाबत.

ठराव क्र. 41 :-

मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील भाईंदर (पु.) मौजे खारी स.क्र.१५४, १५१, व १५३ या क्षेत्रावरील आ.क्र.१०२ (बगीचा) आरक्षणामध्ये काही जागेत ओस्तवाल पार्क बिल्डींग क्र.5,6 व 7 व निशांत को.ऑ.हौ.सो. या इमारती ग्रामपंचायत काळापासून अस्तित्वात आहेत व पूर्णपणे रहिवास व्याप्त असल्यामुळे सदर जागेत बगीचा विकसीत करणे शक्य होणार नाही. त्यामुळे सदरची रहिवास व्याप्त जागा आरक्षण क्र.102 (बगीचा) आरक्षणांनी बाधित झालेल्या विद्यमान इमारतींचे क्षेत्र वगळणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये कार्यवाही करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

तसेच संपूर्ण मिरा भाईंदर शहरात विकास योजना अंमलात आणण्यापूर्वी ग्रामपंचायत व नगरपरिषद काळापासून बनलेल्या अनेक इमारती महापालिकेच्या विविध आरक्षणामध्ये बाधित झालेल्या आहेत. मा. महासभा दि.23/06/2021 रोजी ठराव क्र.24 प्रमाणे प्रशासनाने आरक्षणामध्ये बाधित झालेल्या इमारती आरक्षणामधुन वगळण्याचा प्रस्ताव मा. महासभेत सादर करावा.

सुचक :- श्रीम. शानु गोहिल                अनुमोदक :- श्री. गणेश भोईर

ठराव बहुमताने मंजुर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 39, सन्मा. सदस्य श्री. सुरेश खंडेलवाल यांचा दिनांक २८/०७/२०२२ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- महापालिकेमार्फत पोटपाळ्यास होणाऱ्या कर आकारणीबाबतचा योग्य निर्णय घेणेबाबत.

सुरेश खंडेलवाल :-

सभागृहनेते तुमचा सन्मान आहे. पण ह्या विषयासाठी मी माझी सकाळची 10.7 ची फ्लाईट कॅन्सल केली कारण की मी ज चा प्रस्ताव पोटमाळ्याचा शहराचा व्यापाऱ्यांसाठी, लोकांसाठी सर्वांसाठी हा मी पहिल्यांदा 5 वर्षामध्ये ज चा प्रस्ताव घेतलेला आहे. म्हणून जरा मला 10 मिनिटे जरा बोलण्याची संधी ह्या विषयामध्ये मिळावी.

दिनेश नलावडे :-

सर्वांना संधी द्यावी लागेल एकाला दिली तर मला पण द्यावी लागेल.

सुरेश खंडेलवाल :-

सर्वांना द्या. माझा ठराव सुध्दा आहे ह्या विषयामध्ये.

दिनेश नलावडे :-

महापौर मॅडम जर एकाला संधी दिली तर सर्वांना द्यायला लागेल आणि आता लगेच आपली दुसरी सभा आहे त्यानंतर आमचे आता जैन धर्माचे पर्युषण पर्व चालू आहे. त्यासाठी मी सर्व मिरा भाईंदर शुभकामना देतो.

प्रशांत दळवी :-

आपण आता 12.30 वाजता दुसरी महासभा लावलेली आहे.

सुरेश खंडेलवाल :-

दुसरी मिटींग काही होणार नाही. ही शेवटची महासभा महापौर मॅडम मी ज चा प्रस्ताव दिलेला आहे. तो माझा अधिकार आहे. हा ज चा प्रस्ताव शहराच्या हितासाठी.............

मा. महापौर :-

सर्व सन्मा. सदस्यांना विनंती आहे की आपण जेव्हा वेळ चर्चेमध्ये घालवतो तेवढ्या वेळामध्ये ज चा प्रस्ताव होऊन जाईल. आणि बाकीच्यांनी त्याच्यामध्ये जास्त चर्चा करु नका. ज्याने ज चा प्रस्ताव मांडलेला आहे त्याला बोलू देत.

सुरेश खंडेलवाल :-

महापौर मॅडम प्रशासनाने पूर्ण शहरामध्ये आपण जेव्हा ही एजन्सी नेमली होती की मिरा भाईंदर शहरामध्ये जे बांधकाम ॲडीशनल बांधकाम ज्या ज्या लोकांनी केलेले आहे त्यांच्या सर्व्हे करायचा आणि त्यांच्यावर प्रशासनाने टॅक्स लावला. महापौर मॅडम माझा एक आक्षेप असा आहे की प्रशासनाने पोटमाळ्याचा टॅक्स, सरसकट पूर्ण शहरामध्ये इंडस्ट्रीज असु द्या की कार्पोरेटचे दुकान असु द्या पोटमाळ्याचा टॅक्स प्रशासनाने 6-6 वर्षाचा सर्वांना दिढ दोन लाख अडीच लाख रुपये सर्वांना पाठवलेला आहे आणि आयुक्त महोदय पोटमाळ्याचा जो टॅक्स आहे तो 6 वर्षाचा लावला आणि त्याच्यामध्ये कोरोनाचा पिरेड होता त्याचा पण त्यांना शास्तीसकट अडची तीन लाख रुपयाचा टॅक्स लावून सर्वांना पाठवला. महापौर मॅडम प्रकरण क्र. 62 दि. 20/2/2018 ची महासभेमध्ये आम्ही एक ठराव केला होता ज्याच्यामध्ये आम्ही टॅक्सचे रेट दर ते आपण शहरामध्ये सामान्य करामध्ये ठरावामध्ये पोटमाळ्याचा याच्यात समावेश नाही आपण टॅक्सचे दर ठरवले होते. माझे थोडक्यात एकच म्हणणे आहे की पोटमाळ्याचे कर आपण महासभेमध्ये कुठलाही निर्धारीत न करता कुठलाही डिसीजन न घेता आपण 6-6 वर्षाचा सर्व इंडस्ट्रीज वाल्यांना किंवा मालमत्ता धारकांना जे आपण टॅक्स पाठवलेला आहे तो कुठेतरी त्यांच्यावर अन्याय आहे. अन्यायाचे कारण असे आहे की एकदा आपण महासभामध्ये असे पास केलं की आपण कोरोनाच्या काळामध्ये 100 टक्के त्यांना सुट द्यावी. पण आता जे टॅक्सचे बिल आले आहेत त्याच्यामध्ये कोरोना काळ पण इन्क्लुड आला आहे आणि त्याच्यामध्ये शास्ती सुध्दा लावलेली आहे. पोटमाळा एक्सपर्ट डि.सी. रुलमध्ये ते फ्री ऑफ एफ.एस.आय. असतो म्हणजे त्याला कुठल्याही पोटमाळ्याच्या परमिशनची गरज नसते. महापौर मॅडम शास्तीसकट 6-6 वर्षाचा टॅक्स आपण सर्वांना लावून पाठवलेला आहे. माझी सभागृहाला आणि महापौ मॅडम आपणांस अशी विनंती आहे की, आपण पोटमाळ्यासाठी रेट महासभेमध्ये कधीही आपण फायनल केलेले नाही. पोटमाळ्यासाठी आपण रेट केलेले नाहीत. घरामध्ये पण पोटमाळे असतात. त्याच्यावर आपण पाण्याची टाकी करतो. त्याला पण आपण टॅक्स लावणार का? आता अशी परिस्थिती झालेली आहे की, इंडस्ट्रीमध्ये पोटमाळ्याचा लोक वेगवेगळ्या पध्दतीने वापर करतात. कोणी त्याचा वापर लेबर झोपण्यासाठी करतो. कोणी स्टोरेजसाठी करतो. पण आपण सर्वांनी सरसकट प्रशासनाने सर्वांना एकसारखा टॅक्स लावून बिले पाठवलेली आहेत. तर माझी एकच विनंती आहे की, पोटमाळ्याला आपण कर रेट डिसीजनचा अधिकार महासभेचा आहे. महासभेने अजून त्याला रेट डिसीजन दिलेले नाहीत. तरी पण प्रशासनाने कुठल्या आधारे त्यांना कर आकारणी केलेली आहे. फक्त मला अधिकारी महोदयांनी एवढं सांगाव की महासभेचा विदाऊट कर टॅक्स रेट फायनल किए बिना उन्होने कर कैसे लगाया? महापौर मॅडम ऑलरेडी मी प्रशासनाला पत्र दिलेले होते की ह्या पोटमाळ्याचा दर निश्चितीसाठी गोषवारा महासभेपुढे द्या. पण प्रशासनाने माझ्या पत्राची दखल घेतली नाही. मी त्यांना पत्र दिले होते की पोटमाळ्याचे रेट डिसाईड करा. महापौर मॅडम दुकानाला जे रेट लावतो तेच रेट आपण पोटमाळ्याला लावू शकतो का? फ्री ऑफ एफ.एस.आय. जे आहे त्याला आपण.......

मा. महापौर :-

आपले बोलून झाले असेल तर प्रशासनाला मी सांगू इच्छिते की, सन्मा. सदस्य खंडेलवालजीने जो “ज” चा प्रस्तावा मांडलेला आहे ह्याबाबत प्रशासनाने योग्य ते तपासून कार्यवाही करावी.

सुरेश खंडेलवाल :-

मॅडम एकदा जर प्रशासनाने खुलासा केला की विदाऊट आपण पोटमाळ्याचे दर आपण निश्चित केले नाहीत. आपण टॅक्स लावला कसा?

मा. महापौर :-

याबाबत आयुक्त महोदय आपण खुलासा करावा.

सुरेश खंडेलवाल :-

आपण फक्त इन्कम सोर्ससाठी बिल पाठवलेले आहे साहेब करोना काळामध्ये पण बिल पाठवलेले आहे. आणि जे डी.सी. रुलमध्ये फ्री ऑफ एफ.एस.आय. आहे त्याला पण आपण शास्ती लावून पाठवलेली आहे. मग एवढ्या लोकांवर आपण का अन्याय करतोय?

संजय शिंदे (उपायुक्त) :-

सन्मा. महापौर मॅडम, ह्या ठिकाणी सन्मा. सदस्यांनी जो प्रस्ताव आणलेला आहे त्याबाबत मी निवेदन करु इच्छितो की, मिभामनपाचे टॅक्स कसे लावले आणि टॅक्सचे रेट काय असावे ह्याबाबत 20 फेब्रुवारी 2018 रोजी ठराव झालेला होता. त्या ठरावाच्या अनुषंगाने शहरातील वेगवेगळे झोन नुसार आपण टॅक्स लावण्याचे रेट निश्चित केलेले होते. त्याच्यामध्ये इमारतीचा प्रकार दिलेला होता आर.सी.सी., लोडबेरींग, सिमेंट, कौलारु, माती, विटा, लाकडी पाटीच्या भिंती, झोपडी, कापड्यांच्या भिंती आणि ह्यामध्ये दोन प्राकर केलेले होते. एक रहिवाशी आणि एक बिगर रहिवाशी ह्या ठरावाच्या अनुषंगाने महासभेच्या मान्यतेने आपण कोलाब्रो नावाची कंपनीचा ठेका निश्चित केला होता. त्या कंपनीने आपल्या शहरातल्या विविध ठिकाणच्या प्रॉपर्टीचा सर्व्हे केला आणि सर्व्हेअंती साधारणत: आतापर्यंत आपल्याकडे 3 लाख 28 हजार प्रॉपर्टी टॅक्सचा सर्व्हे झालेला आहे. त्या सर्व्हेमध्ये आपल्याला असे आढळले की काही प्रॉपर्टी ह्यानंतर वाढीव बांधकाम केलेले आह आता मुद्याच्या अनुषंगाने डायरेक्ट तिथे उत्तराकडे येतो. आपल्या कर आकारणीमध्ये जो सर्व्हे झाला त्याच्यामध्ये 742 इंडस्ट्रीयल मालमत्ता आपल्याला आढळून आल्या त्यापैकी 398 ह्या इंडस्ट्रीज ज्या आहेत त्या स्मॉलस्कील इंडस्ट्रीज त्यांनी पोटमाळे वाढविलेले आहेत. आता पोटमाळा वाढविल्यानंतर त्या पोटमाळ्यांचा आपण जर वापर बघितला तर जसा खाली वापर केला जातो तसाच पूर्णपणे त्या पोटमाळ्याचा वापर आहे. काही जणांनी वरती ऑफीस खोलले नाही. लोकांनी छोट मशिन बसविलेल्या आहेत. काही जणांनी माल स्टोरेज केलेला आहे. अशाप्रकारे त्या पोटमाळ्याचा वापर सुरु झालेला आहे. मनपा अधिनियमानुसार ज्या प्रॉपर्टीचा वापर सुरु होतो त्याला प्रॉपटी टॅक्स लागणे क्रमप्राप्त आहे आणि आपल्या अधिनियमामध्ये 150(अ) खाली तरतुद आहे. जर मालमत्ता धारकाने समोरुन आपल्याकडे टॅक्स लावा असा अर्ज केला नसेल आणि मनपाला जर आढळून आले असेल जे त्याने वाढीव केलेले आहे किंवा त्याची प्रॉपर्टी वापरात आहे तर आपल्याला 6 वर्ष मागे जावून टॅक्स लावण्याचा अधिकार आहे. त्यानुसार मनपाने त्यांना नोटीस पण दिलेल्या होत्या. त्यांच्या सुनावणी घेतल्या होत्या. सुनावणी अंती निकाल काढून त्यांना आपण प्रॉपर्टी टॅक्सचे असेसमेंट केलेले आहे. यामध्ये मनपाचा जो काही ठराव झालेला होता त्या ठरावाच्या अनुषंगानेच कार्यवाही केलेली आहे. परंतु सन्मा. सदस्यांनी सांगितले की त्या ठरावामध्ये पोटमाळ्याचे दर निश्चित केलेले होते. हे बरोबर आहे. पोटमाळ्याचे दर जरी निश्चित केलेले असले तरी कैलारु, सिमेंट ह्या ज्या प्रकारे आपण वर्गीकरण करुन दिले होते त्या अनुषंगाने प्रशासनाने मालमत्ता कराची आकारणी केलेली आहे आणि ती योग्य आहे. यामध्ये कोण इंडस्ट्रीयला हरकत असेल तर आता सुध्दा ते हरकत दाखल करु शकतात. त्याच्या

हरकतीची आम्ही सुनावणी घेवून जर खरच कालावधी त्यांचा 6 वर्ष नसेल आणि ते सिध्द करत असतील तर आपण त्याचा टॅक्स कमी करु शकतो.

सुरेश खंडेलवाल :-

महापौर मॅडम आता शिंदे साहेबांनी खुलासा दिला त्याच्यामध्ये साहेब आता दोन तीन विषय जे आपण मांडले एकतर आपण पोटमाळा म्हणजे जे आपण सिमेंट, कौलारु ते आपण जे वेगवेगळे प्रकार आहेत त्याच्यामध्ये आपण समाविष्ट करुन घेतले. पोटमाळा वेगवेगळे असतात मोटमाळ्यावर जसे आपण बोलले की लोक स्टोरेजसाठी पोटमाळ्याचा वापर करतात. डी.सी रुलमध्ये शॉपमध्ये पोटमाळा फ्री ऑफ कॉस्ट एफ.एस.आय आहे आणि ते स्टोरेजसाठी आहे. आपण काय केलं मी तुम्हाला पाहिजे तर असे 10-20 उदाहरण देऊ शकतो की आपण सर्वांना सरसकट पोटमाळ्याला एका सारखा टॅक्स लावला आहे. साहेब माझी विनंती फक्त एकच आहे आयुक्त महोदय पोटमाळा जो वापर करतो त्याला टॅक्स लावला आणि ते क्रमप्राप्त आहे आणि आपण आपला अधिकाराचा वापर केला पण जो पोटमाळ्याला स्टोरेजसाठी वापर करतो वापराचे वेगवेगळे प्रकार असतात ना. आपण सर्वांना सरसकट मी तुम्हाला उदाहरण सांगतो आणि बरेचसे केसेस असे आहेत मॅडम नंतर हेरिंग लाऊन त्यांचे वगळले आणि जे नाही लावले त्यांचे चालू आहे. आणि आपण मिरा भाईंदर शहरामध्ये आयुक्त महोदय जे इंडस्ट्रीज आहेत मी ना सांगतो माहित आहे की जी स्टील इंडस्ट्रीज एशियामध्ये मिरा भाईंदरमध्ये नंबर वन होते. मिरा भाईंदर आता परिस्थिती अशी झाली महापौर मॅडम आपण दोन तीन लाख रेटचे आपण बिल पाठवतो किंवा कुठेतरी आपण विदाऊट...................

मा. महापौर :-

खंडेलवालजी आपला आता वेळ.

सुरेश खंडेलवाल :-

महापौर मॅडम मी डायरेक्ट आता ठराव करतो. त्या ठरावाच्या अनुषंगाने जर आपल्याला वाटत असेल की पोटमाळ्याला आपण कशी किती आपल्याला टॅक्स लावावा तर सर्वांनी संमती द्या नाहीतर विषय संपला मॅडम माझ एकच म्हणणे होते की पोटमाळ्याचे आपण दर निश्चित केले नव्हते. पोटमाळ्याचे दर प्रशासनाने जे कौलारु किंवा सिमेंटचे वेगवेगळे जे आहेत त्यांच्या हिशोबाने 6 वर्षाचा लावला आणि आता साहेब जसे बोलले की मी आता त्यांना सांगणार की मी गेल्या वर्षी बनवला होता त्याचे काय बील, पुरावे द्यायचे मला फक्त सिमेंटचे बील किंवा ह्या विटाचे बील काय द्यायचे ते बीलचा जो विषय आहे मॅडम ते होत नाही. कितीही केलं आपण 6 वर्षाचे कोणी गुगल मॅप किंवा फोटो कोणी ठेवलेले नाही की मी कधी बांधले. तो विषय कॉमन आहे. पण मला जास्त बोलायचे नाही शॉर्टकटमध्ये एवढेच आहे की माझा याच्यामध्ये एक ठराव पोटमाळ्याचा रेट जे आपण लावला आहे तो खुप जास्त आहे. त्याच्यासाठी मी माझा ठराव करतो. साहेब मला सांगा 66 फुटावर शास्ती नाही आहे डी.सी. रुलमध्ये पोटमाळ्याचा फ्री ऑफ एफ.एस.आय. आहे. त्याला 6-6 वर्षाची आपण शास्ती लावून लोकांना 2-3 लाख रुपये टॅक्स आपण पाठवलेला आहे. नंतर आपण त्याची हेरींग घेतो नंतर त्यांनी कमी करतो. मी माझा स्वत:चा साहेब पहिला मी दिलेला तुम्हाला पाहिजे तर मी ऑफिशिअली माझ्याकडे रेकॉर्ड आहे. एक वर्ष पहिला मी निवेदन दिले आहे.

मा. महापौर :-

प्रशासनाने तपासून कारवाई करावी. याच्या संदर्भामध्ये असे काही आढळून आले ह्या शहरामध्ये झालेले असेल त्यांनी म्हटल्याप्रमाणे त्यावर तपासून कारवाई करावी.

सुरेश खंडेलवाल :-

महापौर मॅडम माझा ज वर एक ठराव आहे.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम माझी विनंती आहे आपण सन्मा. सदस्य खंडेलवाल साहेबांचा प्रस्ताव आपण व्यवस्थित ऐकलेला आहे. ऐकून घेतलेला आहे. त्याअनुसार आपण प्रशासनाला रुलिंगही दिलेली आहे आणि त्यामुळे महापौर मॅडम इथे ठराव करायची काही गरज नाही खंडेलवाल साहेब.

सुरेश खंडेलवाल :-

महापौर मॅडमने काय रुलिंग दिली आपण पोटमाळ्याचे दर महासभेमध्ये अजूनपर्यंत दर निश्चित केलेले नाहीत तर तो आपला महासभेचा अधिकार आहे. पोटमाळ्याचे जे बील दोन तीन लाख रुपये सर्वांना पाठविलेले आहे. त्याच्यामध्ये आपल्याला दर निश्चित केला पाहिजे की नाही केला पाहिजे? तेच मी सांगत आहे की महासभेमध्ये रेट निश्चित करा विषय संपला.

प्रशांत दळवी :-

प्रस्ताव रितसर आल्याशिवाय आपण कस काय ठरवणार?

सुरेश खंडेलवाल :-

प्रस्ताव कधी येणार?

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य खंडेलवालजी आपण जी मागणी केलेली आहे त्या पध्दतीने मी रुलिंग दिलेली आहे मग ठराव कशाला वाचता?

सुरेश खंडेलवाल :-

मॅडम माझ्या प्रस्तावावर रुलिंग द्या विषय संपला.

मा. महापौर :-

रुलिंग दिली.

सुरेश खंडेलवाल :-

मी ठराव करतो रुलिंग द्या विषय संपला. ठरावावर रुलिंग दिली. महापौर मॅडम असे ज चे ठराव 5 वर्षामध्ये अनेकदा झाले टाऊन प्लानिंगमध्ये झाले कोणत्याही विषयामध्ये ज चे ठराव झाले मी ज चा ठराव करतो तुम्ही रुलिंग द्या फक्त आम्ही रेटचे बोलत आहे की आता जे आपण रेट लावले आहेत त्यांचा 25 टक्केच्या हिशोबाने त्यानंतर आकारणी करावी आणि त्यांची शास्ती काढून टाकावी बस विषय संपला. ठराव करुन घ्या.

मा. महापौर :-

आपला विषय खुप चांगला आहे असे पाटील साहेब म्हणत आहेत.

सुरेश खंडेलवाल :-

पाटील साहेब नाही सर्वांना चांगला वाटला असेल.

धृवकिशोर पाटील :-

प्रशासनाने ज्या इंडस्ट्रीज आहेत त्या इंडस्ट्रीज करीता हा टॅक्स जो लागलेला आहे हा शास्तीसह लागलेला आहे म्हणून माझी महापौर मॅडम आपणास विनंती आहे की प्रशासनाने व्यवस्थित रितसर गोषवारा सादर करावा आणि महासभेने निर्णय घ्यावा आणि पोटमाळ्याचा जो रेट आहे तो रेट डिसाईड करुन मिरा भाईंदर शहरातील इंडस्ट्रीज आपण वाचवुया आणि लोकांना आपण न्याय देऊ या.

सुरेश खंडेलवाल :-

महापौर मॅडम माझी एक विनंती आहे मी ज चा प्रस्ताव मांडला आहे मी माझा ठराव करणार.

मा. महापौर :-

तुम्ही ठराव मांडा.

सुरेश खंडेलवाल :-

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महासभा ठराव क्र. 60, दि. 20/02/2018 अन्वये मालमता कर आकारणीकरीता भाडे मुल्याचे निवासी / बीगर निवासी वापराकरीता दर निश्चित करुन मंजूरी दिलेली आहे.

मात्र, सद्यस्थितीत मालमत्ता कर विभागामार्फत पोटमाळ्यास कर आकारणी केली जात असून त्याकरीता उक्त ठरावाद्वारे निश्चित केलेल्या भाडे मुल्याचे दराने आकारणी केली जात आहे. वास्तविक पाहता विकास नियंत्रण नियमानुसार पोटमाळ्याचे क्षेत्रासाठी Free FSI देण्यात येत आहे. तसेच सदरचे पोटमाळ्याचा बहुतांश वापर कामगार वर्गाला राहण्यासाठी, झोपण्यासाठी केला जातो. काही ठिकाणी त्याचा वापर गोडाऊन म्हणूनही होतो.

तरी, पोटमाळ्यास मा. महासभा ठराव क्र. 60, दि. 20/02/2018 अन्वये मंजुर केलेल्या भाडे मुल्याचे 25% दराने कराची आकारणी करण्यात यावी. तसेच पोटमाळ्यास केवळ सामन्य कर आकारुन इतर कर व शास्ती आकारु नये असा मी ठराव मांडत आहे.

डॉ. सुशिल अग्रवाल :-

माझे अनुमोदन आहे.

सुरेश खंडेलवाल :-

यांची सुचना आहे ही सुचना घ्या की जे जुने बील दिलेले आहेत ते रद्द करावेत.

अशोक तिवारी :-

महापौर मॅडम अभी यह जो ठराव हुआ उसमें मेरी एक सुचना है की स्लम में भी कही 40 हजार कही 80 हजार कही 60 हजार एक लाख 20 हजार गरीबो को आया है भरने के लिए तो अभी उनकी वसुली रुकाई जाए और आगे इसपे भी विचार किया जाए|

मा. महापौर :-

खंडेलवालजी आपल्या ठरावामध्ये त्यांची सुचना घेण्यासाठी आपली मान्यता आहे का?

सुरेश खंडेलवाल :-

मान्यता आहे मॅडम.

मा. महापौर :-

खंडेलवाजीच्या ठरावामध्ये सन्मा. सदस्य तिवारीजी यांची सुचना नमुद करावी.

सुरेश खंडेलवाल :-

सर्वांचे विषय एकच आहेत पोटमाळ्यासाठी दर जे आहेत आता जो टॅक्स लावतो खुप जास्त रेट आहे. त्याला आपण फक्त टॅक्सचा रेट आहे ते निदान केलेले आहे आणि जुने जे बील आपण पाठविलेले आहेत ते पण रद्द करावे. कारण की आपण पॉलिसी डिसीजन आता घेत आहोत आणि शास्ती जी लावलेली आहे 6 वर्षाची ती रद्द करण्यात यावी.

श्रीप्रकाश सिंग :-

महापौर मॅडम मेरी सुचना दे रहा हूँ की जो वसुली कर रहे हो वो रुकाया जाए उसके उपर न्याय दिया जाए|

सुरेश खंडेलवाल :-

इनकी सुचना के साथ में ठराव मंजूर.

गिता जैन :-

महापौर मॅडम विषय चांगला आहे. पण आपण जे सरसकट करतो मी कुठे चुकीचे आहे ते सांगते. खुप सारे गाळे आहेत त्यांच्यावर एक माळ्याच्या नावो एक माळा घेतात आणि तिथे मशीन लावतात आणि त्यासाठी एक सरसकट नियम कसा पाहिजे की, 14 फुटाजी जी हाईट आहे त्यात जर त्यांनी माळा केलेला आहे फॉर ऐनी रिजन जर तो 14 फुटापेक्षा जास्त आहे किंवा तुम्ही तिथे लावु

शकता. पण माझी विनंती ही राहणार की थोडा फार आपण फ्लेक्झीबल होऊन 14 फुटवर तर मी नाहीच लावणार ते लावूच शकत नाही त्या माळ्यावर तुम्ही लावूच शकत नाही तरीही आपण ते लावले आहे ते आपण चुकीचे केले आहे. पोटमाळा त्यावर तुम्ही टॅक्स लावू शकत नाही. जर ती हाईट फक्त 14 फुटाची असेल. आता इथे गाळ्यांचे दोन प्रकार आहेत. काही गाळे त्याच्यावर गाळ्यांच्या नावाने पोटमाळे ह्यांना माळा चढवला आहे आणि तिथेही त्याने मशीन ठेऊन एक सेल्फ फ्लोअर क्रिएट करुन तिथेही ते काम करत आहेत. त्यांना तुम्ही कमर्शियल नक्कीच लावा. त्यात दुमत नाही. पण ते कर्मशियल लावून त्यांना शास्ती लावू नये कारण आपल्याला जर इथे इंडस्ट्रीज टिकवायची आहे तुमचा हक्क आहे इथे शास्ती लावायचा त्यात तर दुमत नाही पण जर आपल्याला इथे इंडस्ट्रीज टिकवायची आहे कारण आता आपली इंडस्ट्रीज बनणार तर पहिले पेक्षा अर्धी झालेली आहे. तर त्यांनी तसे मोठे बांधले असतील तर त्यांच्यावर टॅक्स तुम्ही कमर्शियल लावा काही हरकत नाही. पण 6 वर्ष मागची शास्ती ते निदान तुम्ही कॅन्सल करुन पुढे येणाऱ्या वर्षात तुम्ही ते टॅक्स त्यांना कंटीन्युअस लावत जाणार तर कोरोना नंतर खुप त्रास सहन करुन उठलेली ही इंडस्ट्रीज कुठेतरी सरव्हाईव्ह होणार. तर मला असे वाटते की तुम्हाला तिथे ज्यांनी माळा केला आहे आणि तिथेही ते कर्मशियल म्हणून वापर करत आहेत त्यांना शास्ती तुम्ही ते कर्मशियल लावला तर त्यांनाही हरकत नाही मी त्यांच्याशी बोलली त्यांनी सांगितले आम्ही जागा वापरतो तुम्ही लावा पण ती शास्ती आता लावू नका कारण शास्ती आता त्यांना जस्ट कोरोनामधून उठलेली इंडस्ट्रीयल जास्त मार लागणार आहे. कुठेतरी हे समन्वय बसुन त्यांना त्यांचे एक डेलिगेशनला बोलवा आणि कुठे मधला रस्ता करु शकतो ते नक्कीच करावे आयुक्त साहेब ही माझी विनंती आहे.

दिनेश नलावडे :-

महापौर मॅडम ह्या संदर्भात हा विषय अतिशय ज च्या प्रस्तावाखाली अतिशय चांगला आलेला आहे. पण ह्याच्यामध्ये जो काही आहे आता जे मॅडमने पण सांगितले कमीत कमी छोटासा कारखानदार आहे माझे पण काही गाळे आहेत परंतु महापौर मॅडम ह्या मिरा भाईंदर शहरामध्ये स्टील कारखाने अतोनात होते. हजारे नव्हे 5 ते 10 हजार कामगार ह्या शहरामध्ये होते मॅडम आज ते कामगार दोन अडीच हजारावरती आलेले आहेत. इकडची इंडस्ट्रीज, वसई, नालासोपारा ह्या ठिकाणी चालली आहे. काहीतरी ह्याच्या पाठीमागच आपले महापालिकेचे काही तरी चुकले सारखे वाटत आहे. महापौर मॅडम एवढा टॅक्स आपण घेतो 6-6 वर्षाचा तर मला वाटत नाही आजची परिस्थिती नुसार एखादा कारखानदार छोटा एवढे पैसे तो भरू शकेल. कारण काय आमच्या आजूबाजूला छोट्याशा इंडस्ट्रीज आहेत. दिडशे फुट दोनशे फुट एवढ्या एरियामध्ये छोटे छोटे कारखानदार आहेत.

मा. महापौर :-

ठिक आहे ज चा प्रस्ताव मांडणारे सन्मा. सदस्य खंडेलवालजी सभागृहातून निघून गेले आहेत आणि बरीच चर्चा झाली.

दिनेश नलावडे :-

महापौर मॅडम 18 फुटाची हाईट्स परंतु त्या इंडस्ट्रीजने मिरा भाईंदरमध्ये 2-2,3-3 माळे इंडस्ट्रीजमध्ये करते उभे राहिले अशी पण इंडस्ट्रीज आहेत आणि त्याला पिलर नाहीत काही नाही भविष्यात असे प्रकार आपल्या इंडस्ट्रीजमध्ये पण दिसलेत परंतु हा भुर्दंड सर्व सामान्य छोटे कारखानदारांना देऊ नका. किंचीत असे आहेत दिडशे दोनशे फुटच्या वरती गाळे मिरा भाईंदरमध्ये तुम्हाला फार कमी मिळतील. तर हे सर्व तपासून तुम्ही त्यांना शास्ती लावू नका.

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम ऑलरेडी ज चा प्रस्ताव ज्याचा आहे त्याला बोलायला संधी द्यावी. दुसऱ्या कोणालाही बोलायची संधी देण्यात येऊ नये.

मा. महापौर :-

ठिक आहे पुढचा ज चा प्रस्ताव घ्या. इतर महापालिकेचा तुलनात्मक अभ्यास करुन प्रशासनाने यावरती उचित कारवाई करावी.

मिरादेवी यादव :-

महापौर मॅडम आपके परवानगीसे में बोल रही हूँ प्रभाग क्र. 14 में चेक नाका से ले करके काजुपाडा चेना स स्लम एरिया है, हर साल जो 10X10 का 10x20 का स्लम एरिया है जिसका हर साल वो लोग टॅक्स पावती भरते है उनका भी बील शास्ती लगा करके कम से कम 10x20 घर का 15 हजार, 20 हजार टॅक्स आया है| उनका भी माला है और फिर भी उनका आया है 15 हजार 20 हजार टॅक्स जो हर साल करते है| मतलब यहाँ से बैठे बैठे ऐसे जो मन में आएगा वैसा जोड के भेज देते है अभी लॉकडाऊन में लोक खुद ही खाने के लिए मौताज थे इतना बील वह कहाँ से भरेंगे?

स्नेहा पांडे :-

महापौर मॅडम मेरी एक सुचना है जो गाले है उसको शास्ती या पोटमाळा का टॅक्स नही लगाया जाए| उसी तरहसे मेरे वॉर्ड में एक बिल्डींग है पुनम वंदना इंडस्ट्रीयल बिल्डींग है बिल्डींग के अंदर अपना.......................

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम परत तुम्हाला विनंती आहे ज चा प्रस्ताव ज्याचा आहे त्यालाच बोलायला संधी द्यावी. वेळेची कमतरता आहे. आपली पुढची महासभा पण आहे.

स्नेहा पांडे :-

इंडस्ट्रीयल बिल्डींग है उसके अंदर भी पोटमाळा पर टॅक्स लगायाहै उस पर भी कुछ रुलिंग दिजीए|

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम मी तुम्हाला पत्र दिले होते त्याच्यामध्ये 30 मिनिटांचा अवधी मागितला होता. 25 मिनिटे तुम्हाला डिस्काऊंड फक्त 5 मिनिटे बोलणार. माझा हरकतीचा मुद्दा होता कारण विषय मालमत्तेचा आहे अधिकारी वर्ग इथेच बसलेले असल्यामुळे ते विषयी मी थोडक्यात हा विषय आयुक्तांना लक्ष वेधून हा विषय इथे संपवणार आहे. आयुक्त महोदय, विषय मालमत्ता हस्तांतरण. विषय असा झाला की हा विषय माझ्याशी सलग्न असल्यामुळे माझ्या एक मित्राचा विषय हस्तांतरणासाठी मी दिल्यानंतर त्या विषयामध्ये आलेल्या अडचणी मी तुमच्या लक्षात आणून देऊ इच्छितो साहेब हस्तांतरा होतं वारसाचा आता वारसा हस्तांतरण म्हणजे कोणाचा वारसा हक्क असला साहेब माझ्या वडिलांनी माझ्या नावावरती फ्लॅट म्हणजे त्यांच्या वारल्यानंतर त्यांनी सोसायटीमध्ये एक सोसायटीमध्ये पध्दत आहे साहेब बाय लॉजप्रमाणे बायलॉन नं. 33 नॉमिनेशन भरला जातो. नॉमिनेशन फॉर्म भरताना त्याच्यामध्ये टक्केवारी स्पष्ट दिली जाते की ह्या मुलाला इतके टक्के दुसऱ्या मुलाला इतके टक्के त्यांच्या असलेल्या मिसेला इतके टक्के अशाप्रकारे त्यांचा शेअर नॉमिनेशनचा असतो. तो स्पष्ट केला जातो आणि त्यानुसार त्या व्यक्तींना त्या संस्थेमध्ये म्हणजे हौसिंग सोसायटीमध्ये हा कमर्शियल विषय नाही जमिनिचा विषय नाही कुणाचा लँड इश्यु नाही. त्या हौसिंग संस्थेमध्ये को.ऑ.हौ.सोसायटीमध्ये त्याप्रमाणे त्याला मेंबरशिप दिली जाते. तो 25 टक्केचा असू शकतो अथवा 100 टक्के असू शकतो. सगळ काही असताना सुध्दा साहेब जेव्हा अशा वारसांच्या मालमत्तांना हस्तांतरणाचे अर्ज दिले जातात तेव्हा हस्तांतरणासाठी माझे शिंदे साहेबांशी बोलणे झाले होते शिंदे साहेबांनी मला त्याची शास्वती दिली परंतु हा विषय तुमच्या लक्षात आणून देणे महत्त्वाचे आहे साहेब की त्याचा वारसा दाखला त्याच्याकडून वारसा दाखला घेतला जातो. साहेब वारस दाखला नॉमिनेशनमध्ये सोसायटीच्या भरलेल्या नॉमिनेशनमध्ये मी माझा एक्झाम्पल गृहित करुन दाखवत आहे. माझे वडिल ते हयात असताना त्यांनी मला 100 टक्के मला हकदार केला किंवा अथवा 50

टक्के केला असेल त्या अनुषंगाने मला माझे सोसायटीमध्ये माझा फ्लॅटमध्ये मला सभासद करुन घेतला जातो. पालिकेमध्ये जेव्हा मालमत्ता हस्तांतरणाचा विषय येतो तेव्हा हा विषय वेगळ्या पध्दतीने हाताळला जात आहे. साहेब करधान्य नियम आपल्या पालिकेचे प्रकरण 8 अशी त्याच्यामध्ये करधान्य नियम प्रकरण 8 करधान्य नियम 2 नोटिशीचा नमुना मालकी हक्काचे हस्तांतरण बाबत देयक ठिक आहे. त्याच्यामध्ये दोन काय म्हणतो साहेब अशा कोणत्याही नोटिस मिळाल्यानंतर आयुक्त त्यांना तसे कारण आवश्यक वाटेल तर हस्तांतर लेखा असल्यास तो हस्तांतर लेखा किंवा नोंदणी अधिनियम 1908 कलम 97 मिळाल्याची त्याची एक प्रत किंवा मयत व्यक्तीची मालकी हक्काचे हस्तांतरण करण्यात आले असेल तर त्या बाबतीत अशा हस्तांतरणाचा पुरावा असेल नॉमिनेशन कॅन बी हस्तांतरण असे अन्य कोणतेही दस्तऐवज हजर अन्य कोणताही दस्तऐवज हजर करणे विषयी प्रमाणित करण्यात येईल हा जर केला नॉमिनेशन शहर सर्टिफिकेट सोसायटीचे एन.ओ.सी. दिला जातो की मी ह्याला सभासदर करुन घेतलेला आहे. आमची काही हरकत नाही तुम्ही त्या मालमत्ता कर तुम्ही हस्तांतरण केलं तर साहेब ह्याच अनुषंगाने महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाने 23 जुन 2015 रोजी हे परिपत्रक अधिसुचना काढली होती. त्याच्यामध्ये स्पष्ट त्याचा उल्लेख आहे दस्तऐवजाची प्रत खरेदीखत, बक्षिस पत्र, वाटणी पत्र व इतर साहेब वाटणी पत्र हा नॉमिनेशनचा भाग असु शकतो ना शेअर्स वाटणी करण्यांत आलेले 100 टक्के, 25 टक्के काहीही असू शकतो. साहेब ह्याला सोयीस्कर करा वारसा हक्क प्रमाणपत्र मागितला..................

मा. आयुक्त :-

तुमचे मुद्दे मला समजलेत प्रॉब्लेम सांगा. आपल्याकडे काय प्रॉब्लेम आहे तो सांगा. मी सांगतो.

जुबेर इनामदार :-

वारसा हक्क घेताना एकदा नॉमिनेशन झाले म्हणजे माझ्या वडिलांनी म्हणजे आम्ही चार भाऊ फक्त मला 100 टक्के नॉमिनेशन दिलं आता परत मी जेव्हा मालमत्ता कर हस्तांतरणासाठी आलो तर माझ्याकडून वारसा हक्क मागितला तर माझे असलेले तीन भावांनी मला नाही दिले तर? एक हा विषय झाला. साहेब बऱ्याच समाजामध्ये आता आमच्याकडे पॉलिगेणी अलाऊड एकापेक्षा म्हणजे आम्ही एकाहून 4 लग्न करु शकतो. आमच्या दुसऱ्या आईच्या मुलांनी त्याचा वारसा हकम म्हणजे त्याने आपला हक्क जमावण्याचा प्रयत्न केला मग त्यांचा वारसा हक्क कुठून आणणार? असे बरेच लोकांचे आपल्या आयुष्यामध्ये दुसरे तिसरे लग्न केले असतील ना आपल्याला होईल तितके सोयीस्कर पध्दत काय आहे साहेब सोसायटीचे नॉमिनेशन.

मा. महापौर :-

हे काय चालले आहे.

जुबेर इनामदार :-

तुमचे ते कदाचित लक्षात आले नसेल माझा प्रॉपर्टीचा विषय नाही. मी फक्त माझे एक्झाम्पल दिले. साहेब नॉमिनेशन सोसायटीचा ह्याला गृहित करण्यात यावे. शेअर सर्टिफिकेट सोसायटीचा गृहित धरण्यात यावा. सोसायटीने दिलेला एन.ओ.सी. तो गृहित धरण्यात यावा. ठाणे महापालिका, नवी मुंबई महापालिका, मुंबई महापालिका साहेब हे अशाच प्रकारे मालमत्ता हस्तांतरण करत आहेत. ह्याला सोयीस्कर करावे लागेल आपल्याकडे होत नाही. म्हणून साहेब माझी आपणाला विनंती आहे हा विषय तुमच्या लक्षात आणून देण्यासाठी हा मुद्दामुन इथे मी चर्चेसाठी आणला.

मा. महापौर :-

सर्व सदस्यांनी ज चा प्रस्तावावर चर्चा केलेली आहे आणि मला आता वाटते दुसरा ज चा प्रस्ताव.

अनिल भोसले :-

महापौर मॅडम आता जस टॅक्सच्या संदर्भात शहरामध्ये विषय चालू आहे सर आपल्या शहरामध्ये सल्ममध्ये 26 वर्षाचे जे घर असेल स्लम मध्ये एकाने घर दुसऱ्याला विकले असेल तर डबल टॅक्स आहे. म्हणजे टॅक्सची वसुली होत नाही ही गंभीर बाब आहे. हयासाठी आपण अनेक वेळा महासभेमध्ये विषय आणला पण हया स्लमच्या बाबतीमध्ये जे डबल टॅक्स लागलेले आहेत. महापालिका टॅक्स तर वसुल करु शकत नाही कारण तो रहिवाशी राहतच नाही. तो घर विकुन निघुन जातो. पण तो टॅक्स चालू राहतो. तो मिळत नाही त्याचा टॅक्सची वसुली होत नाही आपण महापालिकेमध्ये अनेक वेळा विषय केला होता जे आपण क्लास टू चा जो भाग आहे स्लमसाठी पण जस अनेक आपण प्रॉपर्टी ट्रान्सफर करतो त्याच्या ॲफेडेव्हीट वरती त्याच्याकडून लेखी घेऊन जर एकच टॅक्स आयुक्त साहेब हा गेल्या 4-5 महासभेत हा विषय झालेला आहे. पण याचे समाधान झाले नाही. आपल्याकडे टॅक्सची आकडेवारी तर खुप मोठ्या प्रमाणात आहे. पण त्याची वसुली नाही. कारण तो सर राहतच नाही. शोधुन पण भेटत नाही. कारण त्यासाठी बेस्ट निर्णय आता आपण सर्व्हे केलेला आहे तर टॅक्समध्ये ज्यांना डबल टॅक्स लागलेला आहे अशी शहानीशा करावी आणि ज्यांचे ट्रान्सफर होत नाही त्यासाठी एक अमाऊंट डिसाईड करुन किंवा धोरण निश्चित करुन तेवढा टॅक्स वसुली करावा अशी माझी विनंती आहे आणि दुसरा एक असा विषय आहे हया शहरामध्ये टॅक्स लावण्यासाठी पैसे किती लागतात हा गंभीर विषय आहे. हया शहरामध्ये अनेक एजंट लोक टॅक्स चालू झाल्याच्यानंतर कोणी 8 हजार कोणी 10 हजार कोणी 20 हजार, 25 हजार हा मोठा भ्रष्ट्राचाराचा भाग झालेला आहे. तर ज्याचा टॅक्स आहे आयुक्त साहेब हा विषय खुप गंभीर आहे. ज्याचा टॅक्स आहे 10,2050,100 फाईल जमा करुन त्यामधून मोठी वसुली केली जाते तो एक वसुलीचा धंदा चालू केला आहे. अधिकाऱ्यांचा काय रुल आहे मला माहित नाही. ज्याचा टॅक्स लागतो ज्याचे ॲप्लीकेशन आला असेल त्यालाच समोर बोलवावे आणि त्याची शहानिशा करावी टॅक्समध्ये मोठा भ्रष्ट्राचार चालू आहे कारण कोणी पाहिजे ते पैसे मागतात.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य अनिल भोसले यांनी प्रशासनाच्या अधिकाऱ्यांवरती टॅक्स घेण्याबाबत जे काही चालू असेल ते त्वरीत थांबवावे आणि असे जे एजंट असतील त्यांना आळा घालावा. नागरिकांच्या माध्यमातून काम चांगल्या पध्दतीने पारदर्शक पध्दतीने करावं असे मी प्रशासनाला आदेश देते आणि सन्मा. सदस्य खंडेलवालजी यांनी जो ज चा प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर सर्व सन्मा. नगरसेवक चर्चा केली त्यांच्या सर्वांच्या सुचना खंडेलवालजी यांच्या ठरावात घेण्यात याव्यात आणि इतर महापालिकेच्या तुलनात्मक अभ्यास करुन प्रशासनाने हया विषयावरती उचित कारवाई करावी पुढचा ज चा प्रस्ताव घ्या.

प्रकरण क्र. 39 :-

सन्मा. सदस्य श्री. सुरेश खंडेलवाल यांचा दिनांक २८/०७/२०२२ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- महापालिकेमार्फत पोटपाळ्यास होणाऱ्या कर आकारणीबाबतचा योग्य निर्णय घेणेबाबत.

ठराव क्र. 42 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महासभा ठराव क्र. 60, दि. 20/02/2018 अन्वये मालमता कर आकारणीकरीता भाडे मुल्याचे निवासी / बीगर निवासी वापराकरीता दर निश्चित करुन मंजूरी दिलेली आहे.

मात्र, सद्यस्थितीत मालमत्ता कर विभागामार्फत पोटमाळ्यास कर आकारणी केली जात असून त्याकरीता उक्त ठरावाद्वारे निश्चित केलेल्या भाडे मुल्याचे दराने आकारणी केली जात आहे. वास्तविक पाहता विकास नियंत्रण नियमानुसार पोटमाळ्याचे क्षेत्रासाठी Free FSI देण्यात येत आहे.

तसेच सदरचे पोटमाळ्याचा बहुतांश वापर कामगार वर्गाला राहण्यासाठी, झोपण्यासाठी केला जातो. काही ठिकाणी त्याचा वापर गोडाऊन म्हणूनही होतो.

तरी, पोटमाळ्यास मा. महासभा ठराव क्र. 60, दि. 20/02/2018 अन्वये मंजुर केलेल्या भाडे मुल्याचे 25% दराने कराची आकारणी करण्यात यावी. तसेच पोटमाळ्यास केवळ सामन्य कर आकारुन इतर कर व शास्ती आकारु नये असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. सुरेश खंडेलवाल अनुमोदक :- श्री. सुशिल अग्रवाल**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. श्रीप्रकाश सिंग यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर महानगरपालिका कर विभागामार्फत सन 2022-23 या आर्थिक वर्षाचे देण्यात आलेल्या मालमत्ता कर देयक रद्द करण्यात यावीत.

**ठराव सुचनेसहीत सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 40, सन्मा. सदस्या श्रीम. स्नेहा पांडे यांचा दिनांक २८/०७/२०२२ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पाण्याचे कारंजे ऑफलाईन निविदेतील भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी विभागीय चौकशी अधिकारी, कोकण विभाग, महाराष्ट्र शासन यांना प्रस्ताव पाठविणेबाबत.

रिटा शहा :-

मॅडम आमच्याकडे जे झोपडपट्टीमध्ये जे माझ्यावरती टॅक्स लावला होता त्याच्यामध्ये त्यांनी सांगितले तुमचे काय ऑब्जेक्शन असेल तर तुम्ही आम्हाला पत्र टाका. त्याच्यावर सुनावणी पण झालेली आहे. सुनावणी झाल्यानंतर त्याच्यावर काही कारवाई केलेली नाही तर त्याच्यावर कार्यवाही करा आणि दुसरी गोष्ट मी प्रशासनाने हार्दिक अभिनंदन करते कारण मिरा भाईंदर शहरामध्ये एवढे पोटमाळे एवढे इंडस्ट्रीयल गाळे आहेत एवढे झोपडपट्टी एवढे फ्लॅट सुध्दा आहेत की ज्याच्या जागेवर 1400 आहे परंतु त्याचा टॅक्स निघाला 800 चा असे डिफरन्स करुन वेळोवेळी वाढविलेला आहे. म्हणून त्या प्रशासनाचे मी अभिनंदन सुध्दा करते परंतु महापालिकेमध्ये ज्यांनी ज्यांनी ऑब्जेक्शन घेऊन आपआपले पुरावे सादर केलेले आहेत आणि त्यांच्यावर तुमची सुनावणी झालेली आहे. अशा लोकांचे तुम्ही त्यांच्यावर न्याय करा.

मा. महापौर :-

स्नेहाजी आपला विषय सुरु आहे आपण बोला.

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम, परत निवेदन करतो ज चा प्रस्ताव ज्यांचा आहे त्यांनीच बोलावे. वेळेची कमतरता आहे स्नेहा पांडे मॅडम तुम्ही बोला.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम मला एक विनंती करायची आहे सन्मा. सदस्यांना ज च्या प्रस्तावावर बोलायला देत आहेत. महापौर मॅडम आपण जेव्हा बैठक सुरु झाली त्या वेळेला 35 नंबर ठरावावरती आपण ज्यांना ज्यांना सन्मा. आयुक्तांनी पदोन्नती दिली होती त्या संदर्भामध्ये ह्या सभगृहामध्ये चर्चा झाली आणि सगळ्यांच्या भावना अशाच होत्या की त्यांना ती पदोन्नती कायम रहावी किंवा त्यांना रिव्हर्ट करु नये आणि महापौर मॅडम असे असताना ज चा अन्वये प्रस्ताव टाकायचे आणि अधिकाऱ्यांची भ्रष्ट्राचाराची लख्तरे बाहेर काढायची तर हे महापौर मॅडम हे ज चे प्रस्ताव होऊ शकतात का. मग

तुम्ही कोणाच्या बाजूने आहेत. अधिकाऱ्यांच्या बाजूने एका बाजूला सांगतात तुम्ही पदोन्नती द्यावी आणि दुसऱ्या बाजूला सांगतात हे भ्रष्ट्राचाराने तो आहे आणि त्याची पदोन्नती काढून घेण्यात यावी म्हणजे नेमके काय करायचे महापौर मॅडम आणि म्हणून माझी तुम्हाला विनंती असेल सभागृहाला पण मी विनंती करतो महापौर मॅडम हे जे काही ज चे प्रस्ताव आहे आणि काही त्याच्यामध्ये असे जर असेल तर महापौर मॅडम ह्याची प्रशासनाने रितसर चौकशी करावी. त्यांची रितसर चौकशी करावी असे रुलिंग द्या महापौर मॅडम कारण महापौर मॅडम आज शेवटची आपल्या अध्यक्षतेखाली आपली बैठक ह्या ठिकाणी चालू आहे. आपल्या समारोपाचा कार्यक्रम ह्या ठिकाणी महापौर मॅडम, सन्मा. सदस्यांना सगळ्यांना त्या विषयावरती बोलायचे आहे. दुसरी बैठक ही महापौर मॅडम आपली सुरु होणार आहे. दुसरे बैठकीचे 12.30 चा टाईप टाकलेला आहे. आता 1.45 झाले महापौर मॅडम ह्या ठिकाणी आपली पहिलीच बैठक अजून संपलेली नाही आणि माझी कडकडीची विनंती अशी आहे सभागृहाला आणि ज्यांचा ज चा प्रस्ताव आहे त्यांना थोडक्यात बोलू द्या. महापौर मॅडम परंतु माझे एक निदर्शनास आणून द्यायचा आहे. महापौर मॅडम ज्यांच्या पदोन्नती झालेल्या नाहीत ज्यांचे केलेल्या आहेत त्यांच्या विषयी आपण ठराव त्यांच्या बाजूने करावा असे जर मत मांडले जात आहेत आणि मग एका बाजूला ज चे प्रस्ताव टाकून त्यांची लख्तरे बाहेर काढली जातात मग शहरामध्ये विकास करायचा की नाही महापौर मॅडम आणि विकास केल्यानंतर मग त्या भ्रष्ट्राचाराची चौकशी करायची मग असे जर ज चे प्रस्ताव सर्व सन्मा. सदस्य टाकत बसतील आणि म्हणून महापौर मॅडम माझी तुम्हाला विनंती असेल......................

मा महापौर :-

स्नेहा पांडेजी आपण 5 मिनिटात बोलून घ्या. अन्य सदस्यांनी याच्यावरती चर्चा करु नये कृपया बसून घ्या.

(सभागृहात गोंधळ)

स्नेहा पांडे :-

महापौर मॅडम सभागृहनेताजीने कहाँ की, अभी अभी जिसकी पदोन्नती हुई है स्वच्छ भारत अभियान आणि ते आपले माझी वसुंधराचा जेव्हा सर्व्हे होतात फेब्रुवारीमध्ये तेव्हा बऱ्याच ठिकाणी ते पाण्याचा फवारा लावला होता त्याच्यामध्ये आपल्याकडे गुगल मॅपींग फोटो आहे की तो लावून झाल्यानंतर एक टेंडर प्रक्रिया तो सर्व्हे झाला तर आपल्या अधिकाऱ्यांना माहित नाही आहे की सर्व्हेक्षण आपले चालू आहे त्याच्यामध्ये आपल्याला स्वच्छ करायचे आहे आपले शहर तर अगोदरच सर्व प्रोसिजर काय आहे ते करायला पाहिजे होता. काम झाल्यानंतर टेंडर काढत आहेत तर त्याच्यामध्ये भ्रष्ट्राचार कुठेतरी येतच आहे. आम्हाला असे वाटते मग माझा तोच विषय आहे की याच्यावर चौकशी झालीच पाहिजे मॅडम माझा ठराव आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी स्वच्छ भारत अभियान व माझी वसुंधरा अभियान यांचे सर्वेक्षण कालावधी दरम्यान विविध ठिकाणी पाण्याचे कारंजे उभारण्यात आले आहेत. यासाठी महापालिकेने सुमारे 42 लाख रुपये खर्च केलेले आहेत. श्री. दक्ष अग्रवाल यांनी खुप बऱ्याच काही तक्रार केली. पाण्याचे कारंजे उभारताना प्रसिध्द झालेले ऑफलाईन निविदा यांची निविदा प्रक्रिया व कार्यादेश होण्यास अगोदर पाण्याच्या कारंज्याचे काम करुन झाले आहे. हे गुगल मॅपिंग फोटोद्वारे व विविध तक्रारींद्वारे मिरा भाईंदर महापालिका प्रशासनास विविध पत्राद्वारे निदर्शनास आणून दिले आहे. तरी सुध्दा सदर कामाबाबत मा. आयुक्त, मा. अतिरिक्त आयुक्त व निविदा समितीचे सदस्य यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही व तक्रारदारास कोणतेही उत्तर अद्यापपर्यंत दिलेले नाही. यामुळे सदर भ्रष्ट्राचारास जबाबदार व दोषी श्री. उद्यान अधिक्षक व उपायुक्त यांचेवर विभागीय चौकशी करण्यासाठी विभागीय चौकशी अधिकारी, कोकण विभाग महाराष्ट्र शासन यांचा प्रस्ताव पाठविण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

तारा घरत :-

माझे अनुमोदन आहे.

स्नेहा पांडे :-

याच्यावर मॅडम जो कोणी लुप्त आहेत ह्या भ्रष्ट्राचारामध्ये त्याच्यावर कारवाई झालीच पाहिजे. माझे एवढेच बोलणे आहे.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम माझा याच्यावर ठराव आहे. सन्मा. सदस्या यांनी जो काही आता ठराव मांडलेला आहे प्रकरण क्र. 40 ह्या संदर्भामध्ये प्रशासनाने त्याची सविस्तर माहिती महासभेपूढे सादर करावी हा प्रस्ताव फेटाळण्यात येत आहे असा ठराव मांडत आहे.

धृवकिशोर पाटील :-

माझे अनुमोदन आहे.

स्नेहा पांडे :-

सभागृहनेते साहेब चौकशी होणार म्हणजे फेटाळण्यात येत आहे म्हणजे काय.............

प्रशांत दळवी :-

ह्या ठिकाणी मी प्रशासनाला महापौर मॅडम आपल्यामार्फत विनंती केलेली आहे की ह्या संदर्भातलं रितसर माहिती ह्या सभागृहाला प्रशासनाने उपलब्ध करुन देण्यात यावी तत्पुर्वी ह्यांनी जो ठराव मांडलेला आहे तो मी फेटाळत आहे.

स्नेहा पांडे :-

माझा ठराव आहे चौकशी होऊ द्या जर चौकशीमध्ये कोणी गुन्हेगार आहे त्याच्यावर कारवाई होईल. गुन्हेगार नाही त्यावर होणार नाही.

मा. महापौर :-

स्नेहा मॅडम तुमचा ज चा ठराव आहे तुम्ही वाचन केलं तुम्हाला काय अपेक्षित आहे की त्याच्यावरती प्रशासनाने कारवाई करावी.

स्नेहा पांडे :-

मग फेटाळण्यात का येत आहे.

धृवकिशोर पाटील :-

हा आमचा वैयक्तिक प्रश्न आहे.

मा. महापौर :-

तुम्हाला दुसरा ठराव मांडायचा आहे का.

धृवकिशोर पाटील :-

हो मॅडम.

मा. महापौर :-

मग मांडा.

स्नेहा पांडे :-

ठराव मांडा.

धृवकिशोर पाटील :-

मॅडम सभागृह नेत्यांची अगोदरच सांगितले की एका बाजूने यांनी भुमिका असते पदोन्नती कायम करा. पदोन्नती द्या आणि आता म्हणत आहेत की भ्रष्ट्राचार झाला आहे चौकशी करा हे दुटप्पी भुमिका घेता आणि दुसरी गोष्ट ह्यांनी वाटतं की भ्रष्ट्राचार झाला आहे तर ह्यांनी रितसर आयुक्त साहेबांकडे तक्रार करावी आणि पुरावे द्यावेत स्नेहा मॅडम तुमच्या मताशी आम्ही सहमत आहोत. आणि ह्याच्यासाठी तुम्हाला प्रस्तावाची गरज नाही. तुम्ही डायरेक्ट तक्रार करु शकता.

सभागृह नेत्यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्या प्रस्तावाला माझे अनुमोदन आहे. सदरचा ठराव फेटाळण्यात आलेला आहे.

मा. महापौर :-

ज चा प्रस्तावावर दोन ठराव आलेले आहेत. सचिव साहेब याच्यावरती मतदान घेऊन टाका.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 40 करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्रीम. स्नेहा पांडे, अनुमोदन श्रीम. तारा घरत. दुसरा ठराव सुचक श्री. प्रशांत दळवी, अनुमोदन श्री. धृवकिशोर पाटील. सुचक श्रीम. स्नेहा पांडे यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहेत. दुसरा ठराव सुचक श्री. प्रशांत दळवी यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहेत.

मा. महापौर :-

सुचक श्री. प्रशांत दळवी यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने 47, विरोधात 19, तटस्थ 3 इतकी मत पडलेली आहेत. सुचक श्री. प्रशांत दळवी यांचा ठराव बहुमताने मंजूर करण्यांत येत आहे.

प्रकरण क्र. 40 :-

सन्मा. सदस्या श्रीम. स्नेहा पांडे यांचा दिनांक २८/०७/२०२२ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पाण्याचे कारंजे ऑफलाईन निविदेतील भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी विभागीय चौकशी अधिकारी, कोकण विभाग, महाराष्ट्र शासन यांना प्रस्ताव पाठविणेबाबत.

ठराव क्र. 43 :-

सन्मा. सदस्या स्नेहा पांडे यांनी जो मांडलेला आहे या संदर्भामध्ये प्रशासनाने त्याची सविस्तर माहिती महासभेपुढे सादर करावी व हा प्रस्ताव फेटाळण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी          अनुमोदन :- श्री. धृवकिशोर पाटील**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | हसनाळे ज्योत्सना जालींदर | १ | पाटील धनेश परशुराम | १. जैन गीता भरत |
| २ | गेहलोत हसमुख मोहनलाल | २ | पाटील प्रविण मोरेश्वर | २. भोईर राजु यशवंत |
| ३ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | ३ | नलावडे दिनेश दगडु | ३. भोईर भावना राजू |
| ४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ४ | शिर्के अनंत गेणू | |
| ५ | मेहता डिंम्पल विनोद | ५ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| ६ | पाटील प्रभात प्रकाश | ६ | घरत तारा विनायक | |
| ७ | मदन उदितनारायण सिंह | ७ | कदम अर्चना अरुण | |
| ८ | भानुशाली वर्षा गिरधर | ८ | पांडे स्नेहा शैलेश | |
| ९ | शाह रिटा सुभाष | ९ | गुप्ता कुसुम संतोष | |
| १० | गोहिल शानू जोरावर सिंह | १० | पाटील वंदना विकास | |
| ११ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | ११ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| १२ | भोईर सुनिता शशिकांत | १२ | बांड्या एलायस दुमिंग | |
| १३ | पाटील वंदना मंगेश | १३ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| १४ | जैन सुनिता रमेश | १४ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | अरोरा दीपिका पंकज | १५ | सावंत अनिल दिवाकर | |
| १६ | नाईक विविता विवेक | १६ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| १७ | भावसार वंदना संजय | १७ | शेख रुबीना फिरोझ | |
| १८ | बेलानी हेमा राजेश | १८ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १९ | भोईर विणा सुर्यकांत | १९ | परदेशी गिता हरीश | |
| २० | सोनार सुरेखा प्रकाश | | | |
| २१ | मुखर्जी अनिता बबलू | | | |
| २२ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | | | |
| २३ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | | | |
| २४ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |
| २५ | शेट्टी अरविंद आनंद | | | |
| २६ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| २७ | तिवारी अशोक सुर्यदेव | | | |
| २८ | अग्रवाल सुशिल गोपीकिशन | | | |
| २९ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | | |
| ३० | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ३१ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| ३२ | कांगणे मीना यशवंत | | | |
| ३३ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ३४ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ३५ | शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| ३६ | थेराडे संजय अनंत | | | |
| ३७ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ३८ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ३९ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ४० | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ४१ | भोईर गणेश गजानन | | | |
| ४२ | पारधी सुजाता यशवंत | | | |
| ४३ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ४४ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ४५ | पांडेय पंकज सूर्यमणि | | | |
| ४६ | भट दिप्ती शेखर | | | |
| ४७ | पाटील अनिता जयवंत | | | |

**ठराव बहूमताने मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 41, सन्मा. सदस्या श्रीम. स्नेहा पांडे यांचा दिनांक २८/०७/२०२२ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिका कनिष्ठ अभियंता श्री. दिपक जाधव यांना बेकायदेशीररित्या देण्यात आलेल्या उपअभियंता पदावरील प्रभारी पदभार आदेश भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी विभागीय चौकशी अधिकारी, कोकण विभाग, महाराष्ट्र शासन यांना प्रस्ताव पाठविणेबाबत.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम आपण सभागृहाचा वेळ वाया घालवत आहोत.

मा. महापौर :-

एका बाजूने पदोन्नती द्या म्हणायचं आणि एका बाजूने त्यांच्यावरती भ्रष्ट्राचाराचा आरोप करायचा मग पदोन्नती का द्यायची?

स्नेहा पांडे :-

मॅडम पदोन्नती देना कोई गलत बात नही है लेकिन जिस तरह से सिनिआरीटी सिरयल व्हाईज होना चाहिए उसी तरह से पदोन्नती होना चाहिए|

प्रशांत दळवी :-

मॅडम आयुक्तांना त्यांचा खुलासा करु देत.

मा. आयुक्त :-

महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, कोणाला अतिरिक्त कारभार कुठला द्यायचा हा निव्वळ प्रशासनाच्या कामाचा भाग आहे आणि अशा कामाचा भागावर जर कुठला सन्मा. सदस्य यांची चौकशी करा त्याची चौकशी करा. उद्या प्रशासन कस चालवायचं हे जर सकाळपासून आपण ठरवणार असाल तर ते मला वाटते थोडं प्रोसिजरच्या आऊट ऑफ वे दिसत आहे आणि मांडलेला ठराव माझ एक प्रशासक म्हणून किंवा एक आयुक्त म्हणून म्हणणे आहे की अतिरिक्त कारभार कोणाला देऊन काम करायचे आहे हे जर आपण त्याची चौकशी करा म्हणून म्हणणार असेल तर हे मला वाटते नियमाच्या बाहेर आहे आणि हे उचित नाही.

स्नेहा पांडे :-

आयुक्त साहेब कनिष्ठ अभियंता डायरेक्ट उपअभियंता होऊ शकतो का?

स्नेहा पांडे :-

मॅडम एक कनिष्ठ अभियंता शाखा अभियंता बने बीना उपअभियंता कैसे बन सकता है और दुसरी बात इस कनिष्ठ अभियंता का सुप्रिम कोर्ट में अभी केस पेंडींग है|

मा. उपमहापौर :-

आप अपना ठराव रख लिजीए विषय क्लियर हो जाएगा|

मा. महापौर :-

चर्चा नको आपण आपला ठराव मांडा. आपल्याला परवानगी दिलेली आहे आपण ठराव मांडू शकता.

स्नेहा पांडे :-

मिरा भाईंदर महानगरपालिका शांती नगर, मिरारोड पूर्व वसाहत पाणी पुरवठा योजना बेकायदा भरतीमधील कनिष्ठ अभियंता, श्री. दिपक जाधव यांची मूळ सरळसेवा भरती, मुंबई उच्च न्यायालयाने बेकायदा ठरवली होती व सर्वोच्च न्यायालयास एस.एल.पी.सी.नं.021955/2012 प्रलंबित असून मिरा भाईंदर महानगरपालिका विविध विभाग सदर केसबाबत हेतु पुरस्कृत दिरंगाई करत असून त्याचा फायदा श्री. दिपक जाधव घेत आहेत, सन 2016 पासून आजपर्यंत सदर केसमध्ये तारीख घेण्याची प्रगती सुध्दा मिरा भाईंदर पालिका विधी विभाग देत नाही तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रशासन, सामान्य प्रशासन व आस्थापना विभागाकडून सुध्दा दिरंगाई होत आहे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा पदभरती 13/12/2020 रोजीची अंतिम सेवाज्येष्ठता यादी यातील सेवा ज्येष्ठता धारक उमेदवारांना जाणीवपूर्वक अन्याय होणार आहे. सदर भ्रष्ट्राचारस जबाबदार व पदाचा दुरुपयोग करणाऱ्या श्री. उपआयुक्त श्री. सुनिल यादव यांना आणि उपआयुक्त मारुती गायकवाड यांची चौकशी करणे अत्यावश्यक आहे व श्री दिपक जाधव यांना देण्यात आलेल्या प्रभारी उपअभियंता आदेश तात्ताळ रद्द करण्यात यावा सदर बेकायदेशीररित्या देण्यात आलेल्या उपअभियंता पदावरील प्रभारी पदभार आदेश भ्रष्ट्राचाराची चौकशी करण्यासाठी विभागीय चौकशी अधिकारी, कोकण विभाग, महाराष्ट्र शासन यांना प्रस्ताव पाठविण्यांत यावा असा मी ठराव मांडत आहे.

जयंतीलाल पाटील :-

माझे अनुमोदन आहे.

धृवकिशोर पाटील :-

मा. सदस्या स्नेहा पांडे मॅडम ह्यांनी जो मांडलेला ठराव आहे जो प्रस्ताव आहे तो आम्ही फेटाळत आहोत.

प्रशांत दळवी :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

सचिव महोदय दोन ठराव आलेले आहेत मतदानाची प्रक्रिया करा.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 41 करीता दोना ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्रीम. स्नेहा पांडे, अनुमोदन श्री. जयंतीलाल पाटील. दुसरा ठराव सुचक श्री. धृवकिशोर पाटील, अनुमोदन श्री. प्रशांत दळवी. सुचक श्रीम. स्नेहा पांडे यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहेत. दुसरा ठराव सुचक श्री. धृवकिशोर पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहेत.

मा. महापौर :-

सुचक श्री. धृवकिशोर पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने 48, विरोधात 02, तटस्थ 19 इतकी मत पडलेली आहेत. सुचक श्री. धृवकिशोर पाटील यांचा ठराव बहुमताने मंजूर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. 41 :-**

सन्मा. सदस्या श्रीम. स्नेहा पांडे यांचा दिनांक २८/०७/२०२२ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिका कनिष्ठ अभियंता श्री. दिपक जाधव यांना बेकायदेशीररित्या देण्यात आलेल्या उपअभियंता पदावरील प्रभारी पदभार आदेश भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी विभागीय चौकशी अधिकारी, कोकण विभाग, महाराष्ट्र शासन यांना प्रस्ताव पाठविणेबाबत.

**ठराव क्र. 44 :-**

सन्मा. सदस्या स्नेहा पांडे यांनी मांडलेला प्रस्ताव फेटाळत आहे.

**सुचक :- श्री. धृवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. प्रशांत दळवी**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | ठरावाच्या विरोधात | अ.क्र. | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | हसनाळे ज्योत्सना जालींदर | १. पांडे स्नेहा शैलेश | १ | जैन गीता भरत |
| २ | गेहलोत हसमुख मोहनलाल | २. पाटील जयंतीलाल गुरूनाथ | २ | पाटील धनेश परशुराम |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | ३ | भोईर राजु यशवंत |
| ४ | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | | ४ | पाटील प्रविण मोरेश्वर |
| ५ | मेहता डिंम्पल विनोद | | ५ | नलावडे दिनेश दगडु |
| ६ | पाटील प्रभात प्रकाश | | ६ | शिर्के अनंत गेणू |
| ७ | मदन उदितनारायण सिंह | | ७ | घरत तारा विनायक |
| ८ | भानुशाली वर्षा गिरधर | | ८ | कदम अर्चना अरुण |
| ९ | यादव मिरादेवी रामलाल | | ९ | गुप्ता कुसुम संतोष |
| १० | शाह रिटा सुभाष | | १० | भोईर भावना राजू |
| ११ | गोहिल शानू जोरावर सिंह | | ११ | पाटील वंदना विकास |
| १२ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | | १२ | बगाजी शर्मिला विन्सन्ट |
| १३ | भोईर सुनिता शशिकांत | | १३ | बांड्या एलायस दुमिंग |
| १४ | पाटील वंदना मंगेश | | १४ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम |
| १५ | जैन सुनिता रमेश | | १५ | मेहरा राजीव ओमप्रकाश |
| १६ | अरोरा दीपिका पंकज | | १६ | सावंत अनिल दिवाकर |
| १७ | नाईक विविता विवेक | | १७ | इनामदार जुबेर अब्दुल्ला |
| १८ | भावसार वंदना संजय | | १८ | शेख रुबीना फिरोझ |
| १९ | बेलानी हेमा राजेश | | १९ | डिसा मर्लिन मर्विन |
| २० | भोईर विणा सुर्यकांत | | २० | परदेशी गिता हरीश |
| २१ | सोनार सुरेखा प्रकाश | | २१ | अहमद साराह अकरम |
| २२ | मुखर्जी अनिता बबलू | | | |
| २३ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | | | |
| २४ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | | | |
| २५ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |
| २६ | शेट्टी अरविंद आनंद | | | |
| २७ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| २८ | तिवारी अशोक सुर्यदेव | | | |
| २९ | अग्रवाल सुशिल गोपीकिशन | | | |
| ३० | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | | |
| ३१ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ३२ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| ३३ | कांगणे मीना यशवंत | | | |
| ३४ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ३५ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ३६ | शेट्टी गणेश गोपाळ | | | |
| ३७ | थेराडे संजय अनंत | | | |
| ३८ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ३९ | जैन दिनेश तेजराज | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४० | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ४१ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ४२ | भोईर गणेश गजानन | | | |
| ४३ | पारधी सुजाता यशवंत | | | |
| ४४ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ४५ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ४६ | पांडेय पंकज सूर्यमणि | | | |
| ४७ | भट दिप्ती शेखर | | | |
| ४८ | पाटील अनिता जयवंत | | | |

ठराव बहूमताने मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 42, सन्मा. सदस्य श्री. दिनेश जैन यांचा दिनांक २९/०७/२०२२ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- सोमवार बाजार व अनधिकृत फेरीवाल्यांवर ठोस कारवाई करणेबाबत.

दिनेश जैन :-

महापौर मॅडम यह विषय मेरे घर का नही है पहिली बात तो यह पुरे मिरा भाईंदर में जितने भी नगरसेवक बैठे है सबका विषय है|

मा. उपमहापौर :-

सदस्य महोदय ऐसा मत मानीए की यह घर का विषय नही है यहाँ जो कोई भी आता है हर कोई शहर का विषय लेके ही आता है|

दिनेश जैन :-

महापौर मॅडम अपने इस विषय को लिया इसके लिए आज वापीस मुझे टाईम दिया धन्यवाद करता हूँ में आपका खास दिल से क्योंकी यह विषय पुरे मिरा भाईंदर का सभी का लगके है| इसके पहले में विषय शुरु कर रहा हूँ इसके पहिले में आपसे हमारे जैन समाज के पर्युषण पर्व चल रहे है करीबन देढ लाख जैन समाज के मिरा भाईंदर में आबादी रहती है| तो इसके लिए महापालिका के महासभा के माध्यम से इस सभी नगरसेवको के माध्यम से परे जैन समाज को पर्युषण पर्व की शुभकामना देता हूँ और आप सबको 5 साल में अगर मेरे से किसी का दिल दुखाया हो तो में मिछामी दुक्कडम मांगता हूँ सभी से|

मा. उपमहापौर :-

विषय पे आइए|

दिनेश जैन :-

महापौर मॅडम आपल्या अध्यक्षतेखाली मिटींग झाली होती आपल्याला माहित आहे कमीत कमी मिटींग होऊन त्याला 3 महिने झालेले आहेत. त्याच्या अगोदर आमचे प्रभाग समितीमध्ये वारंवार मिटींग होत असतात. त्याच्यामध्ये फेरिवाल्यांचा विषय नेहमी तिथे होत असतो. महापौर मॅडम आमच्या तिथे शांती नगर परिसरामध्ये प्रभाग क्र. 20 आणि 21 ह्या ठिकाणी सोमवारी बाजारचा प्रचंड त्रास आहे आणि आपण मार्केट कशाला लावायचा ज्या टायमाला इकडे ग्रामपंचायत होती नगरपरिषद होती त्या टायमाला मार्केट आणि दुकाने नाही होती म्हणून त्या टायमाला आपण मार्केट

लावायचे असे कुठे कुठे आपण परमिशन देत होतो. पण आता ही महापालिका झाली आहे. आपण विकसित शहरामध्ये आहोत आणि आपण तिथे भिवंडी, मुंब्रा, कळवा आणि तिथुन लोक येऊन आमच्या मिरारोडमध्ये मार्केट सुरु ठेवतात. आपल्या अध्यक्षतेखाली मिटींग झाली होती. महापौर मॅडम तेव्हा तुम्ही सांगितले निर्देश दिले होते की येत्या सोमवारपासून तिथे सगळ्या ठिकाणी बॅनर लावण्यात येणार की सोमवारी बाजार भरवण्यात येणार नाही आणि तिथे अतिरिक्त मनुष्यबळ देता येणार म्हणजे तिकडे मुसलमानी बाजार लावता येणार नाही. परंतु महापौर मॅडम असे काही घडलेले नाही. महापौर मॅडम तिथे मारुती गायकवाड जे आपले उपायुक्त आहेत ते आले होते त्या दिवशी त्यांनी कारवाई पण केली होती. परंतु त्याच्यानंतर परिस्थिती परत तशीच आहे.

मा. महापौर :-

ठिक आहे आपण आपला ठराव वाचा. जस इतर सन्मा. सदस्यांनी वाचले.

(सभागृहात गोंधळ)

दिनेश जैन :-

मॅडम मला बोलायचे आहे तिथे सोमवारी बाजार भरतो तिथे मार्केट लागतो. तिथे कुठलीही कारवाई होत नाही मॅडम. आम्ही आता काय करु तुम्ही सांगा मला.

मा. महापौर :-

मग आता काय करायचे? तुम्ही तुमचा ठराव वाचा तुम्ही ठराव वाचला तर पुढे होईल.

दिनेश जैन :-

त्या ठिकाणी तुम्ही रुलिंग दिली होती तरी सुध्दा कारवाई होत नाही. आम्ही काय करु कुठे जाऊ महापौर मॅडम तिकडची परिस्थिती मी तुमच्या लक्षात आणून देऊ इच्छितो आयुक्त साहेबांना पण तिकडची परिस्थिती माहित आहे की तिथे 2-2, 3-3 लाईन लागतात. महापौर मॅडम तिथे एक हातगाडी नंतर त्याच्यानंतर बाईक ह्या साईटला हातगाडी नंतर बाईक तिथे फेरिवाले बसतात. दोघी साईटला फेरिवाला तिकडे आपण शववाहिनी घेऊन जाऊ शकत नाही. तिकडे ॲम्ब्युलंस घेऊन जाऊ शकत नाही. फेरिवाले तिकडे सोसायटीवाल्या बरोबर मारामारी करतात आणि तिकडे मंदिर आहे, स्कुल आहे तिकडे मुलांना जाता येत नाही. महापौर मॅडम आम्ही कोणाला सांगायचं? मी एवढ्या वर्षापासून प्रयत्न करतो एक दिवस कारवाई होते आणि तिकडचे लोक आपल्यावरती आरोप करतात की अधिकारी आणि नगरसेवक हफ्ता घेतात. म्हणून तिकडे बसतात. महापौर मॅडम आपण कारवाई केली पाहिजे की नाही महापौर मॅडम म्हणून हा विषय मी लक्षवेधीच्या माध्यमातून आणू इच्छितो परत ते आता ज चा प्रस्ताव आणायला इच्छितो आणि हा माझा विषय नाही मॅडम हे आपल्या मिरा भाईंदरमध्ये आमच्या शांती नगरमध्ये तिकडे प्रभाग 20 आणि 21 मध्ये स्टेशन परिसर आहे ती पण आपण कौस्तुभ राणेचे एवढे मोठे स्मारक बांधले आहे. तिकडे फेरिवाले बसतात. तिकडे जुते विकतात चप्पल विकतात.

मा. महापौर :-

ज चा प्रस्ताव दिनेश जैनचा सुरु आहे.

मा. उपमहापौर :-

दिनेश जैन यांनी जे मांडलेले आहे आयुक्त महोदय ऑलरेडी महापौरांच्या अध्यक्षतेखाली मिटींग लावली होती. त्यामध्ये हे पण नक्की झाले होते की त्याच्यावर कारवाई करण्यात यावी पण जितपर्यंत माझ्या लक्षात आलेले आहे उपायुक्त महोदय, गायकवाड साहेब यांनी त्या जागेवर कारवाई पण केली होती. कधी कधी असे घडू शकते की एखाद्या कारवाई करताना दोन दिवस कारवाई केली एखाद दिवस सोडलं मी आयुक्त साहेबांना आदेश देतो की येणाऱ्या काळामध्ये त्या जागेवर स्ट्रीकली ॲक्शन घ्यावं म्हणजे लोकांना त्रास होणार नाही ह्या विषयावर आणि प्रत्येक सदस्यांना मी विनंती करतो.........

श्रीप्रकाश सिंग :-

सुनिए पहली बात तो ऐसा है की जिसको हाऊस में बोलना आता है उसको कुछ भी बोलने दिया जाएगा खाली फेरिवाले दिखते है लायसंस देने की बात क्यों नही करते है, खाली फेरिवाले दिख रहे है........

मा. उपमहापौर :-

सदस्य महोदय फिलहाल जो विषय है लायसंस की बात नही है, इन्होंने जो विषय रखा था ॲम्ब्युलन्स के लिए ट्राफीक के लिए, पार्किंग के लिए वह विषय पे चर्चा हो रही है.....

दिनेश जैन :-

उपमहापौर साहेब मी काय बोलतो मी फेरिवाल्यांच्या खीलाफ नही.

श्रीप्रकाश सिंग :-

जो फेरिवाले है जो भाईंदर में रहते है वो टॅक्स नही देते है क्या? लायसन्स की बात क्यों नही होती है?..................

मा. उपमहापौर :-

आप दोनो जो बोल रहे हो वह दोनो विषय अलग है यह विषय को मर्ज मत किजीए......

श्रीप्रकाश सिंग :-

फेरिवालो पर खाली कारवाई होएगा उनको लायसन्स नही दिया जाएगा|

दिनेश जैन :-

तुम्ही लायसन्स द्या जे प्रोसिजर काही केली नाही.....................

मा. उपमहापौर :-

सभी सदस्यों को मे सुचना दे रहा हूँ दिनेशजी आप कृपया कर के बैठीए आप जो कह रहे है मुन्नाजी आपकी सो प्रतिशद बात सही है कारवाई के साथ साथ में उनको लायसन्स भी मिलना चाहिए और जिस टाईम विषय आएगा तो आयुक्त महोदय से में निवेदन करुंगा की अगली बार जब विषय आएगा तब यह विषय कोभी इस गोषवारे के साथ इसको महासभा में लेके आए यह विषय खत्म हो गया दुसरा विषय दिनेशजी आपका जो विषय है उसपर कारवाई होनी चाहिए ठराव मत किजीए आपसे में अनुरोध करुंगा और सुन लिजीए में आयुक्त महोदयजी को और तत्कालीन उपायुक्त महोदय है गायकवाडजी से भी निवेदन देतो की तिथे कारवाई करताना स्ट्रीक्टली करण्यात यावी आणि त्या स्थानिक लोकांना त्रास होऊ नये हा विषय आहे.

दिनेश जैन :-

महापौर साहेब माझे ते नाही आयुक्त साहेबांनी पण तिथे येऊन कारवाई केलेली आहे. उपायुक्तांनी पण केलेली आहे मी कारवाईसाठी नाही मी म्हणत नाही आणि फेरिवाल्यांच्या संदर्भात पण नाही पण तिथे लोकांचे.....................

श्रीप्रकाश सिंग :-

फेरिवालो के विरोध में नही तो किसके विरोध में है?

दिनेश जैन :-

सोमवार मार्केटची गरज काय आहे मला ते सांगा.

(सभागृहात गोंधळ)

दिनेश जैन :-

माझा ठराव आहे.

मा. उपमहापौर :-

आपका जो विषय है जो सोमवार बाजार वहाँ पे लगना नही चाहिए बस ना ठराव मत किजीए में आयुक्त महोदय जी को आदेश देता हूँ उसके उपर कारवाई किजीए दिप्ती भट मॅडम आप बोलिए|

दिप्ती भट :-

आयुक्त साहेब गेल्या 15 वर्षापासून मार्केटची जागा आहे. आम्ही वारंवार पत्रव्यवहार केलेला आहे. त्याचे टेंडर निघता निघता 5 वर्षाने राहिले आहे. दुसरी गोष्ट लायसन्सचे 2014 पासून पेंडींग पडले आहे त्याचा का विरोध होतो ते आम्हाला माहित नाही. पण 10 बसले 11 वा बसणार नाही कस डिसीजन होणार तरच हे कंट्रोल राहणार. तिसरी गोष्ट सोमवार बाजार स्टेशन आणि नयानगर पासून खाली होऊ शकतो तर आमच्या तिथुन का नाही जात आम्हाला एक्सक्युज देण्यात येते आणि त्या बाजारामध्ये जे अॅग्रीमेंट आहे त्याच्यामध्ये त्या बाजाराचा उल्लेखच नाही तुम्ही कशाला आमच्या तिथे लावायला देत आहेत? आपल्या पालिकेने लोकांनी कशाला हे सगळ कराव ठेकेदारावर तुम्ही अॅक्शन घ्या ना. त्यांनी बंद करायला पाहिजे. कालची गोष्ट काल संध्याकाळी तुम्ही प्रभाग 5 मध्ये बघु शकता सेक्टर 2 मध्ये 16 मध्ये हे मयत झाले त्या मयतला उचलून बाहेर रोडवरती घेऊन जायला लागलं कारण सगळे फेरिवाले आणि आजपर्यंत ह्या तीन महिन्यामध्ये 3 अॅक्सीडेंट झाले. मी तुम्हाला हॉस्पीटलचे नाव दाखवते त्यांना घेऊन चला कारण जेव्हा आपले फेरिवाले येतात कारवाई होते तेव्हा ते पळतात त्यांच्या पाठी सिनियर सिटीजन लेडीज किती अॅक्सीडेंट झालेत आणि ते लोकांना अॅजेट झालेत म्हणजे काय भुगतान पब्लिकने करावं? मग आपण पालिकाने ह्याच का अॅक्शन घेत नाही का तुम्ही लायसन्स का तुम्ही मार्केटचे प्रोव्हीजन करत नाही फेरिवाला झोन हे असे नाही 2008 पासून झोन केले त्याच्यानंतर कधी झोनच झाले नाहीत. तुम्ही आता बोलणार की जुन्या झोनमध्ये बसवा तर ते शक्य नाही. कारण की तिथे मंदिर आहे हॉस्पीटल आहे कोर्टचे डिसीजन आहे. तर तुम्ही डिसीजन घ्या की कुठे मार्केट बनेल कुठे काय करायचे आणि एक लायसन्सचे.

दिनेश जैन :-

महापौर मॅडम मी पहिलाच सांगतो मी फेरिवाल्यांच्या विरोधात नाही. जिथे फेरिवाला आहे तिथे त्यांना बसवा. त्यांना पण लायसन्स
द्या. त्यांना पण जगण्याचा अधिकार आहे. पण भिवंडीहून यायचं, मुंब्राहून यायचं, बांद्राहून यायचं............

दिप्ती भट :-

रोजची चोरी रोज मारामारी............

दिनेश जैन :-

तिथे मारामारी होतात तिथे छेडखानी होतात.

मा. उपमहापौर :-

आता मी तुमचे दोघांचे म्हणणे ऐकून घेतलेले आहे. शेवटचा निर्णय असा आहे मैंने आयुक्त महोदय से कहाँ है रुलिंग दी गई है की मंडे मार्केट के लिए शहानिशा करके उसके उपर कारवाई की जाए अगर हो सकता है तो उसके उपर पाबंदी लाई जाए|

दिनेश जैन :-

वह होता नही है सर............

मा. उपमहापौर :-

वहाँ पे जो यथास्थिती है जो नियम में है वो करने के लिए में कह सकता हूँ|

दिप्ती भट :-

सर मिरारोड में दो जगह लग रहा था एक जगह बंद हुआ एग जगह क्यों नही? साहेब शनिवार बाजार बंद होऊ शकतो मग सोमवार बाजार का बंद होऊ शकत नाही?

मा. उपमहापौर :-

आयुक्त महोदय उत्तर दे रहे है|

मा. आयुक्त :-

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो आता दिनेश जैन आणि इतर सर्व सन्मा. सदस्यांनी सोमवार बाजार आणि फेरिवाला ह्या अनुषंगाने इथे आपआपली मत व्यक्त केली आहेत तर सद्यस्थितीत आपण त्या ठिकाणी दोन शिफ्टमध्ये आपले गार्ड, अधिकारी फिरत असतात. सकाळी 9 ते 3 आणि 3 ते रात्री 11 पर्यंत 11 ते 11.30 वाजता त्याठिकाणी कारवाई केल्या वरचे फोटो विथ लाईव्ह लोकेशन प्रशासन रोज घेत असते. त्या ठिकाणी वेगवेगळे अधिकारी कर्मचारी काम करत असतात. इव्हन दो काल रात्री 11 वाजता केलेल्या कारवाईचे फोटो पण माझ्याकडे उपलब्ध आहेत. ज्या सन्मा. सदस्यांना त्याचे फोटोग्राफ बघायचे असतील ते उपायुक्त गायकवाड साहेब दाखवतील किंवा मी स्वत: दाखवू शकतो. तर प्रशासनाने दोन शिफ्टमध्ये त्या ठिकाणी काम करतात आणि फेरीवाल्यांना कंट्रोलमध्ये ठेवण्याचा कसोशिने प्रयत्न करत आहेत. फक्त विषय सोमवार बाजारचा जो आपण उल्लेख केलेला आहे त्याअनुषंगाने अगोदर महासभेच्या वेगवेगळ्या दिनांकाने झालेले सगळे ठराव तपासून त्याच्यात जे काही नमुद आहे त्यानुसार प्रशासन कारवाई करेल.

मा. उपमहापौर :-

सचिव साहेब पुढचा विषय घ्या.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 43, सन्मा. सदस्य श्री. अशरफ म. शेख यांचा दिनांक २९/०७/२०२२ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर मनपा मुख्य कार्यालयाच्या परिसरात "राष्ट्रपिता महात्मा गांधीजींना अर्धपुतळा लावणेबाबत.

अशरफ शेख :-

मिरा भाईंदर मनपा भाईंदर (प.) येथील मुख्य कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा यापूर्वी बसविण्यात आलेले आहेत. सदर पुतळ्याच्या शेजारी उपलब्ध असलेली जागा राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचा पुतळा बसविण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

प्रविण पाटील :-

माझे अनुमोदन आहे.

प्रशांत दळवी :-

पिठासीन अधिकारी साहेब विषय अतिशय चांगला आहे. दुसरं अस काही असो मी त्यांचे अभिनंदन करतो पूर्ण 5 वर्ष निघुन गेली शेवटी हा प्रस्ताव त्यांनी आणला. आपले अभिनंदन. ठिक आहे महापौर महोदया मला ह्याच्यावर काही विरोध करायचा नाही असे आहे की त्यांनी जो आपला ठराव दिलेलाच आहे पण माझी एक विनंती असेल आयुक्त महोदय आपण जेव्हा राष्ट्रपुरुषांचे पुतळे लावतो त्या वेळेला त्या त्या परवानग्या वगैरे जे काही असेल महापौर साहेब आपणाला विनंती करायची आहे की आपण ही ह्या प्रस्तावा संबंधित योग्य ती कारवाई आपण करावी आणि ज्या काही परमिशन लागत असेल वगैरे ह्या संदर्भातील आणि मग पुनश्च आपण हा प्रस्ताव महासभेपूढे आणावा. रितसर मंजूर करण्याकरिता अशी माझी विनंती आहे. आमचा विरोध नाही पण कुठे बसवायचा कसा बसवला जाईल. महापौर साहेब मी विरोध करत नाही माझे एवढेच म्हणणे आहे की जे पुतळे आपण बसवतो त्यांच्या काय परवानग्या वगैरे काही असतेच ना.

अशरफ शेख :-

माझ्या ठरावामध्ये मी ॲड करतो रितसर परवानगी घेऊन.

प्रशांत दळवी :-

ती पुर्तता करावी. मी पर्टीक्युलर ह्या विषयावर बोलतो. ज्या कोणाचे म्हणणे असेल त्याही परवानगी काढून घेण्यात याव्यात आणि ह्याही परवानगी घेण्यात यावी आणि त्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी.

अशरफ शेख :-

ऑलरेडी ठरावात मी नमूद केलेले आहे.

प्रशांत दळवी :-

पण मी वेगळ काय म्हणतोय मी तुमच्या ठरावाच्या विरोधात काही बोलतच नाही.

जुबेर इनामदार :-

ठरावामध्ये दुरुस्ती केलेली आहे. योग्य असलेल्या शासकीय परवानग्या घेऊन राष्ट्रपुरुष महात्मा गांधी यांचा अर्ध पुतळा पालिकेच्या पटांगणामध्ये बाबासाहेब आंबेडकरांच्या बाजूला जी जागा आहे तिथे उभा करण्यात यावा. असा त्यांनी स्पष्ट ठराव केलेला आहे. आता तुम्हाला त्याचा विरोध करायचा असेल तर तुम्ही खुशाल करा.

प्रशांत दळवी :-

पिठासीन अधिकारी साहेब मी तेच म्हणतो की ह्या संदर्भातली जी काही कार्यवाही करावी ती प्रशासन करणार आहे. कार्यवाही आणि तो मंजूरीसाठी रितसर प्रस्ताव पुढील बॉडीपूढे आणावा मी कुठे नाही म्हणतो.

मा. उपमहापौर :-

आपले म्हणणे असेल तर तुम्ही ठरावामध्ये मांडून घ्या.

जुबेर इनामदार :-

तुम्ही विरोधात ठराव मांडा.

मा. उपमहापौर :-

ठराव मांडत नाही आपले म्हणणे काय होते की जे शासकीय ज्या काही परवानग्या लागणार आहेत त्या अनुषंगाने त्यांनी तुम्हाला सांगितले की पुढच्या महासभेत घेण्यात यावे.

(सभागृहात गोंधळ)

धृवकिशोर पाटील :-

पिठासीन अधिकारी साहेब हे दिशाभुल करत आहेत आयुक्त साहेब कोणत्याही खर्चाला सुध्दा आर्थिक आणि प्रशासकीय मंजूरी लागते.

अशरफ शेख :-

ऑलरेडी प्रस्तावामध्ये मी नमुद केलेले आहे. योग्य असलेल्या शासनाची परवानगी घ्यावी.

धृवकिशोर पाटील :-

याच्या आधी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी लागते. किती खर्च लागणार आहे. तो लागतो तो टाकला पाहिजे. टाकला का नाही अर्धवट ह्यांनी प्रस्ताव आणलेला आहे. साहेब तुम्हाला करायचे असेल तर व्यवस्थित डंके के चोर पे करोना ऐसा गोल गोल क्यों घुमाते हो आप कुठल्याही खर्चाला आर्थिक व प्रशासकीय मंजूरी लागते आणि त्याच्यासाठी महासभेत किंवा स्थायी समितीत आले पाहिजे आणि पॉलिसी डिसीजन आहे साहेब आणि हा पॉलिसी डिसीजन घेतलेले आहे ना.

जुबेर इनामदार :-

आर्थिक व प्रशासकीय मंजूरी साहेब देण्यात येत आहे.

मा. उपमहापौर :-

तुम्ही कशी देऊ शकतात?

प्रशांत दळवी :-

एकदा ठराव वाचल्यानंतर परत त्या ठरावामध्ये तुम्ही ..........

जुबेर इनामदार :-

माझी अधिसुचना आहे. क्लब करा. माझी ज च्या प्रस्तावामध्ये सुचना आहे. आर्थिक प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे. द्या अनुमोदन. आम्हाला कायदा शिकवू नका आम्ही इथे 10-15 वर्ष हेच करत आहोत.

मा. उपमहापौर :-

सचिव महोदय विषय झालेले आहेत. कोणाचा शोक प्रस्ताव आहे का?

अशरफ शेख :-

ह्या विषयाचे काय झाले?

जुबेर इनामदार :-

पिठासीन अधिकारी साहेब ह्याचा अर्थ हा विषय मंजूर झाला.

मा. उपमहापौर :-

आपला ठराव आहे का?

प्रशांत दळवी :-

उपरोक्त विषयांकित प्रकरणी प्रशासनाने राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचा अर्धपुतळा लावणेकरीता आवश्यक परवानग्या, येणारा खर्च इ. बाबत सविस्तर अहवाल पुढील महासभेपुढे सादर करण्यात यावा. याकरीता ही सभा मान्यता देत आहे.

धृवकिशोर पाटील :-

माझे अनुमोदन आहे.

मा. उपमहापौर :-

ह्या विषयावर दोन ठराव आलेले आहेत सचिव महोदय मतदान घ्यावे.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 43 करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. अशरफ शेख, अनुमोदन श्री. प्रविण पाटील. दुसरा ठराव सुचक श्री. प्रशांत दळवी, अनुमोदन श्री. धृवकिशोर पाटील. सुचक श्री. अशरफ शेख यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहेत. दुसरा ठराव सुचक श्री. प्रशांत दळवी यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहेत.

मा. महापौर :-

सुचक श्री. प्रशांत दळवी यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने 38, विरोधात 24, तटस्थ 01इतकी मत पडलेली आहेत. सुचक श्री. प्रशांत दळवी यांचा ठराव बहुमताने मंजूर करण्यांत येत आहे.

प्रकरण क्र. 43 :-

सन्मा. सदस्य श्री. अशरफ म. शेख यांचा दिनांक २९/०७/२०२२ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर मनपा मुख्य कार्यालयाच्या परिसरात "राष्ट्रपिता महात्मा गांधीजींना अर्धपुतळा लावणेबाबत.

ठराव क्र. 45 :-

उपरोक्त विषयांकित प्रकरणी प्रशासनाने राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचा अर्धपुतळा लावणेकरीता आवश्यक परवानग्या, येणारा खर्च इ. बाबत सविस्तर अहवाल पुढील महासभेपुढे सादर करण्यात यावा. याकरीता ही सभा मान्यता देत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्री. ध्रुवकिशोर पाटील

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | गेहलोत हसमुख मोहनलाल | १ | जैन गीता भरत | १. अहमद सारह अकरम |
| २ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | २ | पाटील धनेश परशुराम | |
| ३ | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | ३ | भोईर राजु यशवंत | |
| ४ | मदन उदितनारायण सिंह | ४ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरधर | ५ | नलावडे दिनेश दगडु | |
| ६ | यादव मिरादेवी रामलाल | ६ | शिर्के अनंत गेणू | |
| ७ | शाह रिटा सुभाष | ७ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| ८ | गोहिल शानू जोरावर सिंह | ८ | घरत तारा विनायक | |
| ९ | भोईर सुनिता शशिकांत | ९ | कदम अर्चना अरुण | |
| १० | पाटील वंदना मंगेश | १० | पांडे स्नेहा शैलेश | |
| ११ | अरोरा दीपिका पंकज | ११ | गुप्ता कुसुम संतोष | |
| १२ | नाईक विविता विवेक | १२ | भोईर भावना राजू | |
| १३ | भावसार वंदना संजय | १३ | पाटील वंदना विकास | |
| १४ | बेलानी हेमा राजेश | १४ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| १५ | भोईर विणा सुर्यकांत | १५ | बांड्या एलायस दुमिंग | |
| १६ | सोनार सुरेखा प्रकाश | १६ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| १७ | मुखर्जी अनिता बबलू | १७ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| १८ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | १८ | सावंत अनिल दिवाकर | |
| १९ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | १९ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| २० | म्हात्रे मोहन गोपाळ | २० | शेख रुबीना फिरोझ | |
| २१ | शेट्टी अरविंद आनंद | २१ | डिसा मर्लिन मर्विन | |
| २२ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | २२ | परदेशी गिता हरीश | |
| २३ | अग्रवाल सुशिल गोपीकिशन | २३ | पाटील नरेश तुकाराम | |
| २४ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | २४ | शेख अमजद गफार | |
| २५ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| २६ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| २७ | कांगणे मीना यशवंत | | | |
| २८ | परमार हेतल रतिलाल | | | |
| २९ | थेराडे संजय अनंत | | | |
| ३० | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ३१ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ३२ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ३३ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ३४ | भोईर गणेश गजानन | | | |
| ३५ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ३६ | पांडेय पंकज सूर्यमणि | | | |
| ३७ | भट दिप्ती शेखर | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३८ | पाटील अनिता जयवंत | | | |

ठराव बहूमताने मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महापौर :-

शोक संदेश आहेत का बोला.

प्रशांत दळवी :-

मराठा समाजाचे नेते शिवसंग्राम पक्षाचे अध्यक्ष कै. माजी आमदार विनायक मेठे साहेब यांचे अपघाती नुकताच निधन झाले त्यांना मी सभागृहाच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पित करतो.

शर्मिला बगाजी :-

मिरा भाईंदर महापालिकेचे ठेका लिपीक तथा संगणक चालक श्री. प्रसाद गणेश शेट्टे वय वर्ष 37 यांचे शनिवारी 20/8/2022 रोजी आकस्मित हृदय विकाराने निधन झाले तरी त्यांना श्रध्दांजली वाहत आहे.

दु:खवठा ठराव क्र. 46 :-

मराठा समाजाचे नेते शिवसंग्राम पक्षाचे अध्यक्ष कै. माजी आमदार विनायक मेठे साहेब यांचे अपघाती नुकताच निधन झाले आहे. त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी** **अनुमोदन :- श्री. ध्रुवकिशोर पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

दु:खवठा ठराव क्र. 47 :-

मिरा भाईंदर महापालिकेचे ठेका लिपीक तथा संगणक चालक श्री. प्रसाद गणेश शेट्टे वय वर्ष 37 यांचे शनिवारी 20/8/2022 रोजी आकस्मित हृदय विकाराने निधन झाले तरी त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे.

**सुचक :- श्रीम. शर्मिला बगाजी** **अनुमोदन :- श्रीम. स्नेहा पांडे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(सभा संपल्याची वेळ दु. 02.42 वा.)

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)

नगरसचिव

मिरा भाईंदर महानगरपालिका